

मूर्तिमंत भीति उभी • शूरा मी वंदिले • मम आत्मा गम

नृपकन्या तव जाया • माडिवरी चल गऽऽगडे • दया छाया

नरवर कृष्णासमान • घास घे रे तान्ह्या बाळा • प्रभु अजि गम

# माणूस

साप्ताहिक

## १५ ऑगस्ट विशेषांक

काहीतरी नवे घेऊन येत आहे.

प्रसिद्धि : १२ ऑगस्ट

किंमत : ?

**सविस्तर निवेदन पुढील अंकी**

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : नववा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
**संपादक**
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**स. न.** जुलै १४

मी 'माणूस' हा अंक नियमाने वाचतो. परंतु माझे गाव हे अत्यंत खेडेगाव असल्याने वेळवर अंक मिळत नाही. तरी मी धावत पळत जाऊन अंक आणतो.

मी ८ जुलैचा अंक वाचला. मला हा अंक सर्वांत आवडला. यातील 'दिल्ली दरबार' हा श्री. सदाशिव पेठकर ह्यांचा लेख एकदम आवडला. त्याचप्रमाणे वि. ग. कानिटकर यांचे 'दक्षिणायन' बरे वाटले. तरी पण श्री. ज. जोशी यांच्यासारखे नाहीच. 'मुक्ताफळे' मधील 'पहिली मंगळागौर' बेस्ट आहे. त्याचप्रमाणे गुडबाय नबाब हे मनोहर रेग यांचे लिखाण परत परत वाचावेसे वाटते. याच अंकात कोणीतरी 'पत्र मैत्रीत' लिहिले आहे की, क्रिकेटची माहिती दररोज पेपरला येते तेव्हा ती अडगळ येथे नको. परंतु मला तरी यातील लिखाण आवडते. 'बुगडी' ही गोष्ट विशेष आवडली नाही. बाकी सर्व व्यवस्थित. 'आस्वाद'मधील 'पाप' व तिचे विश्लेषण बरे वाटले. 'माणूस'मध्ये अशा प्रकारचे लेखन प्रसिद्ध होत असल्याने त्याचा भविष्यकाल उज्ज्वल आहे, असे माझ्याप्रमाणे अनेक नियमित वाचकांना वाटल्यास नवल काय ?

**वि. वा. चांदोरकर**, कनकेश्वर.

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २.
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# ' आमच्या देशाची स्थिती '

सदाशिव पेठकर

' आमच्या देशाची स्थिती ' या शीर्षकात कै. विष्णुशास्त्रीचिपळूणकर यांचा निबंध प्रसिद्ध आहे. आपल्या देशात इंग्रजांची राजवट प्रस्थापित झाल्या नंतर पंचवीसएक वर्षांनी लिहिलेल्या या निबंधात शास्त्रीबुवांसारख्या कुशल बुद्धीच्या आणि देशहिताची काळजी वाहणाऱ्या लेखकाने त्या वेळच्या आपल्या देशाच्या राजकीय परिस्थितीचे आपल्या या निबंधात विश्लेषण केलेले आहे. आपला देश स्वतंत्र व्हावा या तळमळीने लिहिलेल्या त्या लिखाणात आपल्याला त्या वेळच्या परिस्थितीचे चित्र पाहावयास मिळते. आता आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून वीस वर्षे होत आहेत. आणखी पंधरा दिवसांनी आपण आपला एकविसावा स्वातंत्र्य दिन साजरा करणार आहोत. या निमित्तानेही ' आमच्या देशाची स्थिती ' या विष- याचा कोणीतरी सखोल अभ्यास करून सडेतोड विचार मांडण्याची गरज निर्माण झाली आहे.

मी हे केवळ आर्थिक वा राजकीय परिस्थितीच्या संदर्भातच म्हणतो आहे असे

नाही! आपली आर्थिक परिस्थिती सध्या किती बिकट झाली आहे, हे या देशातला प्रत्येक नागरिक अनुभवीत आहे. गेल्या पाच वर्षांतील दोन परकीय आक्रमणे व निसर्गाचा गेल्या दोन वर्षांतला रुसवा यामुळे ही अशी परिस्थिती निर्माण झाल्याची सबब सांगण्यात येते. काही अंशी ती गोष्ट खरीही आहे; परंतु केवळ या दोन कारणांमुळेच आजची अवघड परिस्थिती निर्माण झाली आहे असे जे सरकारी प्रवक्त्यांकडून सांगितले जाते ते मात्र मुळीच खरे नव्हे! प्रशासन यंत्रणेची जनतेबद्दलची अक्षम्य उदासीनताच या उदासीनतेपायी नागरिकांकडून कराच्या रूपाने जमणाऱ्या पैशाची वारेमाप उधळपट्टी, लाचलुचपत आणि भ्रष्टाचार यांची भूमितीश्रेणीने वाढलेली बजबजपुरी, अशा अनेक कारणांमुळे विकास योजनांसाठी स्वत:जवळ असलेला व परक्या देशांकडून उसनवारीने आणलेला पैसा वाया गेला. भारताची आर्थिक आणि औद्योगिक विकासाची वाटचाल इतकी संथ आहे की, हळू चालण्याच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आपण पहिला क्रमांक सहज मिळवू. हे काही गंमतीचे बोलणे नव्हे. इतर कोणत्याही देशाच्या तुलनेने भारताची प्रगती सर्वांत अधिक संथ गतीने होत आहे, असा तज्ज्ञांचा निष्कर्ष या पूर्वीच प्रसिद्ध झाला आहे. अन्नधान्यांचे दुर्भिक्ष्य आणि वाढती महागाई या दुहेरी कात्रीत सापडलेल्या कोटयवधी नागरिकांना 'आपले पोटामोवतालचे पट्टे आणखी घट्ट करा' असे जेव्हा एकदा तुंदिलतनू लंबोदर मंत्री उपदेश करायला लागतो, तेव्हा स्वत:ची फसवणूक करून घेण्याबाबत तो किती निर्लज्ज बनला आहे हे जाणवते.

जी गोष्ट आर्थिक परिस्थितीची ती राजकीय आघाडीवरची. या देशाच्या एकात्मतेला तडे जात आहेत, अंतर्गत फुटीर वृत्ती वाढीस लागत आहे. तिचा फायदा घेऊन सीमेवरची लहानमोठी राष्ट्रे आपला सतत अवमान करीत आहेत. नव्हे 'तुमचे सरकार उलथून पाडू' अशी धमकी देत आहेत. पूर्वसुरींच्या रक्तांतून साकारलेले या राष्ट्राचे स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व अबाधित राहणार आहे की नाही, या शंकेची पाल मनात चुकचुकत आहे. अशा या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवरचे दिल्लीच्या राज्यकर्त्यांचे सुखासीन आणि स्वप्नाळू वर्तन अधिकच बोचरे झाले आहे!

परंतु हे आहेत सारखे हाताळून गुळगुळीत झालेले विषय. 'आमच्या देशाची स्थिती' या विषयाचा फेरविचार करण्याची मला गरज वाटते ती याहीपेक्षा अधिक सखोल आणि मूलगामी प्रवृत्तीमुळे. आपल्या लोकप्रतिनिधींचे वर्तन हा इतर कोणत्याही प्रश्नांपेक्षा अधिक गांभीर्याने विचार करावा, असा विषय आहे. लोकप्रतिनिधी हे लोकशाहीचे रखवालदार असतात त्यांचे वर्तन चोख असले पाहिजे. सरकारी आमिषांना बळी न पडण्याची निस्पृहता त्यांच्या अंगी असावयास हवी. या साऱ्या गोष्टी राज्यशास्त्राच्या प्राथमिक पाठयपुस्तकातही वाचावयास मिळतात. त्यांचा उद्‌घोषही सदैव कानीकपाळी पडत असतो. न्या. प्र. बा. गजेंद्रगडकर किंवा

न्या. वि. अ. नाईक यांच्यासारख्या पंडितांशी बोलताना या प्रश्नाचे गंभीर महत्त्वही ध्यानी येते. परंतु या झाल्या बोलण्याच्या किंवा ऐकण्याच्या गोष्टी. प्रत्यक्ष घडत काय आहे ते पाहिले की आपला 'चर्चिलपणा' तेवढा जगास वेढा घालण्याइतका लांबरुंद असतो. परंतु आचरणात मात्र आपण फारच खालच्या पायरीवर उभे असल्याचे जाणवते.

## विरोधी पक्षांचा संधिसाधुपणा

गेल्या निवडणुकीनंतर लोकप्रतिनिधींच्या सार्वजनिक जीवनातील निष्ठांना आणि शब्दांना काही अर्थ उरला आहे, असे भासतच नाही. लोकांनी आपल्याला कशासाठी निवडून दिले आहे याचे या प्रतिनिधींना काही भान राहिले की नाही याचीच शंका वाटू लागते. वेशांतराला वेळ लागावा इतके सध्या पक्षांतर सवंग आणि सोपे झाले आहे. या बाबतीत काँग्रेस पक्षाचा विचारच करावयास नको. अंतर्बाह्य सडलेला आणि सत्ताबाजांनी पोखरून टाकलेला. या पक्षाने गेल्या वीस वर्षांत आपल्या बौद्धिक आणि आचरणातील दिवाळखोरीने एकेकाच्या या महान संघटनेची आणि त्याचबरोबर या देशाची काय अवस्था केली आहे हे आपण पाहतोच आहोत. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जोरात असताना काँग्रेस श्रेष्ठांविरुद्ध भीमदेवी थाटाची भाषणे करणाऱ्या धैर्यधरांचे संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश दिल्लीहून मुंबईकडे येण्यासाठी निघताच लक्ष्मीधरात कसे रूपांतर झाले हा इतिहास अलिकडचा आहे. विरोधी पक्षांना नेस्तनाबूद करता येते आहे ना आणि त्या योगे आपले आसन अधिक घट्ट होणार आहे ना, एवढाच विचार करून महाराष्ट्र काँग्रेसच्या 'अनभिषिक्त सम्राटा'ने बाहू पसरून 'यारे या आमच्यात या, आमच्या ताटात आहे त्यातले थोडे तुमच्या वाटीत टाकतो' असा पुकारा केला होता व विरोधी पक्षाचा टिळा लावलेले अनेक सत्ताबुभुक्षित चटकन मुंबईच्या 'टिळक भवना'त जाऊन बसले. हा पुकारा आपल्या डोळ्यांसमोरच घडला आहे. त्यामुळे काँग्रेसच्या नीतीबद्दल बोलणे म्हणजे शाई आणि कागद वाया घालवण्यासारखे ठरते.

परंतु आतापर्यंत साधनशुचितेचा व वैचारिक निष्ठेचा दावा करणाऱ्या विरोधी पक्षांची स्थितीही वेगळी नाही हे पाहिले की मन उद्विग्न होते. विरोधी पक्षांनी किमान कार्यक्रमाच्या भूमिकेवर एकत्र येऊन काँग्रेसच्या हातून सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न करावा यातही वावगे काही नाही. परंतु त्यासाठी काँग्रेसवाल्यांचेच भ्रष्ट तंत्र आचरण्याचा हा जो नवा प्रयोग त्यांनी सुरू केला आहे त्याचा तात्कालिक लाभ होत असला तरी देशाचे संपूर्ण राजकीय जीवन ते नासून टाकत आहेत त्याची वाट काय?

उत्तर प्रदेशात चंद्रभानु गुप्ता यांना खुर्चीवरून दूर ढकलण्यासाठी चरणसिंगांना मानाची खुर्ची देण्यात विरोधकांचा वैचारिक प्रामाणिकपणा आढळला काय? हरियानात तेच राव बीरेंद्रसिंग यांना मुख्यमंत्रिपद देण्याचे गुलझारीलाल नंदा यांनी नाकारताच तेथल्या विरोधी पक्षांनी बीरेंद्रसिंग यांना मुख्यमंत्र्यांची खुर्ची देऊ

करून भागवत दयाल शर्मांची हुसकावणी केली. पंजाबची दडपशाही यापेक्षा वेगळी नाही. गेल्या आठवड्यात मध्यप्रदेशात या प्रकाराचीच पुनरावृत्ती झाली.

द्वारकाप्रसाद मिश्रा यांचा निस्पृह किंवा लोकहितदक्ष प्रशासक म्हणून मुळीच लौकिक नाही. सत्ताबाजीच्या राजकारणातील मुरब्बी म्हणूनच त्यांना सारा देश ओळखतो. त्यांचे आणि ग्वाल्हेरच्या राजमाता राणीसाहेब विजयमाला शिंदे यांचे मध्यप्रदेशच्या राजकीय आखाड्यातील भांडण प्रसिद्धच आहे. त्यामुळेच काहीही करून मिश्रा यांचा चंद्रभानु गुप्ता करण्याचा राजमातेने चंग बांधला. आता मध्यप्रदेशातील सर्व विरोधी पक्ष या राजमातेच्या झेंड्याखाली एकत्र आले असून त्यांनी मध्यप्रदेश विधानसभेतील पस्तीस–छत्तीस सभासदांना मिश्रा यांच्यापासून फोडण्यात यश मिळविलेले आहे. तूर्त विधानसभा स्थगित केली असल्याने या राजकीय चाचेगिरीत मिश्रा आणि राजमाता यांपैकी कोणता गट कोणावर आणि कोणत्या बळावर मात करतो हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. परंतु राजकीय उचलेगिरीचा हा प्रकार सुरू झाल्याबरोबर मिश्रा यांना आपल्या कारवाया करू देण्यासाठी राज्यपालांनी विधानसभा बरखास्त करताच 'हा लोकशाहीचा खून होत आहे' असे मधू लिमयांपासून ना. ग. गोरे यांच्यापर्यंत विरोधी पक्षनेते जी ओरड करीत आहेत त्यात वैचारिक निष्ठेचा अंश किती आणि राजकीय संधिसाधू वृत्तीचा अंश किती, हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे!

प्रत्येक राजकीय पक्षाने सत्ता हस्तगत करण्याचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवावयास हवे याबद्दल दुमत नाही. पण ही सत्ता तुम्हांस कशासाठी हवी आहे हा प्रश्न यासंदर्भात विचारावासा वाटतो. तुमचे राजकीय तत्त्वज्ञान कृतीत आणण्यासाठी तुम्हांस ही सत्ता हवी आहे ना ? मग सार्वजनिक जीवनातील सर्वमान्य संकेतांना राख फासून केवळ हजार-पाचशेच्या मामुली खुर्चीसाठी किंवा त्या खुर्चीवर बसल्या नंतर हाती येणाऱ्या वैभवासाठी आयुष्यभर हृदयाशी जपलेल्या निष्ठांचा मीनाबाजार मांडण्याची ज्या उठवळांना दिक्कत वाटत नाही, त्यांच्या हाताला हात लावून तुम्ही ही सत्तेची शिडी चढणार आहात काय, असा रोखठोक प्रश्न आपण मतदारांनी विचारला पाहिजे. काँग्रेस तशी वागते म्हणून आम्हीही तसेच वागतो असेच या प्रश्नाचे उत्तर मिळणार असेल तर मग आतापर्यंतच्या तुमच्या पातिव्रत्याच्या गप्पा खोट्या होत्या, केवळ मतदारांना आपल्याकडे खेचण्यासाठी केलेली ती रंगरंगोटी होती किंवा चतुराईने घातलेली शीळ होती, असाच याचा अर्थ होतो.

आर्थिक संकट आज आहे, उद्या नाहीसे होईल. राजकीय प्रश्नही यथावकाश सुटतील. पण सार्वजनिक जीवनातील चारित्र्याची ही जी होळी सुरू झाली आहे तिला आवर बसला नाही तर या होळीच्या निमित्ताने काँग्रेसच्या नावाने शंखध्वनी करणाऱ्यांना दुसरे असे काही तरी पेटलेले दिसेल की त्याची भरपाई करता येणार नाही. ○

# मुक्ताफळे

## □ श्रीमंतांचे देवदर्शन

गोष्ट जुनी आहे. पानिपतानंतरची ! माधवराव पेशवे त्या वेळी थेऊरास देवदर्शनास जात असत त्या वेळची ! हैदराबादचे नबाब यांचे दिवाण रुखमतदौला हे होते. त्यांना हवेली बांधायची होती. त्यासाठी त्यांनी मराठी मुलखातल्या एका ब्राह्मणाची जागा जबरदस्तीने घेतली. नागवलेला–ब्राह्मण पुण्याला आला. त्या दिवशी चतुर्थी होती. श्रीमंत थेऊरास निघाले होते. ब्राह्मण रस्त्यात उभा राहून ओरडला,–" फिर्याद !" श्रीमंतांनी ब्राह्मणास जवळ बोलावून वर्तमान ऐकले. वाड्यात परतल्यावर पेशव्यांनी नबाबास पत्र लिहिले–" भटजीची जागा भटजीस देववावी हे चांगले, न पेक्षा परिणाम गंभीर होतील." श्रीमंतांनी भटजीस सांगितले– " आता आठ दिवस तुम्ही स्वस्थ असावे. " दहा दिवसांनी ब्राह्मण पुनः वाड्यात आला. तरीही जाबसाल आलेला नव्हता. पुन: आठ दिवसांत उत्तर मागवणारे पत्र रवाना झाले. भटजीस पुन: सांगितले–" आठ दिवस स्वस्थ राहा. "

दुसरी चतुर्थी आली. श्रीमंत थेऊरास निघाले. ब्राह्मण पुन: आडवा आला व गरजला–" फिर्याद !" सरकार स्वारीने ब्राह्मणास पुन: जवळ बोलावले. ब्राह्मण म्हणाला–" आज महिना जाहला. वाट पाहिली. आता वाट फुटेल तिकडे जातो."

श्रीमंत तडक वाड्यात आले. त्यांनी निळकंठराव पागे यांना आज्ञा दिली––

" मोगलाई मुलखात पन्नास हजार फौज घेऊन जावे. बेदरकडे लुटीत मारीत जावे."

फौजा सुटल्या. मोगली मुलखात भारी उपद्रव झाला. नबाब निजाम अलीखाँ हादरले. त्यांनी पेशव्यांकडे वकील लावला ––

" ब्राह्मणाचे जागेसाठी एवढी धूप केली याचा विचार काय ?"

पेशव्यांचे वकील गोविंदराव काळे यांनी जबाब पाठवला––

" कुराण उचलून–ब्राह्मणाची जागा परत द्यावी. पाच लक्ष रुपये स्वारी खर्चाचे द्यावे. फौज माघारी घेऊ–!"

ब्राह्मणाची जागा ती किती आणि त्यासाठी पेशव्यांनी मोगलाचा तीस-चाळीस मैल मुलूख उद्ध्वस्त करावा याला काय हो अर्थ आहे ? लढाई करून का असे प्रश्न सोडवायचे असतात ! ब्राह्मणाची जागा रुखमतद्दौलाकडे राहू द्यायची व फारतर घोषणा करायची, " तसूभर जमीनही निजामाला देणार नाही. " परंतु आपल्या बापजाद्यांनी केलेल्या या चुका सुधारण्याची संधी आता आपल्याला मिळालेली आहे.

आसामच्या सरहद्दीवरील लाठीतिल्ला–दुमाबारी भागात चार खेडी १९६३ मध्ये पाकिस्तानने घेतली. जबरदस्तीने घेतली. या वेळी यशवंतरावजी संरक्षणमंत्री असल्यामुळे आपली संरक्षण व्यवस्था एवढी मजबूत झाली होती, की या खेड्यातला

एकही ब्राह्मण बोंबलत दिल्लीपर्यंत येऊ शकला नाही. शिवाय या खेड्यात नंतर ब्राह्मण सोडाच, कुणी हिंदूच राहिला नाही.

या प्रश्नाचा जनसंघ सदस्य कुंवरलाल गुप्ता यांनी परवा लोकसभेत मोठा बाऊ केला. जातीय कुठला ! गेली दोन खेडी पाकिस्तानात, झाले दहा-बारा हजार लोक मुसलमान, पळवल्या आपल्या पोरी बाळी, त्या करता एवढा आरडाओरडा ? शोभत नाही !! छागलांनी त्वरित घोषणा केली–" भारत आपला इंचभर प्रदेशही पाकिस्तानला देणार नाही." ही खेडीदेखील आम्ही दिलेली थोडीच आहेत ? ती त्यांनी जबरदस्तीने घेतलेली आहेत. गोष्ट वाईट आहे. परंतु त्यावरून लगेच या नव्या मोंगलाईत फौजा घुसवायला ही पेशवाई थोडीच आहे !

हे जनसंघवाले अलीकडे लोकसभेत भारीच माजू लागले आहेत. सियालकोटच्या लढाईत लढलेले मेजर रणजितसिंग हे जनसंघाच्या तिकिटावर निवडून आले आहेत. त्यांनी परवा लोकसभेत सांगितले—

' एच्. एफ्. २४ ' या विमानांचा सांगाडा भारतात व इंजिने ' युनायटेड अरब रिपब्लिक 'मध्ये तयार करण्याचे ज्यांनी ठरवले त्यांच्या अकलेला काय म्हणावे ? तो इंजिनांचा कारखाना परवा अरब-इस्रायल युद्धात खलास झाला ! आमच्या लष्करी चाणाक्षपणाचा तर कळस आहे की इचिगोल कालव्याचा डावा काठ हा उजव्यापेक्षा उंच आहे ही गोष्ट, लाहोर जवळ दिमू लागेपर्यंत आम्हांला माहीत नव्हती. डाव्या काठावर पाकिस्तानच्या टँकविरोधी अस्त्रांचे दर्शन झाले, तेव्हा आम्हांला हे कळले ! आपल्या सरकारला चीन–पाकिस्तानशी आपले युद्ध सुरू आहे की नाही हेच निश्चित ठाऊक आही !!"

मेजर रणजितसिगांचे हे भाषण काही काँग्रेस सभासदांनाही इतके आवडले की त्यांनी संजीव रेड्डींना सांगितले–" लेट हिम कंटिन्यू. ऑल धिस इज न्यूज टू अस्."

असले अद्वातद्वा काय कुणालाही बोलता येईल. आपल्या विमानांची इंजिने नासरच्या देशात तयार झाली समजा, तर तो आपला किती मोठा मित्र आहे हे नाही का त्यावरून सिद्ध होत ! सांगाडा आपला इंजिन नासरचे ! यालाच म्हणतात मैत्री. आता इचिगोल कालव्याचा डावा काठ उंच आहे की सखल आहे असली माहिती, ज्यांना कालवा ओलांडायचा असेल त्यांना आवश्यक आहे. आपल्याला कालवा जर नक्की ओलांडायचा नाही, तर असली माहिती नसली म्हणून हो काय बिघडले ?

आमचे लेफ्ट. जन. थोरात जर निवडून आले असते ना तर त्यांनी या मेजर सिगांना चांगले उत्तर दिले असते. पण राजमातेने त्यांना पाडले ! आता तनखा बंद झाल्यावर पाहू पुन: थोरात कसे पडतात ते ! जाऊ द्या.

लाठीतिल्ला भागात पाकिस्तानने जो भाग बळकावला आहे त्यातला एकही ब्राह्मण दिल्लीत येऊन "फिर्याद !" असे बोंबलणार नाही, याची काळजी पाकिस्तानने घेतलेली आहे; आणि सरकार स्वारींची राजघाटावरील देवदर्शने नित्य चालू राहणार आहेत !

## ☐ दुष्ट वर्तुळ

गजेंद्रगडकर समितीने केंद्र सरकारी नोकरांचा महागाईभत्ता वाढवावा असे सुचवले. महागाई व भत्ता यांचे जे नाते नक्की झालेले आहे, त्यानुसार हा भत्ता वाढवावा असे समितीने सुचविले. गजेंद्रगडकर हे मूळचे न्यायाधीश असल्यामुळे, त्यांनी असा न्याय दिला की–'महागाई निर्देशांक वाढला आहे. भत्ता वाढावा' परंतु दिलेल्या आश्वासनांना पाने पुसण्याचे नवीन प्रगतिशील धोरण आता केंद्र सरकारने आखावे, असा जो मोहन धारियांनी आग्रह धरला आहे, त्यानुसार सरकारी नोकरांच्या तोंडाला पाने पुसण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला तर त्यात नवल काय ? कबूल केलेला तनखा –"आता देत नाही जा !" असे संस्थानिकांना सांगणे काय, किंवा " महागाई निर्देशांकानुसार कबूल केलेला भत्ता आता देत नाही जा " असे सरकारी नोकरांना सांगणे काय, यांत तत्त्व एकच आहे. यात विश्वासघात असला तरी तो देशासाठी आहे ! राज्य सरकारी नोकरांनाही त्यामुळे महागाईभत्ता वाढवला जाणार नाही व राज्यपातळीवरही देशाचा सर्वांगीण फायदा होईल, ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. सरकार एकीकडे सारखी काटकसर करीत आहे. १० रुपयाची लहान नोट तुम्ही पाहिली असेल. या नोटांमुळे वर्षाला ३० लाख रुपये वाचले आहेत. बचत झाली आहे. गेली वीस वर्षे ही बचत केली असती तर कितीतरी कोटी रुपये वाचले असते नाही का ? फारसे बिघडले नाही. यापुढे प्रत्येक वर्षी दहा रुपयाची नोट थोडी थोडी लहान करीत नेली, तरी झालेले नुकसान भरून काढता येईल. नोटांचा कागद कमी का पडतो याचा विचार आपण केला तर लक्षात येईल की सतत महागाईभत्ता वाढवल्यामुळे सारख्या सारख्या नोटा छापायला लागतात व पंचाईत होते ! महागाईभत्ता वाढवून कोटयवधी रुपयांचे कागदी चलन बाजारात येते व म्हणूनच आता सरकारने असे ठरवले आहे की, महागाईभत्ता वाढवून द्यायचा नाही आणि नोटा लहान लहान करायच्या ! आम्ही तर म्हणतो, की ३० लाख रुपये इंचाइंचाला वाचत असतील, तर आज रुपयाच्या नोटेचा जो आकार आहे त्या आकारात १० रुपयाच्या नोटा काढाव्या; पाच रुपयांची नोट त्याच्या निम्म्या आकाराची, आणि रुपयाची पाच रुपयाच्या १/५ आकाराची ! ! यामुळे आज बायकांच्या हातांत बाजारात ज्या भलत्याच मोठमोठ्या पर्सेस दिसतात त्या अदृश्य होतील ! शरीराला शोभतील अशाच पर्सेस पुनः दिसू लागतील. तळहातावर राहणाऱ्या छोटया पर्समध्ये हजारो रुपये राहू शकतील. खिसेकापूंचा त्रास कमी होईल. पाकिटाचे चामडे वाचेल ते निराळे !

महागाईभत्ता वाढवून तरी उपयोग काय हा प्रश्नही सरकारने विचारात घेतला आह. बाजारात जर धान्य नाही, साखर नाही, गूळ नाही तर उगाच खिशात पैसे खुळखुळवत बाजारात फिरण्यात तरी काय अर्थ आहे ? आमच्या शेजारच्या वाड्याच्या मालकांना परवा कॉर्पोरेशनची नोटीस आली की, " संडास सुधारा !"

मालकांनी कॉर्पोरेशनला कळविले,– " पत्र मिळाले. संडास सुधारले पाहिजेत या गोष्टीशी मी सहमत आहे. परंतु सुधारून तरी काय उपयोग ? हल्ली भाडेकरूंना खायला मिळते आहे काय? धान्य परिस्थिती सुधारली की संडास सुधारतो !" याच नियमानुसार महागाईभत्ता म्हणूनच न वाढवण्याचे सरकारने ठरविले आहे.

जॉर्ज बर्नार्ड शॉ नावाचा जो नाटकवाला होऊन गेला, तो गरिबांचा कनवाळू होता. जेव्हा काहीजण त्याची स्तुती करू लागले की, "गरिबांविषयीचे तुमचे प्रेम कौतुकास्पद आहे !" तेव्हा तो म्हणाला," काहीतरी बडबडू नका. मला गरिबीविषयी प्रेम नाही. मला गरीब लोक नाहीसे व्हावेत असे वाटते." केंद्र-सरकारने शॉचा आदर्श पुढे ठेवलेला आहे. महागाईभत्ता वाढवण्याचे त्यांना प्रेम आहे, असा जो गैरसमज पसरला आहे तो दूर केलाच पाहिजे. मोरारजींनी म्हणूनच सांगितले– "मला महागाईभत्त्याविषयी प्रेम नाही, मला भत्ता नाहीसा करायचा आहे !"

गजेंद्रगडकरांच्या म्हणण्याप्रमाणे आज शहरांत कमीतकमी ४५० रुपये पगार असला तर कुटुंबपोषण होणार आहे. गजेंद्रगडकरांनी हा निष्कर्ष अशा गैरसमजुतीवर काढला आहे, की पगार एवढा मिळाला तर बाजारात वस्तू मिळतातच ! स्मशानात आणि बाजारात गिऱ्हाइकांची आमदानी विचारली जात नाही ! त्यापेक्षा बाजारातून एकएक वस्तूच गायब केली तर भत्ता हा हळूहळू कमी करता येईल, ही गोष्ट गजेंद्रमोक्षदायी आहे.

तूर्त साखर मिळत नाही. मधुबिंदू मिळतात ! थोडे दिवसांत मधुबिंदूचे रेशन सुरू झाले की चार किंवा पाच बिंदू आठवड्याला मिळू लागतील. मग फाउंटनपेनमध्ये शाई भरण्याचा ड्रॉपर घेऊन लोक लाईनीत उभे राहतील. साखरेचे पैसे कमी झाले की थोडा भत्ता कमी करता येईल !

आहे त्या पगारात जगणे शक्यच नसेल तर निदान आहे त्या पगारात मेलेले सरकारला श्रेयस्कर आहे. लोक उद्या जर असे म्हणाले की, "श्री. पोरे–अव्वल कारकून, १०० रुपये पगार आणि ९०० रुपये महागाईभत्ता होता तरी उपाशी मेले," तर ते सरकारला जास्त क्लेशकारक होईल. या अंतिम हेतूचा विचार करून तूर्त केंद्र सरकारी नोकरांनी आहे त्या पगारात वाढ मागू नये. हळूहळू सर्वच महागाईभत्ता काढून घेतला तरी दु:ख वाटू नये, अशी परिस्थिती निर्माण करण्यास सरकार बांधलेले आहे ! ह्या महागाईभत्त्याबद्दल सेवकांतही आता विरक्ती उत्पन्न झाली आहे. अशी विरक्ती पूर्वी एका राजाला निर्माण झाली होती. कारण–

राजाने याचकाला एक फळ दिले. त्याने आपल्या पत्नीला दिले. तिने ते आपल्या जाराला दिले. त्या जाराने ते आपल्या वेश्येला दिले. त्या वेश्येने ते पुन्हा राजाला दिले. राजाने ते ओळखले व त्याला अशीच विरक्ती पूर्वी उत्पन्न झाली होती ! हे दुष्ट वर्तुळ मोडण्यासाठी राजाने काय केले ? पुन्हा याचक आला तेव्हा त्याने त्याच्या पृष्ठभागावर एक लाथ दिली !!

सेवकांनी याचकासारखे पुन्हा राजाकडे जाऊ नये हे चांगले नाही का ? शिवाय याचकांना दिल्यामुळे द्रव्यहीन झालेले राजे, हे उणे असले तरी किती शोभून दिसतात—

तनिम्ना शोभन्ते गलितविभवाश्चार्थिषु नृपाः।

## ☐ मोहनाचा खडा

सिक्कीम सीमेवर चिनी लष्कराची खास डोंगरी तुकडी आणण्यात आलेली आहे, अशी बातमी जपानमार्फत आलेली आहे. भूतान-सिक्कीमचा काही भाग आपला आहे, असा चीनचा दावा आहे व तो येत्या ऑक्टोबर—नोव्हेंबरात हिसकण्यासाठी हे १०००० चिनी सैन्य आलेले आहे, असे जरी जपान्यांना कळले असेल, तरी आपल्याला घाबरण्याचे कारण नाही ! कारण, असे सैन्य आलेले आहे, हे आपल्या संरक्षणमंत्र्यांना अजून कळलेले नाही ! सिक्कीमचे राजे नामगेल यांना आपण १७ तोफांची सलामी, चोग्यल म्हणजे सार्वभौम हा किताब व मिस् कुक ही अमेरिकन वधू दिलेली आहे. इतर देशांतले मूर्ख लोक राजकन्येने—राजाने—कुणाशी लग्न करावे, कुणाशी करू नये, यावर निर्बंध घालतात. भारतात निधर्मी राज्यसत्ता असल्याने लग्नावर बंधने नाहीत. अर्थात सिक्किमच्या राजाने अमेरिकन बायको केली त्यात काय बिघडले, अशी आपण न्याय्य भूमिका घेतली. या अमेरिकन सूनबाईचा खूपच गोतावळा सिक्कीममध्ये जमा झाला असल्याने चीनला सिक्कीम हा अमेरिकेचा आशियातील नवा तळ भासू लागला आहे व सिक्कीमचा हा 'कॅन्सर' नाहीसा करण्याचा प्रयत्न माओ करील, अशी भीती व्यक्त होत आहे. त्यातच सिक्कीमचे राजे भारताशी सलोख्याने वागत नाहीसे झाले आहेत.

इंदिराजी—मोरारजी—कामराजजी यांच्या नेतृत्वाला पेचात टाकण्याचा जो दुर्दैवी मार्ग काही जणांनी अनुसरला आहे, तो या सिक्कीम—भारतामधील दुराव्याला कारण झाला आहे, हे वाचून कदाचित आश्चर्य वाटेल; परंतु तनखे रद्द करा, असा ठराव कॉंग्रेस कार्यकारिणीने स्वीकृत केल्याची बातमी सिक्कीमला पोचली व महाराज उदास झाले. संस्थानिकांना बनवले, तसे हे भारत सरकार एकदिवशी आपला विश्वासघात करील, अशी विवंचना नेपाळ, भूतान, सिक्कीम या देशोदेशींच्या राजांना लागली आहे. ज्यांना आपले म्हटले त्याला पोटाशी धरणाऱ्या आणि त्याच्यासाठी पोटतिडिकीने लढणाऱ्या जॉन्सन साहेबांचा आधार भारतापेक्षा मोठा आहे, असे या सरहद्द संस्थानिकांना वाटू लागले असल्यास याला मोहन धारिया कारणीभूत आहेत. स्वर्णसिंगजी नाहीत बरं ! सिक्कीमचा घडा फुटलाच तर हा खडा मोहनचा आहे हे कुणी विसरू नये.

— ग्यानबा

●

## समीक्ष विचार वारे

### □ जपानच्या सुबत्तेला कामगारांचा हातभार

गेल्या वीस वर्षांत जपानने केलेली औद्योगिक प्रगती अत्यंत प्रशंसनीय आहे. जपानच्या या 'यश-गाथे'चे कारण काय असावे, हे शोधून काढण्याचा प्रयत्न सर्व जगातील अर्थशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञ करीत आहेत. पण काही दिवसांपूर्वी एका जपानी तज्ज्ञानेच नव्या दिल्लीच्या भेटीत जपानच्या औद्योगिक प्रगतीची अधिकारपूर्ण कार्यकारणमीमांसा केली. कियो विश्वविद्यालयाचे 'औद्योगिक संबंध' या विषयाचे प्राध्यापक हिसाशी कवाडा यांच्या मते मालक आणि मजूर यांच्यांतील सलोख्याचे संबंध हे जपानी औद्योगिक प्रगतीचे प्रमुख कारण आहे. महायुद्धानंतर जपानच्या औद्योगिक रचनेत एक मोठा फरक कळून आला. त्यातली पहिली गोष्ट म्हणजे मजूर आणि मालक यांचे परस्पर संबंध. पूर्वी फारसे चांगले नव्हते ते सुधारले. ही सुधारणा व्यवसायसंघटना चळवळीने घडून आली. युद्धापूर्वी फक्त चार लाख कामगार व्यावसायिक संघटनेचे सभासद होते, तर आता ही संख्या सुमारे एक कोटी झाली आहे. शिवाय आताचे मजूर पुढारी अधिक जाणकार झाले असून वीस वर्षांपूर्वीसारखे एकांतिक मताचे नाहीत. मजुरांचे उत्पादन-कौशल्य सुधारले पाहिजे, याची त्यांच्या पुढाऱ्यांना जाणीव झाली आहे. त्यांना हे माहीत आहे की अधिक वेतन व सोयी मिळाल्या असतील तर आपल्या कंपनीला अधिक फायदा झाला पाहिजे. आणि अधिक फायद्यासाठी अधिक काम करायला पाहिजे.

जपानी कामगारांना आपल्या मालकाबद्दल ही जी निष्ठा वाटते ती जपानमधील मजूर-मालक संबंधांचे एक वैशिष्ट्य आहे. ही निष्ठा निर्माण होण्याचे कारण बहुतेक जपानी कंपन्या शालेय शिक्षण नुकतेच संपविलेल्या मुलांना नोकरीवर घेतात व त्यांना एखाद्या विशिष्ट कामाचे प्रशिक्षण देतात. प्रशिक्षण संपल्यावर त्या मुलांचा पगार वाढविण्यात येतो व त्यानंतरची त्यांची प्रगती त्यांच्या हुशारीवर अवलंबून असते. पण या पद्धतीमुळे त्या मुलांना एक प्रकारची सुरक्षितता वाटते व तिचे ऋण ते निष्ठेच्या स्वरूपात फेडतात. ही पद्धत हितकारक असल्याने पुष्कळशा जपानी कंपन्यांत पिढ्यान् पिढ्या एकाच घराण्यातील कामगार नोकरीवर ठेवल्याची उदाहरणे दिसून येतात. याचा अर्थ जपानमधील आजच्या औद्योगिक सुबत्तेला जपानी कामगारांची सांस्कृतिक व सामाजिक पार्श्वभूमी बऱ्हंशी कारणी-

भूत झाली आहे, तेव्हा अशाच प्रकारची पार्श्वभूमी असलेले भारतासारखे देश या बाबतीत जपानचे अनुकरण करतील तर ते हितकारक ठरेल.

## ☐ माणसे का पितात ?

माणसे दारू का पितात याचे तपशीलवार उत्तर शोधून काढण्याचा प्रयत्न ' इंटरनॅशनल कमिशन फॉर द प्रिव्हेंशन ऑफ अल्कोहोलिझम् ' या आंतरराष्ट्रीय मद्यपान-विरोधी संस्थेचे कार्यकारी प्रमुख श्री. स्कार्फेनबर्ग यांनी कसा केला याची माहिती त्यांनी काही दिवसांपूर्वी भारत–भेटीत दिली. या मूलभूत प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी जगातल्या निरनिराळ्या शहारांची पाहणी करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला व दर शहरात ५०० माणसांना प्रश्न करण्यात आला. उत्तरात एक चांगली गोष्ट बाहेर आली, ती म्हणजे नियमित पिणाऱ्यांपैकी ९० टक्के लोकांना ' पहिल्या प्याल्या 'ची चव आवडली नाही. नियमितपणे गुत्त्यांत जाणाऱ्यांपैकी सत्तावन टक्के लोक म्हणाले की, आपल्याला दारू खरोखरीच आवडते, असे आपण अजूनही खात्रीपूर्वक म्हणू शकणार नाही. म्हणजे मानवी शरीराची रचना निसर्गतः मद्यपानासाठी योग्य अशी केलेली नाही. दारूची चव व नंतर तिचा हव्यास या दोन्ही गोष्टी कृत्रिमरीत्या पैदा केलेल्या असतात. शिवाय आपले आयुष्य कमी करणारे पेय आपखुषीने घ्यायला कोण तयार होईल ?

मद्यपान करणाऱ्या लोकांपैकी फक्त एकवीस टक्के लोक ६० वर्षे वयाच्या वर जगतात. अमेरिकेत ८० लाख मद्यपी असून त्यांचा प्रश्न हा सार्वजनिक स्वास्थ्याच्या क्षेत्रातील तिसऱ्या क्रमांकाची समस्या समजला जातो. फ्रान्समध्येही मद्यपानाचा प्रश्न स्वास्थ्याच्या क्षेत्रात फार मोठा गणला जातो. अमेरिकेत दरवर्षी पन्नास हजार अपघात रस्त्यावर होत असतात, त्यांतले ६५ टक्के मद्यपानामुळे होतात, असे म्हणता येईल.

### खरीखुरी जीवन-संहिता

भारतीय तत्त्वज्ञानाच्या प्रेमात पडलेले एक अमेरिकन प्राध्यापक नुकतेच भारताला येऊन गेले. त्यांचे मत :

बौद्धधर्माबद्दल मला वाटणारे आकर्षण केवळ पुस्तकी नाही. माझ्या मते बौद्धधर्म म्हणजे एक खरीखुरी जीवन-संहिता आहे.

ती बातमी अशी संध्याकाळी ऐकली; आणि कोठल्या कोठल्या आठवणी मनात साकारल्या! जुने तीस-चाळीस वर्षांपूर्वीचे जीवन दृष्टीसमोर स्वच्छ उभे राहिले. कसेसेच वाटले.

सत्तावीस-अठ्ठावीस साल असेल. मी असेन तेव्हा दहा-बारा वर्षांचा. मे महिना होता आणि घरात प्रतिवर्षाप्रमाणे कुणाचे तरी लग्न होते. खूप वऱ्हाड जमले होते. घर नुसते दुमदुमत होते.

# एक संध्याकाळ

श्री. ज. जोशी

सूप वाजले आणि दुसऱ्या दिवशी रात्री 'स्वयंवर' बघण्याचा कार्यक्रम ठरला. तोही सालाबादप्रमाणेच! त्या दिवसांत नाटकाला जाणे म्हणजे छोटचाशा सफरीला जाण्यासारखेच असे. घरातल्या बायका आणि आम्ही मुले रात्री आठ-साडेआठ वाजताच घराच्या बाहेर पडलो. बायकांनी अंगावर शेले घेतले होते. त्यांच्या पायांत लालचुटुक पुणेरी जोडे होते. आमच्या हातांत पाणी भरलेले फिरकीचे मोठे तांबे, भाजलेल्या दाण्यांचे डबे आणि लहान मुलांसाठी दुधाच्या वाटल्या होत्या. उत्सुकतेची तार खेचली गेली होती.

चालत चालत आम्ही किर्लोस्कर थिएटरपाशी आलो. बाहेरच्या बाजूला बरीच गर्दी होती. डाव्या हाताच्या जिन्याने तिसऱ्या मजल्यावर गेलो; आणि उजव्या हाताच्या बाल्कनीत जाऊन बसलो. प्रेक्षागारात अगदी तुरळक लोक होते. मखमलीचा लालसर पडदा रुळत होता. त्यातून पांढऱ्या शुभ्र फुलांची माळ बाहेर डोकावत होती. ऊद घातला होता. त्याचा वास वातावरण धुंद करीत होता.

मला ते सगळे नवीनच होते. तास-दीड तास कसा संपला हे कळलेच नाही; मग घंटा खणखणली. ऑर्गन वाजायला लागला. तबल्यावर थाप पडली आणि पडदा उघडला....मी बघतच होतो....पहिला प्रवेश सुरू झाला होता आणि थोडयाच वेळात उजव्या हाताच्या विंगकडून "दादा, ते आले ना" हे अतिशय गोड सायी-सारखे मुलायम शब्द ऐकू आले आणि त्या पाठोपाठ काळी चंद्रकळा नेसलेली,

सुंदर, गोल चेहऱ्याची लाडीक रुक्मिणी दिसली....' दादा, ते आले ना ' हे सौंदर्य मनामध्ये ठसले, ते कायमचे ! त्या सुंदर आकृतीने त्या वयातही माझ्या मनाचा कबजा घेतला....इतकी वर्षे झाली, तरी अजून काही विसरलोच नाही.... 'नृपकन्या तर जाया '...या पदाच्या लहरीबरोबर बालगंधर्वांच्या अंगावर विलसणारे रंग...ठुमकत ठुमकत दोन्ही विंगमधून येणाऱ्या गाई... 'अति आनंद फुलवी कलिका ' हे मास्टर विष्णूचे पद चालले असताना गंधर्वांच्या मानेचे हेलकावे... छे:! ते विसरणं शक्यच नाही...'संशय कल्लोळ' मध्ये 'रुमझुम रुमझुम' हा रेवतीच्या नूपुरांच्या आवाज अश्विनीशेटने ऐकला नाही !—तो मी ऐकला....चोरांच्या टोळीनं लक्ष्मीधराची फजिती केली आणि गर्भगळीत होऊन ' तुज मी ! शरण आजि माफ मजला करा ' अशी याचना त्याने केली आणि भामिनीने जनानी ऐटीने तलवार फिरवली. यातील सौंदर्यानं मला बेहोष केलं आहे....ती बेहोषी अजून उतरलेलीच नाही.

गंधर्वांना कुठे कुठे बघितलं याच्या आठवणी सारख्या होत आहेत. कुणाच्या तरी ओळखीनं अगदी लहानपणी गंधर्व कंपनीच्या रंगपटात गेलो होतो. बाहेर नाटक चालू होतं. आत खुर्चीवर नऊवारी शालू नेसून रुक्मिणी हातात पुस्तक घेऊन बसली होती. केसांचा मला मोठा अंबाडा होता...कुणीतरी पुटपुटलं ' बालगंधर्व !'

...गंधर्वांनी समाधीतून जागं व्हावं, त्याप्रमाणं डोळे उंचावले आणि आमच्यावर क्षणभर दृष्टीची बरसात केली...असेच श्रावणातले दिवस होते. पाऊस ठिबकत होता. मी एकटाच भांडारकर इन्स्टिटयूटच्या बाजूनं हिंडत होतो. त्या वेळी तिकडच्या बाजूला मुळीच वस्ती नव्हती. रस्ते जवळ जवळ निर्मनुष्य होते. मी पुढे चाललो होतो...इतक्यात पाय थबकले. कानांनी काही स्वर्गीय ऐकले. मी टवकारून अंदाज घेतला...स्वच्छ खडीसाखरी आवाजात स्वर येत होते. " माडीवरी चल गऽ गडे जाऊ झडकरी "...झडकरीच्या ' री ' वर आवाज असा काही गंमतीदार फिरला, की सर्वांग बहरले. ...एका छोटयाशा बंगल्यातून ते स्वर येत होते. झपाटल्याप्रमाणे मी तिकडे चाललो. आता पाऊस जोराने कोसळायला लागला. पण त्याचं भानच नव्हतं...त्या सुरांच्या दोऱ्यांना लोंबकळत मी त्या अनोळखी बंगल्याच्या दुसऱ्या मजल्यावर कसा पोचलो हे कळलंच नाही...वर दिवाणखान्यात मध्यभागी खाकी हाफ चड्डी आणि पांढरा शुभ्र शर्ट घातलेले बालगंधर्व बसले होते. समोर पेटीवाला होता. ' जाऊ झडकरी 'ची तालीम चाललीच होती. मोडकळीस आलेल्या गंधर्व कंपनीचे पुनरुज्जीवन करण्याची ती धडपड होती. पाऊस जोराने कोसळत होता. आणि गोड गळा गंमतीदार फिरक्या घेत होता.

किती वेळ असा गेला कुणास ठाऊक! ते सप्तसूर थांबले आणि मग भान आले. मी आसपास पाहिले. तो हॉल तर माणसांनी भरलेला होताच. पण खालचे पटांगण

भरले होते. हिंडायला निघालेला जो कोणी भाग्यवान माणूस त्या वेळेला त्या-ठिकाणी दैववशात आला, तो तिथेच अडकला. मी तिथे गेलो त्या वेळी हॉल रिकामा होता. नुसतेच स्वर होते..." माडीवरी चल ग गडे जाऊ झडकरी !"

त्यांच्या पडत्या काळात कुठे कुठे गंधर्वांची भजनं होत. पुण्यात त्या दिवसांत ती एक अपूर्व पर्वणीच होती. कुणीही जावं आणि मोफत सप्तसुरांचा उपभोग घ्यावा. असं एक भजन ऐकलेलं आठवतं. भजनी मेळा होता. टाळ नि मृदुंग वाजत होते. मध्यभागी बालगंधर्व होते. मलमलीचा लांब शर्ट, देखणा गौरवर्ण,वाटोळा चेहरा .. त्यावरून प्रसन्नता ओसंडत आहे. कपाळाला बुक्का, अर्धोन्मीलित डोळे,...ज्ञानेश्वरांची आरती चालली होती....' अवतार पांडुरंगा—नाव ठेवीले ज्ञानी ' हे कडवं मधात घोळवलं जात होतं ..' नाव ठेवीऽऽले ज्ञानी ' ...' वी ' सोडल्यानंतर ' ले ' ला पोचेपर्यंत त्यांच्या सुरावटीने खरोखरच इंद्रदरबार उभा केला...अनेक भजनं ऐकली. तसं सौंदर्य पुन्हा दिसलं नाही.

माझ्या वडिलांचे परिचित श्रीगोंदेकेर यांच्या मुलीचे लग्न होते. मी जेवायला गेलो होतो. पीतांबर नेसून उघड्या अंगाने बालगंधर्व पहिल्या पानावर बसले होते ..हातांत जिलब्यांचं ताट घेऊन मुलगी वाढायला आली आणि राजहंस-काकांना आग्रह करायला लागली. नारायणराव हसत म्हणाले, " तू सुंदरशा उखाण्यात नवऱ्याचं नाव घे. मी एक जिलबी घेईन."

हातातले चांदीचे ताट सावरीत मुलगी म्हणाली, "मी उखाणा घेईन, पण तुम्ही एक गाणं म्हटलं पाहिजे."

मधुर हास्य करीत बालगंधर्व म्हणाले, " तू जितके उखाणे घेशील, तितकी गाणी म्हणीन."

लोकांचे हात खोळंबले. समोरच्या सुग्रास अन्नाची आसक्तीच संपली...' शारदे '-पासून गाण्यांची सुरुवात झाली...' मूर्तिमंत भीति उभी' झालं...वल्लरीचं ' म्हातारा इतुका 'ही झालं...पण ते गायनचक्र शारदेवरच थांबलं नाही. स्वयंवर, मानापमान, संशयकल्लोळ, एकच प्याला, सगळीच पदं त्या दिवशी गंधर्वांना गावी लागली. पंगत दोन—अडीच तास चालली. पण एक जिलबीही संपली नाही ..अशी पंगत पुन्हा होणे नाही.

गंधर्वांचं प्रेम हे आमच्या कुटुंबाचं व्रत आहे. माझ्या वडिलांनी ' मानापमान 'चा अगदी पहिला प्रयोग बघितला होता. पुढे पंचेचाळीस— सेहेचाळीस साली ते पुन्हा ' मानापमान ' बघायला गेले. अर्ध्यापाऊण तासातच ते उठून आले आणि उदास चेहरा करून म्हणाले, " छे: बुवा ! फार वाईट झालं...बालगंधर्व म्हातारा झाला.." ' बालगंधर्व म्हातारा झाला ' ही बातमी त्यांनी त्यानंतरच्या दोन-तीन दिवसांत जवळ जवळ पन्नास—साठ वेळा लोकांना सांगितली असेल...गंधर्वांची पदं रेडिओवर दुसरा कोणी गात असला म्हणजे त्यांना संताप येई. ते चिडखोरपणाने रेडिओ बंद

करीत. आणि म्हणत, "नुसते धोबी आहेत लेकाचे !... नरडं आहे म्हणून 'मम-आत्मा गमला' हे पद गायचं धाडस करताहेत...ही पदं दुसऱ्या कोणी म्हणू नयेत, असा सरकारने कायदा करायला हवा." गंधर्वांविषयीचं प्रेम हा माझा पिढीजात वारसा आहे. त्यांच्या 'संयुक्त मानापमान'च्या आठवणी आमच्या घरात एखाद्या पोथीप्रमाणे जतन केलेल्या आहेत.

अलीकडे बऱ्याच वर्षांत त्यांना पाहण्याचा योग आला नव्हता. ऐकायला मात्र त्यांच्याविषयी बरेच येत होते. त्यांचे जुने बालमित्र दहा-पंधरा वर्षांपूर्वी त्यांना भेटण्यासाठी मुंबईस गोहरच्या घरी गेले होते. ते सांगत होते, "घर गलिच्छ होतं. आत जाताना बोळात, जिन्यावर, कोंबडीची पिसं आणि अंड्याची टरफल पड-लेली दिसली. कसला तरी उग्र दर्प त्या सगळ्या घरात होता...मला कसंसंच वाटलं...जुनी 'सौभद्र'मधली सुभद्रा आठवली. रुक्मिणीचा महाल आठवला... तिथलं वातावरण माझ्या मनाला फार खुपलं ...त्या दिवशी मलाही झोप आली नाही...' दादा, ते आले ना'...'खडा मारायचा झाला तर'...'शूरा मी वंदिले' ...'घास घेरे तान्ह्या बाळा'...आणि कोंबडीची पिसं, मटनाचा वास,– कुठंच संगती लागेना.

गेल्या वर्षापासून त्यांच्या प्रकृतीच्या बातम्या वर्तमानपत्रांत येत राहिल्या. हे सौंदर्य आता पंचत्वात विलीन होणार, हे मला कळलं. मी वाट पाहत होतो. दोन-तीन महिन्यांपूर्वी मी परगावी होतो, तेव्हा गंधर्व अत्यवस्थ आहेत, अशी बातमी वाचली आणि स्वतःच अस्वस्थ झालो......ते लौकर जाणार याची खात्री वाटत होती. त्या वेळी मी महाराष्ट्रात नसणार हे ठरल्यासारखं होतं. उगीचच वाटलं की गंधर्वांनी मुंबईत मरू नये......त्यांनी देह पुण्यात ठेवावा...प्रचंड प्रेत-यात्रा निघावी...पुढे भजनी मंडळीचे ताफे असावेत. टाळमृदुंग वाजत आहेत. ताटी पुष्पमालांनी भारंभार भरून जावी. लोकांनी घरांच्या खिडक्यांतून ज्ञाने-श्वरांच्या पालखीवर आंबे आणि फुलं उधळावीत, त्याप्रमाणे त्यांच्या अंत्ययात्रेवर फुलांची बरसात करावी.

दीड-दोन महिन्यांनी मी परत पुण्याला आलो...मृत्यूचं वेळापत्रक चुकलं होतं. गंधर्व अजून अत्यवस्थच होते...पण त्यांना पुण्याला आणले होते...मला बरं वाटलं. आता थोडाच अवधी होता. पुण्यात प्रेतयात्रा प्रचंड निघणार हे ठरलेलंच होतं. तिच्यांत मला सामील व्हायला मिळणार हेही नक्कीच होतं.

आठ तारखेला मी संध्याकाळी लक्ष्मीरोडवरून सहज चाललो होतो. डाव्या हाताच्या एका छोट्याशा दुकानावर पाटी होती 'नटसम्राट बालगंधर्व यांचे निधन' ...मी थबकलो. जवळ जाऊन नीट वाचले. खाली लिहिलं होतं, 'प्रेत ओंकारेश्वरावर नेण्यात आलं आहे.'

पुन्हा पुन्हा मी ती अक्षरे वाचली अर्थबोधच झाला नाही. प्रेत ओंकारेश्वरावर

नेलं आहे म्हणजे काय ?...मिरवणूक केव्हा निघाली ?... समोर लक्ष्मी रोड दुथडी वाहत होता. एवढा मोठा नटसम्राट निजधामास गेला आहे, याची कुणाला दखलच नव्हती.

मी दुकानदाराला विचारले. तो साठी उलटून गेलेला म्हातारा होता. त्याच्या डोळ्यांत मात्र दुःखाची छटा ओतप्रोत दिसली. त्यानं सांगितलं, "चार वाजताच गेले. नगरपालिकेच्या प्रेतवाहक गाडीतून स्मशानात नेलं..." 'नटसम्राटाला ॲम्ब्युलन्स गाडीतून नेलं !'...माझं मन हादरलं. सेंट हेलिना बेटात नेपोलियन मृत्यू पावला किंवा दोस्त राष्ट्रांच्या बॉम्बर्सचा वर्षाव होत असताना हिटलरने आत्महत्या केली. त्या मरणातील दैन्याप्रमाणे गंधर्वांच्या निधनातील दैन्य मला जाणवले.

घड्याळात साडेसहा वाजले होते. मी रिक्षा केली आणि झपाट्याने स्मशानात आलो...तेच जुनं स्मशान !...तीच मुळा–मुठा नदी !...ती दोघंही निर्विकारच होती.

मी मागच्या बाजूला गेलो. दोन–तीन प्रेतं निरनिराळ्या अवस्थेत जळत होती. एकाच्या ज्वाला जास्त मोठ्या होत्या. मी जवळ गेलो. दोन–तीनशे माणसांचा समुदाय तिथं होता. राजा गोसावी, शरद तळवलकर वगैरे नट दिसत होते. चिता धडधडत होती. उशाशी दोन–चार हार पडले होते. लोक हलक्या आवाजात काहीतरी कुजबुजत होते. खाली मुळा-मुठा वाहत होती. सुभद्रा, रुक्मिणी आणि भामिनी तिथे जळत होत्या.

माझे मन हादरले. कससंच वाटलं. का कुणास ठाऊक ! पण भजनी मेळ्यात बसलेली आणि 'अवतार पांडुरंगा, नाव ठेविले ज्ञानी' हा अभंग म्हणणारी बालगंधर्वांची आकृती आठवली...मन जास्तच खिन्न झाले. पांडुरंग, ज्ञानेश्वर, सुभद्रा, रुक्मिणी...आणि पुढे...कोठला माणूस कोठे गेला...जीवनात केवढे मोठे नाट्य घडले...नटसम्राट ॲम्ब्युलन्समधून स्मशानात नेला होता...

अर्ध्यापाऊण तासात तिथली माणसे पांगली. मी उगाच रेंगाळत होतो. दोन–दोन चार–चारच्या गटानं गावातले लोक येत होते. आणि आश्चर्य करीत होते. थोड्याच वेळात ते स्मशान निर्मनुष्य झाले.

मी मग तिथून निघालो आणि कसब्यातून किर्लोस्कर थिएटरकडे गेलो. मनात वाटले, गडकरी मास्तर असेच या रस्त्याने थिएटरकडे जात असतील...जरा पुढे गेलो आणि थिएटर लागले. तिथे हिंदी सिनेमा चालला होता. पण माझ्या डोळ्यांपुढे मात्र 'स्वयंवर' दिसत होतं....'प्रभु अजि गमला मनी तोषला' हे पद कुणी तरी गात होतं...उदास वास दरवळला होता. मखमलीचा पडदा हलत होता... 'नरवर कृष्णा समान' या गाण्याचे सूर घुमत होते...पगडी घातलेल्या काकासाहेब खाडिलकरांचा सदाक्रुद्ध चेहरा दिसत होता. थिएटरकडे बघत बघत मी पुढे निघालो आणि पुन्हा लक्ष्मी रोडला लागलो...

२९ जुलै १९६७

# घायाळ आज पक्षिणी

मी बाजीची एकलीच मस्तानी। घायाळ आज पक्षिणी
संपला जरी दरबार
आठवे बोलकी नजर
ती प्रीतिरसाची धार
धारेत दिले मी स्वयें मला झोकुनी। घायाळ
डोळ्यांत तेज कृष्णेचे
हृदयात गीत गोदेचे
मनी दैवत शिवरायाचे
तो सह्यगिरी मी त्याची हो वनराणी ।। घायाळ
करी भुकेस मिरची हुरडा
तो होता स्वराज्य वेडा
वादळात उडवी घोडा
जळ होउनी मी कृतार्थ त्याच्या वदनी ।। घायाळ
रंगता विडयाची लाली
ती कनात हासे गाली
ती प्रीत तुफानामधली
नभी विजेपरी गेली मज दिपवुनी ।। घायाळ

*नीळकंठ दाते*

'घायाळ आज पक्षिणी' या कवितेतला विषय प्रसिद्ध आहे. लैला मजनू, शिरीं-फरहाद, रूपमती-बाजबहादर यांप्रमाणे बाजीराव-मस्तानी हे प्रेमी युग्म विख्यात आहे. या साऱ्याच जगविख्यात प्रेमकथा शोकांतिका ठरल्या ! बाजीराव-मस्तानी ही त्यातलीच कहाणी. प्रेमाने धुंद झाल्यावर व्यवहार आणि भवितव्य यांचा विचार कुठे राहतो ? मस्तानी नव्या भावविश्वातच नव्हे तर नव्या भू-प्रदेशा-तही आली. या स्थित्यंतराचे वर्णन नीळकंठ दाते यांनी तन्मयतेने केले आहे. काहीशी तांब्यांच्या 'झाशीवाली' या कवितेसारखी चाल आशयाला पोषक वाटते. शेव-टल्या कडव्यातला झोक आणि उत्कटता विशेष रसोत्कर्ष साधते. बाजीराव-मस्तानी ह्या विषयावर तसे पाहता याहून कितीतरी पटींनी अधिक आणि सरस वाङमय निर्माण व्हायला पाहिजे होते. दाते यांनी रचलेले हे भावगीत विषयाचा योग्य आदर करणारे आहे.

## स्वप्ने

डोळे मिटून स्वप्ने पाहिली
स्वप्नेच राहिली शेवटपर्यंत
नुसता भास...सुखविणारा
याहून काही नव्हते जिवंत
डोळे उघडले तो सारी
स्वप्ने स्वप्नेच उरली नव्हती
लाख दिशांनी संकटांची
भुते गिळाया आली होती.
शस्त्र परतले वीजरक्ताचे
दिशादिशांना घातला धाक
पारिजात सड्यासारखी
स्वप्ने उतरली आपोआप

*दत्ता हलसगीकर*

# आस्वाद

'स्वप्ने' या कवितेत दत्ता हलसगीकर यांनी काहीशा झपाट्याने एका विचित्र अनुभूतीला आकार दिला आहे. स्वप्ने डोळे मिटल्यावर दिसतात. आणि डोळे उघडल्यावर ती नष्ट होऊन दहा दिशांनी भुते धावत येतात. म्हणजे ध्येय किंवा कल्पनाविश्व नाहीसे होऊन व्यवहाराचा रखरखीत प्रदेश दिसू लागतो. पण वीज-रक्ताचे शस्त्र परजले म्हणजे नेमके काय झाले कळत नाही ! हे शस्त्र परजल्यावर स्वप्नांचा सडा पडला. हा सडा पडण्यासाठी डोळे मिटण्याची आवश्यकता नव्हती काय ? स्वप्ने पडतात का पाडता येतात ? मुद्दाम सक्तीने पाडलेली स्वप्ने सुंदर असणे शक्य आहे का, असे अनेक प्रश्न या कवितेतून निर्माण होतात. आणि त्यांची उत्तरे समाधानकारक रीतीने देता येत नाहीत. पण त्यामुळे काव्याला बाध येतो असे नाही. कारण, बिनचूक उत्तरे देण्यासाठी का काव्ये निर्माण होतात ? कित्येकदा प्रश्नांची गुंतागुंत सोडविण्यापेक्षा नवे प्रश्न निर्माण करणे, हेच काव्याच्या हृदयंगमतेचे कारण होऊन बसते.

**गोपिनाथ तळवळकर**

# आंत

**चारुता सागर**

ती यायची वेळ जशी जवळ येईल, मिनिट-काटा पाचाकडून सहाकडे झुकू लागेल, तसं मला काही सुचत नाही. अद्याप थोडा अवकाश आहे. पण आत बसवत नाही. कथेतील पात्र बोलत नाही. लेखणी जिथल्या तिथं थांबते. हुरहूर शिग गाठते. सारं टाकतो. तिच्यापेक्षा कथा काही नाही. बाहेर येतो. बागेतल्या आंब्याच्या डहाळीला धरून उभा राहतो. शीला आतून पाहते. तिला वाटतं...काय हे ! मी तर कसा सांगणार ! इतक्यात येईल. आलीच असेल. तिचं स्वागत करायला हवं. नाही केलं तर ? छेः, तसं कुठं झालंय ! माझी नजर रस्त्यावर पडते. ती येत असलेली दिसते. अगदी झप्‌झप् येत असते. आता जवळ येईल. खरं तेवढा दम कुठला. आंब्याची डहाळी सोडून पुढं होतो. हात वर करून हाक मारतो, " ओ ऽऽ नीता ! " रस्त्यावर पसरत ती हाक तिथवर पोचते. आपले दोन्ही हात वर उडवीत ती प्रतिसाद देते. " आ ऽऽ ले...ऽऽ " घमाट सुटते. दोघांमधलं अंतर सगळं तिनंच तोडू नये. मी पुढं होतो. क्षणात ती मला बिलगते. कोणी काही बोलत नाही. इतक्यात युनिव्हर्सिटीच्या घड्याळात साडेपाचचा ठोका पडतो. जिवाला मोकळं वाटतं. मघा जीव किती अवघडला होता. आता नजर जाते युनिव्हर्सिटीच्या टॉवरकडे. त्यावरून धावणाऱ्या मोकळ्या आभाळाकडे.

आम्ही दोघं बोलत येतो. आता घटकाभर काही नको. दिवसभर माझ्या मनात कोंडून राहिलेलं बोलायचं आहे. पण शीला कुठलं जमून देते ! " नीता ये. हातपाय धून घे. " माझ्याबरोबर ती चहा घेते. दोन बिस्किटं कुरतडते. तिची मैत्रिण एव्हाना दारात उभी असते. मी विचारतो, " काय ग कल्पना ? "

" काही नाही नीता. " कल्पना मोजकं बोलते.

नीता तिच्याकडे पाहते अन् दोघी अंगणात होतात. त्या दोघीत मी. काहीतरी भलतंच ! शिवाय लोक काय म्हणतील, हा विचार एक आहेच. हाताला हात धरून त्या दोघी झाडाखाली होतात. त्यांचं जग वेगळं. शरीरानं जवळ गेलो तरी मनानं जवळ जाता येणार नाही. मीही बालपण जगलो. पण त्यातली एकही स्मृती जवळ नाही.

कथेला सुरुवात करतो. कुठवर आलो होतो ? ओ ऽ ह...सगळं विसरलं. मेळ लागत नाही. कथा जमत नाही. शीलाला बोलवितो. तिच्याबरोबर कथेची चर्चा केलेली असते. तिचे शब्द, माझी कथा जमत नाही. पण लिहायला सुरुवात करतो.



नाहीतर ती नाराज होईल. एक एक शब्द घडवीत असतो. तोच हाक, "दादा, आम्हांस आंब्याचे डहाळे हवेत. आम्ही आंबे लावणार आहोत. दादा ऽऽ"

सारं बाजूला सारतो. आंब्यावर चढतो. तिचे आंबे लावतो. उतरतो. पिकत घालतो. आता त्यांचं जग. माझे अस्तित्व संपते. अंधार पडू लागल्यावर तिला बळेच बोलवावे लागते. किती तरी वस्तू गोळा केलेल्या. त्या तशा सोडते. उद्याचे उद्या! अद्याप हातानं जेवत नाही. भरवावं लागतं. कुशीत घेऊन ऊब द्यावी लागते. एकटी नाही झोपत. "दादा, तुम्ही पण झोपा." ती म्हणते. मला झोपावं लागतं. चिमणा हात अंगावर टाकून बिलगते.

एवढी एकच सवितेची आठवण आहे. दुसऱ्या अनेक आहेत. पण क्षणाक्षणाला तिचा भास होणारं नीता हे प्रतिरूप आहे. मरताना तिचा जीव लवकर गेला नाही. जेव्हा मी नीताला जवळ घेऊन सांगितलं, "सविता, थोडंसुद्धा नीताला विसरणार नाही. तू तर चाललीस. आता माझ्यापाशी नीताखेरीज काय उरलंय!" चार दिवस ती मृत्यूशी झुंजत होती. ज्यासाठी मरू नयेसं वाटत होतं, तिला सांभाळण्याचं वचन मी दिलं होतं. माझी मुलगी मी सांभाळणार नाही, असं नव्हतं. कुणीही बाप आपल्या अपत्याचा सांभाळ करतो. ते कुणी सांगावं लागत नाही. खरं म्हणजे त्याकडे दुर्लक्ष होता कामा नये, एवढंच सवितेला सांगायचं होतं. अन् तसं घडू नये म्हणून तीन-चार आलेली स्थळं मी पूर्ण डावलली. माझा तूर्त विचार नाही अशी बोळवण केली. नीताला सावत्र आई! ती कल्पनाच मला सहन झाली नाही. नीताच्या अपत्यप्रेमात भागी नाही.

आता तिची-माझी संगत अशी जमली आहे की, ती नसली की मनाचा मोर नाचत नाही. पारवा घुमत नाही. कोंबडी करकरत नाही. सारं स्तब्ध ! अचेतन ! एवढ्या मोठ्या आभाळात कुठं बघाव म्हटलं तर ढगाचा टिपूस दिसत नाही. कथा पुढं धावत नाही. वास्तू खोळंबून आहे. शब्द गवंड्याने घडून टाकलेल्या दगडागत पडून आहेत. घरात असली तर किती दंगा, किती गोंधळ. " दादा हे काय ? दादा ते काय ? मला नवा फ्रॉक हवा. पुस्तक हवं. हे नको. फाटलंय ! " " नको तर नको. दुसरं आणतो. " " नाही आत्ता आणा आणि भावली पण आणा. मोठी आणा. " तिला हूं हूं म्हणता म्हणता जीव बेजारून जातो. तसं जिवाला हलकं वाटतं. शिवळ पक्षी अंतराळात शीळ घालताना वाटावं तितकं. हवेत उडणाऱ्या परासारखं. मनाचा फुलोरा फुलतो. मोर नाचतो. पारवा घुमतो. शब्दांचा गंध दरवळतो. हिना, केवडा, गुलाब, सारं काही. कार्तिकात फुललेल्या चांदण्या रात्री इतकं प्रसन्न. शरदातल्या चांदण्यासारखं स्वच्छ. कर्दळीच्या पानावर पडलेल्या दवबिंदूसारखं निर्मळ. कथा पुढे धावू लागते. असं तिचं आणि माझं मुलखावेगळं प्रेम. सवितेला दिलेल्या वचनासाठी नाही, लोभच जडला असा. तिचा शाळेतला विरह तेवढा सहन होतो. पाच वाजल्या-वर तिची घरी यायची घाई असते. अन् ती येणार म्हणून मी स्वागताला उभा असतो.

पाच वाजलेत. तिची शाळा सुटली असेल. रोजच्याप्रमाणे मी उभा आहे. कलत्या शरीराला झाडाचा आधार आहे. डोळे तिच्या वाटेकडे खिळून आहेत. क्षणाक्षणाला मनाची अधीरता वाढत आहे. काळीज धाकधुकत आहे. आता साडेपाचचा ठोका पडेल. आलीच असेल. खालच्या वळणाला किंवा वरचा चौकात. तिच्या मानानं शाळा थोडी लांब आहे. एक मैल अंतर चालून यायला अर्धा तास लागतो. चिमुकले पाय. हातात पिशवी. पायांत चप्पल. सारा घोळ. आणि हे सावरत कितीसं अंतर तोडणार ? तरी चालत असते. धारवाडात अवघ्या दोन मराठी शाळा. ती जाते ती माळमड्डी. सुरुवातीला तिचे आजोबा ११ ला पोचवत होते. ५ ला आणत होते. सहा वर्षांचे वय. स्वत: जाण्यायेण्याचं नाही. त्यात कानडी मुलूख. नीताला तर मराठी-शिवाय काही कळत नाही. शाळेत गेल्याच्या दुसऱ्याच दिवशी दुपारी जेव्हा ती एकटीच परतली, तेव्हा मी गारच झालो. ही एवढी लहान. अन् तीन-चार रस्ते ओलांडून आली कशी ? जिथं माझ्यासारखा मोठा माणूस नव्यानं चुकतो, तिथं ही एकटी आली ! आणि आली तरी कशी ? हे गिरीधर निवास सापडले तरी कसे ? एवढी वाहनं. कुठं सापडली कशी नाही ? कुणा मवाल्याच्या नजरेतून कशी बचावली ? विचार करण्याची माझी मतीच कुंठली. ही इथवर आली हेच विलक्षण. ती शाळाच नको. बघू पुढल्या वर्षी. तोवर तिचे शिक्षक, घाबरलेले, घामेजलेले, कानडी सुरात, " मुलगी आलीया काई ? " ' होय ' म्हटल्यावर त्यांचा श्वास सुटला. चेहरा हडकला. घाम टिपत म्हणाले, " डोळा चुकवून कशी आली कळालं नाही. शाळेत नाही. गेली

कुठं ? मी घाबरलो. लहान हो. काय झालं, कुठं चुकली, काय करायचं. बरं झालं. चुकली असती तर काय केलं असतं ?"

"बसा, चहा घ्या." शीलाचे पण हेच शिक्षक. शीला बी. ए. झाली. पण हे अद्याप पहिलीच शिकवितात. ती अगत्याने पुढे म्हणते, "जाऊ नका. चहा टाकते." "छे: छे:, सगळी मुलं शिक्षक हुडकतात. नाही सापडली तर मी पोलिसांत वर्दी द्यायला सांगितलीया. चलतो. येईन केव्हातरी," ते म्हणाले. त्या दिवसाचा हा प्रसंग. नीता ही अशी. मी नकोच म्हटलं, तरी तिची शाळा सुरू झाली. रोजच्या रोज जा-ये. अन् तिला रस्ते परिचयाचे आहेत. अन् गाव. ती एकटी जाते. एकटी येते. क्वचित कोणी जातं.

काटा साडेपाचला जवळ आहे. आत्ता टोल पडेल. माझी नजर लांबते. ह्या वेळेला दिसायला हवी. थोडी रेंगाळली असेल. नजर पुढं धावते. रस्त्यावरचे चेहरे न्याहाळते. मुले येत आहेत. ही कानडी. यांना मराठी येत नाही. मला कानडी जमत नाही. कुणाला विचारणार ? नाही. ह्या मुलांत नाही. तिची पोझ, चाल, ऐट, लांबूनही ओळखू येते. काय साडेपाच ! आतून शीला बाहेर येते. तिला पितापुत्रीचं प्रेम बघायचं असतं. ती विचारते, "काय भाऊजी नीता आली ?" माझ्या काळजातला प्रश्न.

"नाही शीला, नीता आली नाही." उत्तरात किती अधीरता. आवाजांत आर्तता.

ती म्हणते, "येईल आता. वेळ झालीयाच." अधीरता, हुरहूर, काळजातली धाकधुक. इथंच उभं राहवत नाही. सैनिकाने शत्रूची टेहळणी करावी, तशी नजर रस्त्यावर फिरते. तिचा हा रस्ता. याच रस्त्यान ती येते. धारवाड-गोवा रोड. यास फ्रॉंटियरही म्हणतात. पोरीनं केस विंचरून पाठीवर वेणी सोडावी असा काळा टार रोड. तांबड्या मातीतून उठून दिसतो. धुतलेल्या म्हशीच्या पाठीगत काळाभोर. मिनिटामिनिटाला मोटरींची धुडं धमवतात. ट्रक्स भरलेल्या, मोकळ्या. सिटी बसेस, एस. टी. च्या गाड्या, जाणाऱ्या-येणाऱ्या. त्यात टांग्यांची धमाल. गवळ्याच्या घरी परतणाऱ्या गाई-म्हशींची गर्दी. शाळकरी पोरं मोटारवाल्याला भीत नाहीत. एखादं आडवंच जातं. ड्रायव्हर हॉर्न दाबतो. तोंड बाहेर काढून एक शिवी हासडतो, "साला, मरता है क्या रे ?" तोवर समोरनं गाडी येते. स्टिअरिंगची पकड घट्ट होते. पाय ब्रेकवर रेडी असतो. दोघं एकमेकांना घासून जातात. बोटाच्या अंतरामुळे ओरबडत नाही. ड्रायव्हर काय बडबडला ? त्या कानडी मुलाच्या लक्षात येत नाही. ते फक्त बाजूला पळते. कडेनं मोठाला जळणाचा भारा घेतलेली तरणीबांड बाई कंबर करकरत जात असते. त्याच्या हावऱ्या नजरेतनं सुटत नाही. तिची टच् भरलेली छाती ह्याच्या काळजात रुतते. "हाय तेरी जवानी" किन्नर अबदुल्या साद देतो. 'कर्रर ऽ ऽ' मोटरीची चाकं फरकटली. ड्रायव्हरनं हॅंडब्रेक ओढला. ट्रक जिथल्या तिथं थांबला. माझ्या छातीत चर्रर्रं झालं. नीताएवढंच पोर. मेलं असतं. नव्हे शरीराच्या चिंधड्या चिंधड्या झाल्या असत्या. नाही, लहान मुलाने यायचा रस्ता हा नाही.

माझ्या काळजाचं पाणी होतं. मी शीलाला आवाज देतो, "शीला!" ती हातातले काम सोडून धावते.

"काय भाऊजी?"

"अग, नीता आली नाही. साडेपाच होऊन गेलेत. आतापर्यंत यायला हवी होती."

"काय, नीता आली नाही?" ती घड्याळात पाहते. "पावणे सहा झालेत. यायला पाहिजे." माझं काळीज हलविणारं तिचं बोलणं. माझ्याच्यानं थांबवत नाही. डोक्यात एकच चक्कर. नीता यायला हवी. का आली नाही? कुठं मघासारखीऽऽ ...छे: ! छे:! असला अभद्र विचार...पण मन अशा वेळी असलाच विचार चिंतते. रस्ता तर चुकली नसेल? तो चिमणा जीव एकटा! कुणी मवाल्यानं नसेल ना उचलली! का घडणार नाही? महिन्यापूर्वी एक मुलगी अशीच बेपत्ता झाली. वृत्तपत्रांतून कितीतरी बातम्या येतात. मुलं पकडणारी टोळी. संन्याशी–भिकारी अशांतले नाना लोक आमिषं दाखवून लहान मुलांना पळवितात. विकतात. डोळे काढून विद्रूप करतात. भीक मागायला लावतात. मुली कुंटणखान्यात विकतात. जास्त नाही. अवघ्या दोनशे–तीनशेला. त्या बालमनावर काय गुजरत असेल? ती आपली व्यथा कशी दडवत असेल? काळजाचा खोंबारा काढणारा प्रश्न! मघाचाच प्रसंग. नशीब म्हणून ते पोर वाचले. हे ट्रकवाले. गावठी ढोसून गाड्या हाकतात. कोण मेलं तर ह्यांचं काय होतंय. पैसा ओतला की निर्दोष. हा जाणून बुजून केलेला खून नव्हे. हत्या! नव्हे नजरचुकीने घडलेला अपराध इतकंच. पण नीतासारखं निष्पाप अर्भक त्याला बळी पडतं आणि ज्याच्या हाडामांसाचं आहे, ज्यानं कटीखांदी खेळविलं आहे, तळहातातल्या फोडागत जपलं आहे, त्याचं काय? त्या आतड्याचं काय? याची कल्पना त्या आतड्याला! चट् चट् पाय पुढे पडतो. तोबा गर्दी. अशात ती चुकणारच. मी पाठवून द्यायला नको होती. खरं माझं ऐकलं कुठं जातंय. हाच तो पहिला चौक. कर्नाटक हिंदी प्रांतिक सभा. पोलीस उभा आहे. पण त्याला काय ठाऊक असणार. तो वाहतुकीवर नियंत्रण करणार का मुले पाहणार? त्याची ती ड्यूटी नव्हे. रस्त्याचा चेहरान् चेहरा पाहतो. कुणाच्या आडनं असेल. चुकली म्हणून कोणी धरली असेल, नाही तर एकटी म्हणून–पुढं धावतो. नाही. तिच्या वाटेवर नाही. शाळेला कुलपं. व्हरांड्यात फक्त दोन रोगी बसलेत. शिल्लक होतं तेही काळीज संपलं. आता कुठं हुडकणार! या वेड्यावाकड्या पसरलेल्या शहरात. कुठं धावणार, कसा ओरडणार? पंचक्रोशीत घुसणारी माझी हाक या गोंगाट-गर्दीतून फर्लांगही पुढं जाणार नाही.

कुणाची ओळख नाही. हे शहर तिला नवीन. सवितेच्या मृत्युनंतर तिला आणली. लहान आहे. खेळेल आजोळी, वाढेल आजोळी, ही भावना. जिवाला लावून सांभाळीन. सवितेला वचन दिलं होतं. सविता गेली.

" मी जाते. पण जाते म्हणू नका. नीता आहे ना मागं. पाहा माझंच प्रतिरूप आहे. माणसानं आत्म्यावर प्रेम करावं म्हणतात. तुम्हीही म्हणता. माझाच आत्मा ही नीता आहे. पाहा तर... "

तिचे डोळे डबडबले. अश्रूंचे दोन थेंब नीताच्या हातावर पडले. ' सवि ! ' माझा लाडका शब्द बाहेर पडला. तिला हुंदका फुटला. " गप्प. हे काय ?" वेळ संपत आली होती. पोटाशी धरलेली नीता माझ्या स्वाधीन केली. तिचा अमोल ठेवा पोटाशी धरला. तिची महाप्रयाणाची तयारी चालली होती. ती आता कधी परतणार नव्हती. कधी नव्हती. जे स्वाधीनचं नव्हतं ते घडलं होतं. पण नीता. कुठाय ? नीता ! कुठं गेली; कोणत्या रस्त्याने गेली. का कोणी उचलली ? उचलीच असेल. तसं तिचं रूप आहे. राम सीतेसाठी वेडा झाला होता. झाडांना, वेलींना तो सजीव समजून विचारत होता. 'माझी सीता तुम्ही पाहिली का ? कुठं दिसली का ? ' ती त्याची पत्नी होती, परकुळातली होती. आणि नीता ! माझ्या रक्ताची, हाडामांसाची, या हातानं तिला भरविलं, खेळविलं. छातीशी घेऊन झोपलो, थोडीथोडकी नाहीत. पाच वर्षे. पुरुषी अंतरात आईचं आतडं केलं. थोडं हूं केलं की डोळा उघडत होता. हात थोपटत होता. प्रत्येक गोष्टीची मी तिची काळजी घेत होतो. कुणावर विसंबत नव्हतो. आईचं सुख तिला नाहीच. आई म्हणायच्या वेळी तिच्या जिभेवर ' दादा ' आले. आणि माझ्या मुखात ' नीता. ' नीता, कसला मी तुझा बाप ! साधं मला सांभाळताही आलं नाही. नाही, असं नाही व्हायचं. तुला शोधून काढीन. काढायलाच हवं. नाही तर मला चैन पडणार नाही. झोप लागणार नाही. श्वास कोंडेल. आणि जीवही जाणार नाही. तुला शोधायचे आहे. त्याशिवाय मी पिता कसला ? पालक कसला ? कदाचित स्टेशन रोडन गेली असशील. कशाच्या तरी नादात; तंद्रीत. किती केलं तरी तू लहान. सहा वर्षांची पोर. मला धाकधुक होतीच. एखादे दिवस तू चुकशील. कुणी तरी तुला पळवून नेईल आणि तुझे डोळे काढून अंध करील. चेहऱ्यावर तापलेल्या सळीच्या डागण्या देतील. ' दादा ! ' म्हणून तू किंचाळशील. आकांत करशील. तुझा विद्रूप, अंध चेहरा; हे भिकारी तुला भिक्षेचे साधन करतील. अन् याच वयात जगाची ओळख होऊ नये म्हणून या रस्त्याने त वर गेलीस काय? पण हा रस्ता घराकडे येत नाही. स्टेशनला जातो. मुंगळ्यासारखी माणसे आहेत. पुढं जायला जागा नाही. आणि नीता कोणाला माहीत नाही. ती चुकली हही माहीत नाही. माझ्या हृदयाची कालवाकालव झाली. प्रत्येकजण बाप आहे. पण एका हरवलेल्या मुलीच्या बापाचे, त्याच्या व्यथेचे अंतःकरण कोणी समजू शकत नाही. किती मोठ्याने ओरडलो, " अहो माझी ऽ ऽ माझी नीता चुकली हो. आत्ताच चुकलीय ती. रस्ता हरवून भलत्याच रस्त्याने गेली. कुणी पाहिली का ? कुणाला दिसली का ? सांगा. बोला ! नाही ? तुम्हा कुणाला दिसली नाही ? तुम्ही पाहिली नाही ? तेवढीच आहे माझी. अद्याप

या हातानं भरवितो. चिमणे-चिमणे घास तोंडात घोलतो. तुम्हा एवढ्या माणसांना सापडली नाही? जंगलात सापडली असती. पण इथं माणसात सापडणार नाही! खरं आहे तुमचं. माणसातच सापडत नाही. कोणी तरी उचलतं. तसं माझ्या नीताला ... 'नीता ऽऽ! नीता ऽऽ!!' काय, माझा आवाज बाहेर पडला नाही? नाही. ओरडलो, घसा फोडून ओरडलो, पण आवाज नाही. शरीर धावत आहे. डोळे बघत आहेत. हेच स्टेशन. हेच भिकारी. हे प्रवासी. हा आडोसा. नाही. असती तर दिसली असती. ती दडेल कशी! फूल आहे. फूल, गुलाबाचं; चाफ्याचं. कसं दडून राहील? आता सुभाष रोड. मग इतर रस्ते. गल्ल्या, बोळ, डाकूंचे अड्डे भिकाऱ्यांची पालं. सारं काही. पोलिस स्टेशनला वर्दी. "हॅलो, पुलिस स्टेशन. मी देसाई बोलतोय. कन्नड इल्ला, मराठी हिंदी बर्तती. मेरी नीता नामकी लडकी, छे बरस. स्कूल छुटने के बाद कही रस्ता भूल गयी है. अब सात बज चुके है. पत्ता नहीं. बाल कटवाये है. रंग गौर है. कन्नड नही. आता मराठी. शुक्रीया—"

हा सुभाष रोड. ए. सी. सी. बँक. पुढला सुभाष चौक. कधी तरी मी नीताला इथं आणीत असे. तिचा खाऊ, तिची खेळणी., तिची पसंती, तिला हवं ते, खूप हट्ट पुरवताना कौतुक वाटे. मुलांचे हट्ट न पुरवले तर मुले कुढत राहतात. त्यांच्यांत विकृती येते. त्यांच्या मनाचा विकास होत नाही. आपले हट्ट कुणीच पुरविले नाहीत. मी एकटी असून...असं वाटायला नको. ह्या धारवाड रेस्टॉरंटमध्ये तिला हवे ते खाऊ घालीत होतो. काय आठ...अद्याप नाही सापडली, रस्ते दिव्यांनी उजळलेत. बोळ नाहीत. 'संयुक्त कर्नाटका'त जाहिरात द्यायला हवी. बक्षीस ठेवायला हवे. किती १००, ५०० शे. छे:, याहून मोठं म्हणजे कोणीतरी या लोभानं परत देईल. एक हजार. शिवाय वर खुशीचे. साडेआठला दुकाने बंद. जो तो घरी परततोय. सिटी बस स्टॉपवर कोण गर्दी. रोजची ही सगळी माणसे आहेत. कोण चुकले नाही? गमावले नाही? माझी नीताच कशी चुकली?

घरी परतत होतो. आता माझं तिथं काही नव्हतं. पण वाटलं आली का पाहावी. पाय उचलत नव्हता. याच वाटेवर नीतासह कितीदा फिरलो. हिंडलो. आता तिचं अस्तित्व गिरीधर निवासमध्ये उरलं नाही. अनंतात पसरलं. उद्यापासून तिच्या शोधाचं क्षेत्र किती व्यापक झालं! तेच माझं एकमेव कार्य! काय सापडेल? फार कठीण. शीला वाट पाहत असेल. म्हणून पाय उचलतात. तिला सांगितलं की संपलं. चार अश्रू ढाळील. स्त्रिया आपलं दु:ख अश्रूवाटे मोकळं करतात. पण पुरुष! अशा यातना इंगळीच्या दंशातही नसतात. अंगात कसला त्राण नाही. कशाचा तरी आधार. निदान हे ओरडून दु:ख सांगायला तरी. वाटतं छातीचा भाता फुटेपर्यंत तिला हाका मारीत सुटावं. नीता ऽऽ! नीता ऽऽ!!

"काय भाऊजीऽऽ?" शीलानंच पुढचं उत्तर दिलं. "काय, नाही सापडली नीता?"

मी नकारार्थी मान हलविली नाही. तिला याचं दुःखं झालं असेल. नाही कसा म्हणू. त्या शिवाय का ती स्तब्ध झाली ? माझ्या आतड्याची कालवाकालव तिलाच नव्हे परमेश्वरालाही कळायची नाही. दुःख स्वतः भोगण्यासाठी असते. आता हे घर रितं आहे. माझ्यापुढं उभी राहिलेली शीला रिती आहे. जग रितं आहे. फुंकर मारली तर उडून जाईल इतकं हलकं. —

मी आंब्याच्या डहाळीला रेलून आहे. इथंच तिचा डाव असायचा. कल्पना अन् ती. काल होती. आज नाही. कल्पना आहे. नीता नाही. घरी अनेकजण येतात. चौकशी करतात. कानडीत सगळे. मला कळत नाही, मी स्तब्ध आहे. तिची हाक. 'दादा ! दादा !! ' अरे, ते कोण ओढून नेतंय ? "नीताऽऽ ! नीताऽऽ ! ! आलो. आलो. अरे सोड. ती माझी आहे. तू कुठं नेतोस. बदमाष ?" सगळा भास, असाच भास, असाच भ्रम. "कल्पना. तू आलीस. पण तुझी नीता नाही. कल्पना, नीता नाही. या अंधाऱ्या रात्रीत कुठं असेल ? काय तिची अवस्था झाली असेल ? रात्री नुसता अंगावरनं तिचा हात अलग केला तर तिने परत टाकला. आणि आता ? ओहऽऽ, नीता ! काय नीता ! नेहमीच्या रस्त्यानं ! "शीला ती... ती...नीता बघ. नीताच नव्हे ? नीता ! नीता !" "होय भाऊजी, ती नीताच आहे. शीला म्हणते. डोळ्यांवर विश्वास नाही. तरी पळतो. नीता ! नीता ! खरंच, माझ्या मिठीत नीता आहे. पण तसं वाटत नाही. तरी तिला कवटाळली आहे. तिचा जीव गुदमरत आहे. माझं हृदय गुदमरलं आहे. डोळे डबडबले आहेत. "नीता, इतका वेळ कुठं होतीस ? मी शोधून शोधून बेजार झालो. कुठं होतीस तू ? "मी म्हटले.

"मी न दादा !" "होय तूच" "मी पुष्पाकडे गेले होते. माझी मैत्रीण ती परवा म्हणाले होते ना मी. माझी एक मैत्रीण आहे. ती पुष्पा. ती म्हणाली, चल, घरी जाऊ."

तो तिच्याबरोबर आलेला गृहस्थ म्हणाला, "अहो, आमच्या मालकांनी खूप सांगितले की, "राहा, सकाळी जा मी तुझ्या दादांना सांगतो. सकाळी येईल म्हणून." पण ऐकलं नाही. म्हणते कशी ? "माझ्या दादांना माझ्याशिवाय झोप येत नाही. आणि भूकपण लागत नाही. आणि एवढ्या रात्री थेट घरला घेऊन आली. कुठं रस्ता हरवली नाही."

होय, मला नीताशिवाय झोप लागत नाही. भूक लागत नाही. आताचंच बघा घटकाभर तू चुकलीस अन् माझी काय अवस्था झाली !

आणि कदाचित खरंच चुकली असतीस तर...?

●

□ काँग्रेसचा प्रचंड वटवृक्ष
या पक्षाने निवडणूकीत मूळासकट उपटून टाकला.

□ आता काळ आणि संघटना त्यांच्या बाजुने आहे.
पण गरज आहे तांदुळाची आणि नव्या बदलाची.

## □ नव्या बदलाची भूक– डी. एम्. के. भागवेल कां ?

गेल्या निवडणुकीत या पक्षाला मिळालेले घवघवीत यश हा अनेकांप्रमाणेच आमच्याही कुतूहलाचा एक विषय होता. १९५७ साली विधानसभेतील २०६ पैकी १५ जागा, १९६२ साली २०६ पकी ५० जागा, याबरोबरच १९५७ पासून मद्रास आणि मदुरा येथील नगरपालिकांमध्ये बहुमत, या क्रमाने द्रविड मुन्नेत्र कळघमच्या यशाची कमान चढत गेली आहे हे खरे आहे. पण या वेळचे या पक्षाचे इतके आणि एवढे यश–विधानसभेतील २३७ पैकी १३९ आणि लोकसभेत ३९ पैकी २५–सगळ्यांना–त्या पक्षातील लोकांनाही–अनपेक्षित होते. भक्तवत्सलम आम्हांला म्हणाले " Even they felt dazed at this success ! "

मद्रासचा काँग्रेसचा राज्यकारभार चांगला चोख होता. राज्यात कालवे आणि पाट नुसते खळखळत आहेत. वीज खेडोपाडी गेली आहे. वाहतूक-व्यवस्था प्रवास करीतच राहावे इतकी उत्कृष्ट आहे. लाचलुचपत आणि भ्रष्टाचार स्थानिक पातळ्यांवर–जिथे सामान्य माणूस अडला जातो तिथे–आहे, पण कोणाही मोठ्या मंत्र्याचे हात त्यापायी बरबटलेले आहेत असे दाखविता येणार नाही, अशी कबुली अनेकांनी मोकळेपणाने दिली. (कुठेकुठे भक्तवत्सलम यांचेबद्दल घशातल्या आवाजात कुजबुज ऐकू आली. पण ज्या अर्थी त्यांच्याविरुद्ध खऱ्या–खोट्या आरोपांची अजून-पावेतो जाहीर वाच्यता झाली नाही, त्या अर्थी नुसत्या कुजबुजीवर विश्वास ठेवणे कठीण आहे. कारण आता मंत्र्यांविरुद्ध नुसतीच कुचकुचती कुजबुज करण्याचे दिवस राहिलेले नाहीत ! ) असे असूनही काँग्रेसचा मद्रासमधील वटवृक्ष असा मुळासकट



# दक्षिणायन

## १

श्री. ज जोशी
विद्याधर पुंडलिक

का पडला, याचे पूर्णपणे समाधानकारक उत्तर आम्हांला मिळाले नाही. त्यातल्या त्यात तीन-चार कारणे आम्हांला सांगितली गेली.

पहिले कारण अनेकांनी सांगितले ते संयुक्त आघाडीचे आणि त्यामागील राजाजींच्या कुशल सूत्रधारी नेतृत्वाचे. या मंडळींच्या मते केवळ ४९ जागा विचारात घेतल्या तर कॉंग्रेसचा पराभव मोठा वाटतो. पण अजूनही तामीळनाडमध्ये कॉंग्रेस हाच जास्तीत जास्त मते मिळविणारा पक्ष आहे. कॉंग्रेसला या निवडणुकीत ६३,७२,८२६ म्हणजे ४१·८ टक्के मते तर द्रविड मुन्नेत्र कळघम, स्वतंत्र, मार्क्सवादी कम्युनिस्ट, सं. सो. पा. आणि प्र. स. पक्ष यांच्या संयुक्त आघाडीला ७९,८४,३७१ म्हणजे ५३·१ टक्के मते पडली. गेल्या ६२ च्या निवडणुकीत कॉंग्रेसला ४६·१ टक्के मते होती. पण त्या वेळी संयुक्त आघाडी नव्हती. याचा अर्थ उघड आहे. या वेळी बहुसंख्य मतांची निरनिराळ्या पक्षांत तुकड्या–तुकड्यांनी विभागणी झाली नाही. ही आघाडी स्थापन करण्यापासून तो तिला यशस्वी करण्यापर्यंत राजाजींचा वाटा फार मोठा आहे. राजाजींचे हे श्रेय नाकारणारा, एकही विरोधी सूर आम्ही कोणाच्याही तोंडून ऐकला नाही. " लुच्चा, " " बिलंदर, " " कोल्हा " अशी त्यांची तरफदारी अगदी रिक्शावाल्यापर्यंतच्या लोकांनी केलेली आम्ही ऐकली ! शहरातल्या साऱ्या सुशिक्षित मतदारांनी, अगदी ब्राह्मणांसकट मते दिली ती आघाडीतील पक्षांना. कुंभकोणम येथील खास ब्राह्मण बालेकिल्ल्यातील बहुसंख्य मतेही द्रविड मुन्नेत्र कळघमला मिळाली. सर्वांत कहर झाला तंजावरमधील मतदारसंघात. या मतदारसंघातील

काही सोवळ्या ब्राह्मण बायकांनी काँग्रेसच्या मोटारींना वाटेला लावून त्या सरळ द्रविड मुन्नेत्र कळघमच्या मोटारीत जाऊन बसल्या ! टी. सुब्रह्मण्यम यांनी हे दृश्य पाहिले आणि तिथल्या तिथेच काँग्रेसचा पराभव त्यांनी मान्य केला ! हे सारे प्रत्यक्ष पाहिलेल्या एका बँक-मॅनेजरने ही बातमी आम्हांला दिली ! मद्रासमधील कितीतरी भिंती राजाजींचे द्रष्टेपण अजून मिरवीत आहेत. अण्णा दुराई आणि राजाजी या दोघांचेही शेजारी–शेजारी फोटो असलेल्या या पत्रकात राजाजी म्हणत आहेत– " I am scenting the coming upsurge, just as a farmer scents a coming storm or rain !" ( एखाद्या शतकऱ्याला येणाऱ्या वादळाचा किंवा पावसाचा वास येतो. भावी उत्थानाचाही मला असाच वास येतो आहे ! )

## काँग्रेसवरील विश्वास उडाला


काँग्रेस सरकार आणि पक्ष यांच्यामधल्या दोषांचा आणि उणिवांचा पाढाही काहींनी वाचला. " काँग्रेस लोकांपासून दूर गेली, " " चुकीचे उमेदवार निवडले गेले, " " काँग्रेसच्या कार्यक्रमातील विधायक गोष्टींकडे लोकांनी दुर्लक्ष केले, आणि प्रतिपक्षीयांच्या वारेमाप घोषणांना ते भुलले, " " जालियनवाला बागेतसुद्धा झाले नसतील एवढे अत्याचार, दोन वर्षांपूर्वीच्या हिंदी–विरोधी आंदोलनात आमच्या तरुणांवर झाले, " अशी मते काही–काहींनी व्यक्त केली. हिंदी–विरोधी आंदोलनातील " मग्रूरजीं "बद्दल तर प्रो. वरदराजन यांच्यासारख्या जबाबदार व्यक्तींनी मन बेचैन होईल असे पुरावे दिले. " रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या आपल्या मुलाला मांडीवर घेतलेली आई " हे चित्रही भिंती–भिंतींवर चिकटविलेले आम्ही पाहिले. ही कारणे थोडीफार खरीही असतील. पण त्यात विशेष दम वाटला नाही.

संयुक्त आघाडीच्या डावपेचानंतरचे खरे आणि सर्वांत प्रभावी कारण अर्थातच आर्थिक होय. वाढती महागाई आणि तांदूळाची टंचाई यांमुळे समाजातील सर्वच थर बिथरून गेले होते. त्यांतून निवडणूक ऐन तोंडाशी आल्यावर जवळजवळ एक महिना आधी बाजारात तांदूळ नव्हता. गलिच्छ वस्तीतील एक धोबी, एक न्हावी, दोन हमाल, दोन रिक्षावाले, एक छोटासा दुकानदार या सर्वांच्या आम्ही मुलाखती घेतल्या. एकच तळमळता सूर–'तांदूळ मिळाला नाही. बाबूजी, आम्हांला आठवड्याला माणशी एक किलो तरी तांदूळ लागतो. पण इथे तर एक कण नव्हता. त्या वेळी बाजारात जावे तर २||–३ रुपेयांपर्यंत भाव गेलेला !" हे ऐकल्यावर आमच्या सुस्त पांढरपेशा मनाचा, नाही म्हटले तरी, थरकाप झाल्यावाचून राहिला नाही. म्हणूनच " एका रुपयाला तीन मापे तांदूळ " ही द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाची मुख्य घोषणा ठरली. " १०५ हुतात्मे " हे संयुक्त महाराष्ट्र आंदोलनांत रणभेरीचे वाक्य ठरले. " तीन मापे तांदूळ " हेही असेच " रणभेरीचे " वाक्य होते. प्रचारासाठी भिंतीवरील पत्रकात जी जी माणसे दाखविली होती ती एकजात "उपाशी आणि खपाटीला पोटे गेलेली !" गर्द काळ्या रंगाच्या चौकोनावर, तांबड्या

रेषांनी काढलेला हाडांचा एक भेसूर सांगाडा आणि त्यांच्याखाली–A vote for Congress is a vote for famine हे पांढऱ्या अक्षरांचे वाक्य–हे प्रचारपत्रक तर आम्ही थेट कन्याकुमारीपर्यंत पाहिले. या सांगाड्याच्या चित्राशेजारी दुसरे एक चित्र असे. लहान मुलांची रूपे घेतलेले मतदार आईकडे–म्हणजे अर्थातच द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाकडे–झेपावत आहेत! करुणानिधी ज्या पत्राचे संपादक आहेत त्याच्या गेल्या वर्षाच्या दिवाळी–अंकाचे मुखपृष्ठही कसे होते माहीत आहे?–एक नुसती हाडे उरलेला, कपड्यांच्या चिंध्या झालेला, दाढीवाला भिकारी आहे. आपल्या हातावर त्याला घेऊन, एक सुंदर तरुणी त्याला आपल्या कटोऱ्यातून पाणी पाजत आहे. आणि या उदात्त दृश्याच्या मागे डोंगराआड नुकत्याच उगवलेल्या सूर्याचे प्रचंड किरण आहेत! ( डोंगराआडून उदित होणारा सूर्य हे द्रविड मुन्नेत्र कळधमचे निवडणूक चिन्ह आहे ). अशी चित्रे पाहताना आपण हसू. कारण ही अप्रगल्भ अभिरुची खास फिल्मी–तीसुद्धा तीस–पस्तीस वर्षांपूर्वीच्या सिनेमातील आहे, या अभिरुचीचा आणखी एक आविष्कार म्हणजे या पक्षाची प्रचारातील भाषा. ती कर्कश आहे आणि वीस वर्षांपूर्वीच्या कम्युनिस्टांच्या भाषेशी ती फार मिळतीजुळती आहे.

तसे पाहिले तर "एका रुपयाला तीन मापे तांदूळ" हे आश्वासनही एक शुद्ध स्टंट होता. हा स्टंट होता हेही सगळ्यांना माहीत होते. "ही घोषणा हास्यास्पद होती आणि अजूनही आहे. भाववाढ रोखणे हे द्रविड मुन्नेत्र कळघमला वाटते तेवढे सोपे नाही. पाच-सहा महिन्यांतच लोकांचा भ्रमनिरास होईल. पण आमच्यापुरते आम्ही सुखी आहोत. कारण आमच्या डोक्यावरच्या काळजीचे हे ओझे गेले!" असे भक्तवत्सलम् आम्हांला म्हणालेही. ते जे म्हणाले, त्याला आम्हांला भेटलेल्या तीन-चार लहान मोठ्या दुकानदारांनी टेकूही दिला. द्रविड मुन्नेत्र कळघमच्या कार्यकर्त्यांचा या शब्दांत नसला तरी हाच अभिप्राय होता. पण हे सर्व खरे असूनही आम्हांला जे एक बँक मॅनेजर भेटले, ते काय बोलले हे सांगण्याजोगे आहे. "अहो, तुम्हांला असं का वाटतं की लोकांनाही या प्रचारातली स्टंटगिरी माहीत नव्हती म्हणून? लोकही इतके खुळे का आहेत? पण निवडणुकीत अशा घोषणा कोण देत नाहीत? गांधींची 'एका वर्षात स्वराज्य', लोहियांची 'सात वर्षांत सत्ता' या घोषणा तरी काय कमी भंपक होत्या? पण या घोषणेत बदलाचे वचन आणि आश्वासन होते. अण्णा दुराईंना इतका स्वस्त तांदूळ देता येणार नाही. पण आहे त्यापेक्षा थोडा जरी स्वस्त तांदूळ त्यांनी दिला तरी लोक त्यांना दुवा देतील. कारण, काँग्रेस सरकार भाव खाली आणील, असा विश्वास त्यांना राहिलेला नाही. नुसता भावच नाही, कोणत्याही आणि कशाच्याही बाबतीत काँग्रेस काही बदल घडवून आणेल हा विश्वासच काँग्रेसने गमावला आहे!"

या गृहस्थांचे म्हणणे खरे होते. तांदळाच्या भुकेइतकीच दुसरीही एक वखवखती भूक लोकांना लागली होती. बदलाची भूक!





खानावळीतील गिऱ्हाईक : काय हो, भातच आहे ना हा ! किती तांबडा दिसतोय म्हणून विचारतो !

वाढपी : (अर्थातच मुख्य मंत्री भक्तवत्सलम्) अहो, समाजवादाचा रंग तांबडा असतो. म्हणून आमच्या राज्यातला भातही तांबडाच आहे !

ही सर्व कारणमीमांसा समजावून घेऊनही आणखी एका प्रश्नाचे उत्तर आम्हांला हवे होते. संयुक्त आघाडीमध्ये द्रविड मुन्नेत्र कळघमला जरी प्रमाणत: जास्त जागांचे वाटप दिले गेले होते, तरी या पक्षाला स्वतंत्र सरकार बनविण्याइतकी मते कशी मिळाली ? जेमतेम, डळमळते बहुमत मिळून संयुक्त आघाडीच्या राजकारणाचा जो बट्ट्याबोळ होतो, तो मद्रासमध्ये का झाला नाही ? या प्रश्नाला निरनिराळी उत्तरे मिळाली. भक्तवत्सलम यांनी " लोकांना स्थिर सरकार हवे या जाणिवेने लोकांनी शहाणपणाने मतदान केले! "(People voted, I must say, very shrewdly ! ) असे सांगितले. " लोकसभेला इतर पक्ष चालतील, पण विधिमंडळात काही झाले तरी द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षच हवा, या आग्रहाने शहरातील सुशिक्षित मतदार-

# निवडणूक प्रचार युद्ध




भीती ! - भीती ! पळा ! - पळा !

काँग्रेसचे अणकुचीदार शिंगांचे बैल मतांसाठी मोकाट सुटले आहेत ! करवाढ, भाववाढ, आणीबाणी आणि भाषिक साम्राज्यवाद ही या बैलांची शिंगे आहेत !

संघांतून क्रॉस–व्होटिंग झाले. त्यामुळे खालची मते द्रविड मुन्नेत्र कळघमने सरसि सगळ्यांकडून मिळविली," या शब्दांत प्रा. चंद्रा मुदलियार यांनी त्यांना दुजोरा दिला. " १९५७ पासून अण्णा दुराई व करुणानिधी यांनी द्रविड मुन्नेत्र कळघमची बांधीत आणलेली संघटना, २० ते २५ मधल्या कडव्या तामिळ विद्यार्थीवर्गाचा द्रविड मुन्नेत्र कळघमने मिळविलेला पाठिंबा, जी. रामचंदन्, राजेंद्रन यांसारख्या फिल्मी नटांचे लोकमानसाला असलेले आकर्षण आणि एकूणच फिल्म आणि राजकारण यांची या पक्षाने केलेली " चमत्कृतिजन्य पण प्रभावी गल्लत–" ( Strange but effective combination of film and politics ) अशी कारणे आणखी काहींनी दिली. या गल्लतीला विटून पक्षत्याग केलेले श्री. संपत म्हणतात, " D. M. K. is a political fraud. Notable among the party, are the leading lights of the film lobby, which controlls the

party, because it controlls the funds. Some of the top leaders, not excluding Annadurai, are more in the movies than in the party." तथापि काँग्रेसचे धागेही फिल्मी दुनियेत आहेत.

आपल्याकडे जे कधी ऐकू आले नाही असेही एक महत्त्वाचे कारण तिकडे कळले. १९५७ पासून रामस्वामी नायक्कर यांनी काँग्रेसला पाठिंबा दिला आहे. वास्तविक, 'द्रविड कळघम 'सारख्या जहरी जातिनिष्ठ पक्षापासून कामराज यांनी शंभर हात दूर राहावयास हवे होते. पण 'काही बोलावयाचे नाही ' या खास कामराज-शैलीनुसार, काँग्रेसने या पक्षाशी घरोबा जोडला. हा घाणेरडा संबंध १९६२ सालीही चालू राहिला. पण त्याचा फटका १९६७ साली, 'करावे तसे भरावे ' या न्यायाने काँग्रेसला बसला. कारण या निवडणुकांत काँग्रेसचे प्रतिनिधीपण आणि प्रवक्तेपण हे नायक्करांच्या द्रविड कळघमच्याच लोकांनी मिरविले! या मंडळींनी काँग्रेसच्या व्यासपीठावरून, एका अगदी हीन पातळीवरून, अक्षरशः हैदोस घातला. त्या मानाने अण्णा दुराई, नेडूनजेनियन यांचा सुशिक्षित मतदार संघातील प्रचार जास्त चांगला, जास्त प्रतिष्ठित आणि जास्त संयमित होता. सगळ्याच लोकांवर याचा परिणाम झाला. Eastern Economist सारख्या वजनदार पत्रात ही तुलना आलेली आहे! कुठे काय बोलायचे या विद्येत अण्णादुराई कसे निष्णात आहेत याचा हा आणखी एक पुरावा!

बाकीच्या पक्षांमध्ये कम्युनिस्ट दुभंगलेले होते. समाजवादी पक्षाचे कार्य कोइमतूर-सारख्या गिरण्यांच्या शहरांपुरते मर्यादित. मुस्लिम अल्पसंख्य म्हणून मुस्लिम लीग अल्प-संख्य, नाही म्हणायला राज्यकर्त्या पक्षाखालोखाल स्वतंत्र पक्षाने २७ (विधानसभा) आणि ६ (लोकसभा) अशा जागा मिळविल्या, तथापि हा पक्ष त्या मानाने नवाच आहे. या उलट द्रविड मुन्नेत्र कळघम हा पक्ष वीस वर्षांचा असला तरी एकंदर ब्राह्मणेतर चळ-वळीची मद्रासमधील सामाजिक आणि सांस्कृतिक पाळेमुळे जुनी म्हणजे जवळजवळ साठ वर्षे आहेत. समाजसत्तावाद, साम्यवाद, मिश्र अर्थव्यवस्था,- इत्यादी आर्थिक प्रणाली देशाच्या बाकी भागाप्रमाणेच इथे फार खोल गेलेल्याच नाहीत. भाषा, परंपरा, जात, धर्म, लहानमोठ्या जातींचे स्थानिक आणि प्रादेशिक गट, यांसभो-वतीच आपले राजकारण अजून फिरते आहे. तामीळनाडही त्याला अपवाद नाही.

## पुढे काय ?

द्रविड मुन्नेत्र कळघमचे भवितव्य काय हा एक प्रश्नच आहे. तसे पाहिले तर या पक्षाला अखिल भारतीय स्वरूपाचे राजकीय तत्त्वज्ञान नाही; कारण, द्रविडीस्थान किंवा स्वतंत्र तामीळनाड ही घोषणा पक्षाने अधिकृतरीत्या तरी सोडून दिलेली आहे. मध्यवर्ती सरकारने हिंदीबाबतची आपली भूमिका शक्य आहे तेवढी अनुनयवादी ठेवली आहे. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचे तुणतुणे आता

उपयोगी पडणार नाही. कारण प्रतिस्पर्धी कॉंग्रेसही ब्राह्मणेतरांच्याच हाती आहे. समाजवादाच्या घोषणेतही आता नावीन्य उरले नाही. कारण, आता कोण समाजवादी नाही ? शिवाय समाजवादाची घोषणा करता करताच या पक्षाने या देशात समाजवादी नसलेल्या एकुलत्या एक पक्षाशी—स्वतंत्रांशी—हातमिळवणी केलेली आहे. एका बाजूला जहाल मार्क्सवादी कम्युनिस्ट आणि दुसऱ्या बाजूला स्वतंत्र अशी ही सोयरीक आहे. यात तत्त्व उरते कोठे ?" शिवाय नियोजनांच्या नाड्या केंद्र सरकारकडे असल्याने प्रादेशिक पातळीवरील समाजवादालाही मर्यादित अर्थ राहील. म्हणजे कोणत्या तरी डाव्या वा उजव्या पक्षाजवळ जावे लागते. अखिल भारतीय असा दृष्टिकोन स्वीकारावा लागतो. तूर्त या पक्षाची ही तयारी नाही. "तुमच्या पक्षाचे प्रांतिक स्वरूप तुम्ही अखिल भारतीय कसे करणार ?" या आमच्या प्रश्नाला करुणानिधींनी सरळ उत्तर दिले— "तसे आम्ही डावे आहोत. राजाजींशी आमचा फक्त 'अलायन्स' होता. पण तूर्त आम्हांला अखिल भारतीय होण्यात स्वारस्यही वाटत नाही. आमचे प्रादेशिक प्रश्नच आम्हांला महत्त्वाचे वाटतात." नेडूनजेनियन म्हणाले,— "If time permits and people want, we may accept an all India party."

या परिस्थितीत द्रविड मुन्नेत्र कळघमला राजकीय तत्त्वज्ञान म्हणून जे आहे ते अर्थातच तामीळ भाषा, परंपरा आणि संस्कृती या भोवती केंद्रित झालेला राष्ट्रवाद आणि बहुजनवादी ब्राह्मणेतरत्व हेच होय. दुय्याची भाषा म्हणून हिंदीला विरोध, शिक्षणात तामीळ आणि इंग्लिश, हे द्विभाषासूत्र, राज्यांना अधिकात अधिक आणि केंद्राला कमीत कमी अधिकार ह्या या पक्षाच्या प्रत्यक्षातील आघाड्या. या आघाड्यांना जोपर्यंत जोर आहे, तोपर्यंत या तत्त्वज्ञानाला जोर राहील. निदान वरवर तरी या आघाड्या या पक्षाला लढवत ठेवाव्या लागतील. म्हणूनच केंद्रसरकारविरुद्ध, लढा देणे, किंवा त्या लढ्याची भाषा सतत जागती ठेवणे, आर्थिक लाभ खेचून घेण्यासाठी, आणि राज्यांच्या अधिक अधिकारासाठी, अधूनमधून द्रविडीस्तानच्या धाकाचे पिस्तुल हवेतच उडविणे, उत्तर-वर्चस्वाविरुद्ध आणि हिंदीविरुद्ध घोषणा देऊन कधी तामीळत्वाचा तर कधी "पंचद्रवीड" देशांचा जयजयकार करणे,—हे "कार्यक्रम" या पक्षाला वारंवार हाती घ्यावे लागतील. कारण कॉंग्रेसहून आपली प्रतिमा वेगळी ठेवण्यासाठी किंवा वेगळी आहे हे भासविण्यासाठी हे सर्व कार्यक्रम आवश्यक आहेत. त्याचप्रमाणें आर्थिक कार्यक्रमातही आम्ही क्रांतिकारक आहोत, हे दाखविण्यासाठी तत्त्व म्हणून आम्ही 'डावे' आणि 'समाजवादी' आहोत अशा गर्जना त्यांना कराव्या लागतील. पण त्याचबरोबर सोयीप्रमाणे कधी स्वतंत्र, तर कधी कम्युनिस्ट, तर कधी समाजवादी अशा पक्षांना हा पक्ष जवळ करील. थोडक्यात कोणत्याही आर्थिक तत्त्वज्ञानाच्या निष्ठांपेक्षा भाषिक

[पृष्ठ ३८ वर]

# तामिळनाडमधील

मद्रासचे पब्लिक वर्क्स खात्याचे मंत्री, आणि द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाचे मुख्य संघटक करुणानिधी, यांनी निवडणूक मोहिमेत सादर केलेल्या नाटकांतील काही निवडक वेचे. हे नाटक 'सबकुछ करुणानिधीं'चे. लेखक, दिग्दर्शक, आणि प्रमुख नट तेच.

नाटकाचे कथासूत्र : कानन नावाचा एक तरुण फार मोठ्या आकांक्षांनी काँग्रेसमध्ये जातो आणि निराश होऊन द्रविड मुन्नेत्र कळघमला येऊन मिळतो.

### एक संवाद —

**कानन :** सबंध भारतासाठी एक समान भाषा नको काय ?

**आई :** एकच का ? चौदा भाषा आहेत की ! त्या राष्ट्रीय भाषाच आहेत.

**कानन :** च्च्च् ! पण सर्व भाषांमध्ये एकदुव्याची भाषा नको का ?

**आई :** दुव्याची भाषा, भारतीयांपुरतीच का म्हणून मर्यादित ठेवायाची ? जगातील सर्व लोकांसाठी इंग्लिश ही दुव्याची भाषा नाही का ? मांजरीला एक रस्ता आणि तिच्या पिलाला दुसरा असे का ? दोघे एकाच रस्त्यावरून चालू शकतील की.

**कानन :** पण इंग्लिश ही परक्यांची वाणी, परक्यांची भाषा नाही का ?

**आई :** तू मोठा गंमतीदारच माणूस आहेस ! आपलं अन्न परक्यांचे, कर्ज परक्यांचे, उद्योगधंदे आणि यंत्रसामग्री यांच्यासाठी दिली जाणारी मदत परक्यांची, तज्ज्ञ परके, भांडवल परके आपण अवमूल्यन केले तेही परक्यांच्या हस्तक्षेपामुळे. या सर्वांबद्दल काही लाज. वाटत नाही आपल्याला. फक्त इंग्लिशसारखी विश्वभाषा ठेवण्यातच सारी लाज आहे होय ?

मूळ तामीळचा अनुवाद
डॉ. सौ. सुनंदा पटवर्धन

# राजकीय रंगभूमी !

## हे चित्र आणि ते चित्र

### काँग्रेस

□ विणकऱ्यांचे अश्रू पुसणारे सरकार आमच्याकडे यायचेच आहे अजून. खादीबद्दल एवढा कळवळा काँग्रेसवाले दाखवितात. पण तोच कळवळा बाकीच्या विणकऱ्यांबाबत ते का दाखवीत नाहीत ?

□ काँग्रेस म्हणजे त्याग! त्याग म्हणजे अधिकार ! अधिकार म्हणजे गाद्यागिरद्या ! गाद्यागिरद्या म्हणजे परमिट् लायसेन्स !

□ मोजा ! घाला बोटे ! या काँग्रेस राज्यात कशाकशावर कर आहेत. त्याची. एक...दोन...तीन... अबब ! त्यापेक्षा कर ज्यावर नाहीत याचीच मोजमापं करू या का ? पण—इथेही बोटे घालता येत नाहीत की !

□ काँग्रेस म्हणजे आग लागलेले घर ! ती आग विझवायची असेल तर तू घराबाहेर आले पाहिजेस. घरात राहून ती आग कशी विझेल? उलट तो आगीशी खेळ होईल.

### डी. एम्. के.

□ डी. एम्. के. ला येऊन मिळा, आणि ही निवडणूक लढवा. सत्तेसाठी नाही ! तामीळला नष्ट करण्याच्या, ती भाषा पुसून टाकण्याच्या कटाविरुद्ध सारे "तामीळगम्" खडे आहे, आपले सारे विश्व एकवटून, तो याचा प्रतिकार करण्यास तयार आहे, हे सर्व जगाला दाखविण्यासाठी !

□ द्रविड मुन्नेत्र कळघम म्हणजे काम आणि कष्ट ! लोकांचे काम आणि रक्त यांमधून हा पक्ष निर्माण झाला आहे. ३४ लाख लोकांच्या पाठिंब्यावर उभा असलेला हा पक्ष आहे !

□ काँग्रेसी साम्राज्यवादाशी मकाबला करणारा हा एकुलता एक लोकशाही पक्ष आहे. हा पक्ष निवडणूक जिंकणारच ही अनेक तज्ज्ञांची भविष्यवाणी आहे.

 [पृष्ठ ३८ वरून]

राष्ट्रवाद हेच पक्षाचे आवाहन राहील. बाकीच्या सर्व क्षेत्रांत पक्षहितानुसार धोरण आणि व्यवहार यांनुसारच हा पक्ष जाईल, असे वाटते.

डी. एम. के. ने सामाजिक सुधारणा करण्याचेही कंकण बांधलेले आहे; परंतु राज्यकर्ता पक्ष म्हणून येथेही त्यांच्यावर जास्त बंधने पडतील. निरीश्वरवादाची तात्त्विक घोषणा करणे ठीक आहे. परंतु मंत्री म्हणून तसे वागणे कठीण आहे,हे शिक्षण मंत्री श्री. नेडूनजेनियन यांनी कबूल केले. ते एका देवळात गेले असताना पुजाऱ्याने भस्म आणि प्रसाद दिला. तो त्यांनी नाकारला म्हणून खूप मोठे वादळ निर्माण झाले होते. त्याबाबत त्यांनी सांगितले, " मी व्यक्तिश: नास्तिक आहे. परंतु पक्ष नास्तिक असू शकत नाही." आंतरजातीय विवाह करणाऱ्यास रौप्य पदके देण्याची कल्पना आहे. असले खेळ काँग्रेस सरकारांनी पूर्वी केले होते. परंतु त्यांचा विशेष प्रभाव पडत नाही.

डी. एम. के. चा इतिहास आणि त्या पक्षापुढील प्रश्न हे असे आहेत. तसे पाहिले तर या पक्षात तडफ आहे. विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येमुळे कॉलेजात दिवसरात्र अशी डबल शिफ्ट, शाळांसाठी जिल्हयाच्या ठिकाणी सरकारी प्रयोगशाळा आणि ग्रंथालये, दहा हजारांची मुक्तिसेना, मद्रास शहराचा संपूर्ण कायापालट करण्याच्या योजनेचा आरंभ, रुपयाला तीन नाही तरी एक माप तांदूळ, ५०० रु. पगारावर काढलेले पहिले चार महिने, हा त्यांचा पाच महिन्यांच्या कारभाराचा हिशेब आहे. सामान्य माणसे अजून तरी या पक्षावर खूष आहेत. पक्ष संघटित आहे. अण्णा दुराईंचे नेतृत्व एकमुखी आणि भक्कम आहे. त्यामुळे पक्षाला कुठे तडे जाणार नाहीत, असे वाटते. मुदलियार, चेट्टीयार, नाडर, नायक्कर, नायडू, वन्नियार इ. जातींचे हेवेदावे आणि ताण आहेत. पण सत्ता-संघर्ष सुरू होतील इतके ते नसावेत. आपल्याकडे महाराष्ट्रात मराठा समाज हा मोठा गट जवळजवळ ३५ ते ४० टक्क्यांपर्यंत आहे. इतर ब्राह्मणेतर त्या मानाने अल्पसंख्य आहेत. सत्तेच्या अशा सामाजिक केंद्रीकरणामुळे आपल्या राजकारणावर व राज्यकारभारावर या गटाची छाप आहे. असा आणि इतका एकाच जातीचा मोठा गट मद्रासमध्ये नसल्याने सत्ता एकाच जातीकडे गेलेली नाही. ती विकेंद्रित झाली आहे. शिवाय आपल्याकडे विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र इतकेच नव्हे तर सातारा जिल्हा, सांगली जिल्हा वगैरे अनेक प्रदेश आहेत. प्रत्येक प्रदेशाला स्वतंत्र आणि महान अस्मिता आहे !! त्यामुळे प्रादेशिक एकात्मतेचे तुणतुणे आपल्याला वाजवावे लागते. असे तुणतुणे मद्रासेत वाजवावे लागत नाही.

या सर्वांचा फायदा, हा पक्ष उठवेल की काय, हे पाहावयाचे आहे. ठरावयाचें आहे. काळ त्यांच्या बाजूला आहे. संघटना त्यांच्या बाजूने आहे. अपयशाच्या प्रचंड

घक्क्याने काँग्रेस अजून सावरलेली नाही. गरज एकच आहे– चोख, निःपक्षपाती अन् स्वच्छ राज्यकारभार, आणि थोडीतरी स्थिर अशी आर्थिक घडी !

काँग्रेस पक्षात आज बजबजपुरी आहे. परंतु कसे झाले तरी नाव इतक्या वर्षांच्या 'काँग्रेसचे' आहे. बालगंधर्वांची कंपनी बंद पडल्यानंतर काही वर्षांनी दुय्यम तिय्यम दर्जाच्या नटांनी तिचे नाव विकत घेतले आणि 'गंधर्व कंपनी'चे खेळ लावले. त्या नावाच्या आकर्षणामळे प्रेक्षकांनी त्या नाटकांना गर्दी केली. काँग्रेसचेही तसेच आहे. जुने चैतन्य संपले आहे. पण नाव कायम आहे. त्या 'हरिनामा'चाच प्रभाव पुढच्या निवडणुकीत पडेल काय ? का तांदूळाबरोबरच लोकांना लागलेली बदलाची मूकही द्रविड मुन्नेत्र कळघम मागवेल ?

(अपूर्ण)


## मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या कलामंडळातर्फे या वर्षी ऑगस्ट ते ऑक्टोबर असा तीन महिन्यांचा नाट्य–शिक्षण वर्ग चालविण्यांत येणार आहे.

नाट्य क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी नाट्याच्या विविध अंगांचे व्याख्यानांच्या व विशेषतः, प्रात्यक्षिकांच्या द्वारे शिक्षण देतील. वर्गात फक्त ४५ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल. प्रवेश मूल्य रु. ३० असेल.

विश्वविद्यालयांतून आलेल्या विद्यार्थ्यांच्या संचात विश्वविद्यालयांत अभ्यासासाठी नेमलेल्या कोणत्या तरी एका नाटकाचा प्रयोग सुप्रसिद्ध दिग्दर्शक व नट श्री. केशवराव दाते यांच्या मार्गदर्शनाखाली बसवून तो प्रयोग शक्य तर सर्व विद्यार्थ्यांस दाखविण्याचीही एक योजना आहे.

प्रवेश दि. २५ ऑगस्ट १९६७ पर्यंत मिळेल.

**कार्यालयाचा पत्ता : 'कला मंडळ' मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय,**
**नायगाव रोड, दादर, मुंबई १४."**

# रशियन वाङ्मयात लोकमान्य टिळक

सुमारे दोन वर्षांपूर्वी लो. टिळकांवर रशियन भाषेत लोकमान्यांच्या संस्मरणार्थ एक ग्रंथ प्रसिद्ध झाला व गेल्या वर्षी त्याचे इंग्रजी भाषांतर हिंदुस्थानात उपलब्ध झाले. (Tilak and the Struggle for Indian Freedom) कि. रु. १५; पृष्ठसंख्या ६८२)

या पुस्तकात लो. टिळकांच्या कालास अनुलक्षून अनेक विषयांवर रशियन लेखकांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. या ग्रंथातील एक लेख लोकमान्यांच्या सामाजिक व राजकीय कामगिरीवर आहे. १९०८ साली लोकमान्यांवर झालेल्या राजद्रोहाच्या खटल्यावरही एक लेख आहे.

परक्या देशांतील लोक आपल्या देशातील नेत्यांकडे कोणत्या दृष्टीने बघतात ी कुतूहलाची गोष्ट आह व त्यामुळेच पुस्तकाचे वाचन मनोरंजक होते.

एस्. एस्. खानोलकर

प्रथम सामाजिक सुधारणा की प्रथम राजकीय सुधारणा, म्हणजेच आगरकर की टिळक हा वाद एकेकाळी महाराष्ट्रात गाजला होता. या बाबतीत रशियन लेखकाने टिळकांचीच तरफदारी केली आहे. देश परक्यांच्या गुलामगिरीतून स्वतंत्र झाल्याशिवाय कुठलाच प्रश्न सुटू शकत नाही, हे टिळकांचेच म्हणणे लेखकाला योग्य वाटते.

प्रस्तुत लेखात रशियन लेखकाने लो. टिळकांच्या केसरीतील लेखांचे आधार घेतले आहेत. त्याशिवाय झारशाहीतील रशियाचा वकील त्या वेळी मुंबईत होता व तो इथल्या परिस्थितीबद्दल हकीकती लिहून रशियाला कळवीत असे. त्या पत्रव्यवहाराचा बराचसा उपयोग रशियन लेखकाने केला आहे.

१९०८ साली लो. टिळकांवर जो राजद्रोहाचा खटला झाला व ज्यात लो. टिळकांना सहा वर्षांची शिक्षा झाली, तो खटला मुंबई हायकोर्टात चालू असताना रशियन वकील खटला ऐकण्याकरता उपस्थित राहत असे. लो. टिळकांना कोर्टात पाहून रशियन वकील लिहितो, " टिळकांना पाहिल्यानंतर ते एका क्रांतिकारक चळवळीचे पुढारी आहेत-ही छाप चटकन मनावर बसते. जनतेतील टिळकांच्या वाढत्या वजनाबद्दल ब्रिटिश सरकारला भीती वाटत होती यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नव्हते. "

हातात पिस्तुल घेऊन इंग्रज अधिकाऱ्यांचा खून करण्यात देशभक्ती समजणारे त्या वेळचे जे दहशतवादी होते ते लो. टिळकांच्या मते देशभक्त होते. ते आपल्यापरीने इंग्रजांबद्दलचा निषेध व्यक्त करत होते. पण अशा रीतीने एका एका इंग्रज अधिकाऱ्याचा पाठलाग करून इंग्रजी सत्ता नाहीशी होणारी नव्हती याचीही जाणीव टिळकांना होती.

**राजकारण बहुजन समाजापर्यंत नेण्याचा मान टिळकांना दिला पाहिजे, असे रशियन लेखक म्हणतो.**

रशियातील तत्कालीन घटनांकडे लोकमान्यांचे लक्ष होते व त्यांपासून ते हिंदी जनतेला स्फूर्तीही मिळवून देत असत. १९०५ साली रशियात जे जनतेचे उठाव झाले, ते शस्त्रे नसल्यामुळे अयशस्वी झाले हे टिळकांचे म्हणणे लेखकाला मान्य नाही. हिंदुस्थानातील लढयांमध्येही शस्त्राची उणीव टिळकांना खटकत होती. पण ज्या वेळी पुरेशी राजकीय जागृती जनतेत फैलावते त्या वेळी शत्रूचीच शस्त्रे पळविली जातात. जनतेत पुरेशी जागृती नाही याचीही जाणीव टिळकांना होती. पण त्यांच्या काही शिष्यांना देश क्रांतीला तयार आहे, असे वाटत असे. अंकगणितातली उदाहरण राजकारणात उपयोगी पडत नाहीत यांची जाणीव त्यांच्या काही शिष्यांना नव्हती. श्री. अजीत सिंग नावाचे टिळकांचे शिष्य आपल्या भाषणांतून सांगत की, हिंदी जनता तीस कोटी आहे व इंग्रज हिंदुस्थानात अवघे दीड लाख आहेत म्हणून इंग्रजांवर मात करणे सोपे आहे. पण लोकमान्यांच्या दृष्टीने असले युक्तिवाद हास्यास्पद होते.

जनतेमध्ये परंपरागत जे गैरसमज असतात, त्यांचा फायदा साम्राज्यवादी आपली सत्ता टिकविण्याकरता घेऊ शकतात. हिंदू व मुसलमान यांचेमध्ये जे भेदभाव होते त्यांचा फायदा ब्रिटिशांनी घेतला. दोन जमातींतील फूट वाढवण्याकरता सरकार सर्वतोपरी प्रयत्न करीत असे.

जातीयवाद्यांना सरकारी साहाय्य मिळत असे. बंगालमध्य जातीय दंगली झाल्याबद्दल ब्रिटिश सरकारला आनंद झाला व डाक्का येथील जातीयवादी मुसलमान नबाबाला ब्रिटिश सरकारने पैसे दिले, अशी माहिती त्या वेळच्या रशियन कॉन्सलने आपल्या देशाला पुरविली आहे.

## मध्यम वर्ग आणि कामगार वर्ग

१९०८ साली टिळकांना जी शिक्षा झाली त्याच्या निषेधार्थ मुंबईच्या कामगारांनी संप केला. हाच हिंदुस्तानातील पहिला राजकीय संप होय. संप मोडून काढण्याकरता इंग्रज अधिकाऱ्यांनी अनेक तऱ्हेचा धाकदपटशा दाखवून पाहिला पण उपयोग झाला नाही. मुंबईत ठिकठिकाणी कामगारांचे जमाव जमू लागले. गोऱ्या पोलिस अधिकाऱ्यांना वाटले, की फक्त हुकूम दिल्याने लोक पांगतील पण लोक जागचे हालेनात. शेवटी गोळीबार करावा लागला. शेकड्यांनी लोक जखमी झाले. गोळीबाराचा प्रतिकार जनतेने दगडांनी केला. दोन कामगार ठार झाले. जी. आय. पी. रेल्वेचे कामगारही संपात सामील झाले होते. पुण्याहून लष्कराची तुकडी मुंबईत येत होती. वाटेत गाडी थांबवून कामगारांनी लष्करावर दगडफेक केली. लष्कराने गोळीबार केला व अनेक जखमी झाले. व्यापाऱ्यांनीही दुकाने बंद ठेविली होती. संप व हरताळ मोडून काढण्याकरता गिरण मालकांची सभा सरकारने बोलविली व सभेने संप मोडून काढण्याच्या बाबतीत सरकारला सर्वतोपरी साहाय्य करण्याचे ठरविले. लो. टिळकांना शिक्षा झाल्यानंतर मुंबईतील बाजार व कारखाने सहा दिवस बंद होते. गोळीबारात एकूण सुमारे दोनशे माणसे मृत्युमुखी पडली. **मध्यमवर्गाने कामगारवर्गाला साथ दिली.** कामगारांच्या ऐक्यामुळे मालकवर्गात बेचैनी निर्माण झाली व त्यांनी सरकारी अधिकाऱ्यांना साथ दिली. या सहा दिवसांचे सविस्तर वर्णन उपरिनिर्दिष्ट ग्रंथात सापडते.

याशिवाय पुढील विषयावरही लेख ग्रंथांत आहेत—१ एकोणिसाव्या व विसाव्या शतकातील महाराष्ट्रीय शेतकरी. २ महाराष्ट्रातील शहरांतील आर्थिक बदल ३ एकोणिसाव्या व विसाव्या शतकांतील बंगालमधील सामाजिक विचारधारणा ४ स्वदेशी चळवळ. ५ कामगार चळवळ वगैरे...

# क्रीडांगण

मनोहर रेगे

## अमेरिकेचा १६ वा विजय

तेवीस वर्षांच्या सौ. बिली जीन किंग ( कॅलिफोर्निया, अमेरिका ) यांनी ब्रिटनच्या सौ. ॲन जोन्स ( वय २८ ) यांचा विंबल्डन टेनिस स्पर्धेतील अंतिम सामन्यात ६–३ व ३–४ अशा सरळ सेट्सनी पराभव करून लागोपाठ दुसऱ्यांदा विंबल्डनचे महिला–विजेतेपद पटकाविले. या दोन गृहिणींची लढत सुमारे तासभर चालली होती. सौ. किंग यांनी आपल्या सामर्थ्यवान आणि शैलीदार खेळाने सौ. जोन्स यांचा प्रतिकार दुबळा ठरविला. किंग यांनी सुरुवातीपासूनच सामन्यावर पकड घेतली आणि सर्व्हिस व व्हॉलीजचे जबरदस्त तडाखे योजनाबद्ध रीतीने आखून प्रावीण्यपद मिळविले. विशेष मौज म्हणजे सौ. बिली जीन यांचे २२ वर्षांचे पती लॅरी आणि सौ. ॲन जोन्स यांचे ५८ वर्षांचे पती 'पिप्' अगदी जवळच उभयतांचा सामना पाहाण्यास बसले होते.

सामना संपल्यानंतर प्रिन्सेस मरीना यांच्या हस्ते सौ. किंग यांना भव्य सुवर्ण-तबक विजय-चिन्ह म्हणून बहाल करण्यात आले. दुसऱ्या महायुद्धानंतर २२ विंबल्डनपैकी अमेरिकेने संपादिलेला हा १६ वा विजय होय. ब्राझीलच्या कु. मॅरिआ ब्युनो यांनी १९५९–६० या दोन वर्षी विंबल्डन जिंकले. त्याची पुनरावृत्ती सौ. बिली जीन किंग यांनी केली.

सौ. बिली जीन यांनी या वर्षी इनग्रिड लॉफ्डॉल (स्वीडन), कु. एस्वी व्हिन्ट्जेर स्पर्ट ( नेदरलॅंड्स ), ली परकोली ( इटली ), कु. व्हर्जिनिया वेड (ब्रिटन), कु. कॅंदी हार्टर (अमेरिका) यांचा अंतिम सामन्यापूर्वी सहज पराभव केला. वेड यांनी त्यांना थोडासा प्रतिकार केला एवढाच ! एरव्ही सौ. किंग यांची चेंडूवरील हुकमत आणि आत्मविश्वास व अधिकार दांडगा होता. वेड आणि हार्टर यांच्याविरुद्ध झालेले सामने त्यांनी ४९ व ३८ मिनिटांतच संपविले.

दुहेरी आणि मिश्र दुहेरी सामन्यांतही सौ. बिली जीन यांनी विजय मिळविला आणि तिहेरी मुकुट पटकविला. रोझमेरी कॅसल्स ( अमेरिका ) बरोबर त्यांनी मॅरिआ ब्युनो (ब्राझील) व नान्सी रिची ( अमेरिका ) यांना पराभूत केले.

( ९–११, ६–४ व ६–२ ) तर ऑस्ट्रेलियाच्या ओवेन डेव्हिडसन यांच्यासमवेत केन फ्लेचर (ऑस्ट्रेलिया) व मॅरिआ ब्युनो (ब्राझील) यांच्यावर ७–५, ६–२ अशी मात केली.

पूर्वाश्रमीच्या बिली जीन मॉफीट यांनी ११ व्या वर्षी टेनिस सुरू केले. १९६२ मध्ये त्यांचा अमेरिकेत तिसरा क्रमांक लागला. त्याच वर्षी ह्याच ॲन हेडन (जोन्स) यांनी त्यांना विंबल्डनला हरविले होते. १९६३ व ६५ मध्ये त्या विंबल्डन अंतिम फेरीत चमकल्या. गेल्या वर्षी दक्षिण आफ्रिकेच्या एकेरी आणि दुहेरी टेनिसस्पर्धेत त्यांनी प्रावीण्यपद मिळविले होते. त्यांच्या विजयाने विंबल्डन टेनिसचाच सन्मान झाला आहे असे वाटते.

## ' फॉलोऑन ' आणि क्लोज यांचा पराभव

मनोधैर्याने खचलेल्या भारतीय क्रिकेट संघाने एजबॅस्टन (बर्मिंगहॅम) चा तिसरा कसोटी सामना १३२ धावांनी गमविला. हे अपेक्षितच होते. पण या कसोटी सामन्यात भारताने पहिल्या डावात केवळ ९२ धावा काढून सर्वांना जसा अनपेक्षित धक्का दिला, त्यापेक्षाही अधिक धक्का इंग्लंडचे कर्णधार ब्रायमन क्लोज यांनी पहिल्या डावात २०६ धावांचे अधिक्य असता भारताला ' फॉलो–ऑन ' न देण्याने दिला !

त्यामुळे इंग्लिश टीकाकार इयान वुल्ड्रिज भलतेच उखडलेले दिसतात. क्लोज यांनी भारताचा अपमान केला आणि भारताच्या खेळाडूंचे मानशास्त्र न जाणण्याचा मूर्खपणासुद्धा केला असे परखड विचार त्यांनी व्यक्त केले.

कर्णधार क्लोज मानसशास्त्र किती जाणतात हा भाग सोडला तरी त्यांनी भारताचा अपमान केला हे म्हणणे पटत नाही. उलट त्यांनी भारताला विजयासाठी ४१० धावांचा निश्चित आकडा पुढे करू दिला आणि त्या धावा करण्यासाठी तब्बल तीन दिवसांचा अवधी पण दिला. त्यामुळे खेळात अचानक औत्सुक्य निर्माण झाले. इंग्लंडचा दुसरा डाव २०३ धावांत गडगडल्याने भारताच्या यशस्वी गोलंदाजांचे कार्य जगापुढे आले. चंद्रशेखर, बेदी आणि प्रसन्न हे काही दिवसांनी सुभाष गुप्ते, विनू मनकड आणि गुलाम अहंमद ठरू शकतील. कुणी सांगावे ?

क्लोज यांनी आपल्या फलंदाजांना दुसऱ्या डावात मारपीट करावयाला सांगितली त्यामुळे खेळात रंगदारपणा आला. भराभर विकेट्स पडल्याने भारताचे मनोधैर्य उंचावले, आशेचे किरण सापडले. आणि दुसऱ्या डावात २७७ धावांची मजल मारण्याचे कर्तृत्व ते दाखवू शकले. क्लोज यांच्या फॉलो ऑन न देण्याच्या निर्णयाने सामन्यात चुरस आणि चैतन्य निर्माण झाले. यापेक्षाही प्रतिस्पर्धांत ईर्ष्या उत्पन्न झाली. हा एक नवीनच फायदा भारताला उपलब्ध झाला.

पण या सर्व प्रकरणात क्लोज मात्र फसले ! पहिल्या कसोटी सामन्यात फॉलो ऑन न दिल्याने भारताने ५१० धावा केल्या आणि पराभवातही प्रतिष्ठा मिळवली

आणि शेवटच्या कसोटी सामन्यात तो न देताही भारताने क्लोज यांचा २७७ धावा टोलवून चांगलाच अपेक्षाभंग केला. गेल्या वर्षी वेस्ट इंडिजविरुद्ध प्रतिकूल परिस्थितीत त्यांचे नेतृत्व मान्यवर ठरले आणि यंदा भारताबरोबर अनुकूल अवस्थेतही त्यांच्या संघनायकत्वाला तडे गेले. तेव्हा पाकिस्तान, वेस्टइंडिज ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका अशा यापुढील प्रतिस्पर्धांबरोबर त्यांनी जपूनच रांहावे हे बरे.

## टेनिसचा ' स्वार्थ ' टिकेल काय ?

लक्झेंबर्गच्या बैठकीत आंतर-राष्ट्रीय लॉन टेनिस संस्थेने ब्रिटन आणि ऑस्ट्रेलियाचा विंबल्डन आणि इतर हौशी खेळाडूंच्या स्पर्धांत धंदेवाईक टेनिसपटूंना वाव देण्याचा ठराव ५६ मतांनी फेटाळून लावला. धंदेवाईकांना विरोध करणाऱ्या देशांच्या यादीत भारताचे नाव झळकल्यानंतर साहजिकच भारताचे प्रतिनिधी आणि अखिल भारतीय लॉन टेनिस संस्थेचे चिटणीस श्री. आर. के. खन्ना काय म्हणतात इकडे सर्वांचे डोळे लागून राहिले.

श्री. खन्ना म्हणाले की, हौशी आणि व्यावसायिक टेनिसपटूंना एकत्र आणण्याने म्हणजेच टेनिस ' खुले ' करण्याने छोटया देशांना बराच पैसा खर्च करावा लागेल. नामवंत खेळाडूंना आपल्या देशात बोलावून खेळविणे त्यांना परवडणार नाही. आणि भारताच्या टेनिस संस्थेला तो खर्च डोईजड होईल; किंबहुना भारताच्या खेळाडूंना बाहेर किंमत राहणार नाही.

लक्झेंबर्गला जाण्यापूर्वी श्री. राज खन्ना म्हणाले होते की, " तेथे गेल्यानंतर इतर देशांची मते अजमावूनच आमचा निर्णय निश्चित करण्यात येईल."

म्हणजे खन्ना दोन दगडांवर हात ठेवून होते. आणि ' जिकडे सरशी तिकडे पारशी ' या न्यायाने त्यांनी ' खुल्या ' टेनिसला विरोध केला व भारताच्या टेनिसची आर्थिक आणि व्यावहारिक बाजू सांभाळली. त्यांना वाटत असेल की आपण ती बळकट केली !

आज जिथून तिथूनचा प्रेक्षक भडकत्या महागाईने हैराण झाला आहे. त्याला जगण्यासाठी अधिक काबाडकष्ट करावे लागत असल्याने वेळही कमी आहे. आणि या थोडक्या अवधीत तो टेनिस पाहावयास जाणार आहे.

मग तो खेळाडूचा दर्जा पाहील का तो खेळाडू हौशी का धंदेवाईक आहे हे पाहील ? गॅरी सॉबर्सचा वेस्ट इंडिज संघ पाहावयाला पाचपट पैसे देऊन क्रिकेट शौकिन गेले. सॉबर्स धंदेवाईक खेळाडू आहे, हे नाही त्यांनी पाहिले ! पण विजयी अश्वावर रुढ होण्याचे भारतीय लॉन टेनिस संस्थेचे सध्याचे धोरण भारतीय टेनिसचे भवितव्य लवकरच ठरवील आणि त्यात खन्नांच्या मतांचा विजय झाला तर भारतीय टेनिस शौकिन त्यांना दुवाच देतील.

(पृष्ठ ६४ वर)

# ९

'इस्क्रा'चे संपादकीय कामकाज पाहण्यासाठी लेनिन म्युनिक येथे राहू लागला. पोलिसांचा उपसर्ग पोचू नये म्हणून 'मेयेर' या टोपण नावाने तो तेथे वावरत होता. २४ डिसेंबर १९०० रोजी 'इस्क्रा'चा पहिला अंक प्रसिद्ध झाल्यानंतर दोनच दिवसांनी त्याने आपल्या आईला पत्र धाडले. या पत्रात तो लिहितो–'नाताळ संपण्यापूर्वी तुला हे पत्र मिळेल अशी अपेक्षा आहे. सर्व कुटुंबियांसमवेत तू हा सण आनंदात साजरा करीत असशील, अशी मी आशा करतो. आम्हीही येथे मोठ्या खुषीत आहोत. सुटी असल्यामुळे म्युनिकमधले रस्ते अहोरात्र गजबजलेले आहेत. मध्यंतरी मी व्हिएन्नाला जाऊन आलो. आता मात्र येथेच स्थायिक झालो आहे. सध्या येथेही थंडी आहे, पण बर्फ मात्र पडत नाही. हवा आर्द्र आहे. त्यामुळे जाड लोकरी कोटाशिवाय माझे येथे चालू शकते. हा इथला रुक्ष हिवाळा पाहिला, की आपल्या तिकडच्या हिवाळ्याशी तुलना करावीशी वाटते. येथली थंडी वेगळी, रशियातली वेगळी! थंडीथंडीतही फरक असतो हे येथे आल्यावर जाणवले. कारण, परदेशातील हा माझा पहिलाच हिवाळा आहे! माझे जीवन पूर्वीसारखेच चालू आहे. एकाकी, कोणतीही शिस्त न पाळणारे. आता आपल्या जीवनाला शिस्त लावायची हं, असे मी मनाशी दररोज घोकतो. परंतु तसे करणे जमत नाही.'

१९०१ च्या प्रारंभी क्रपस्कायाची हद्दपारीची मुदत संपताच ती लेनिनला भेटावयास अतिशय उत्सुक होती. परंतु तो नेमका कोणत्या शहरात राहत आहे हे तिला माहीत नव्हते. शिवाय या काळात लेनिनने इतकी टोपण नावे घेतली होती की, आता तो कोणत्या नावाने वावरत आहे याचाही तिला अंदाज येईना. उफाहून निघाल्यानंतर प्रथम ती प्रागला आली. 'मोद्रॅचेक' या नावाने प्रागमध्ये लेनिन राहत आहे, असे तिला कोणीतरी सांगितले होते. म्हणून तिने उफाहून निघण्यापूर्वी आपण प्रागला येत असल्याची तारही 'मोद्रॅचेक'च्या नावावर पाठविली होती. परंतु प्राग स्टेशनवर आपल्याला

# व्होल्गा जेव्हा लाल होते

## वि. स. वाळिंबे

उतरवून घेण्यासाठी कोणीच आलेले नाही हे पाहून ती बुचकळ्यात पडली.

लेनिनची भेट होण्यापूर्वी क्रपस्कायाला कोणत्या प्रसंगांतून जावे लागले याचे तिने तपशीलवार वर्णन केलेले आहे. ती लिहिते—' प्राग स्टेशनवर मी लेनिनची खूप वाट पाहिली. त्याला येणे जमले नाही तर तो दुसऱ्या कोणाला तरी पाठवून देईल, अशी माझी कल्पना होती; परंतु स्टेशनवर बराच वेळ थांबूनही कोणीच आले नाही हे पाहून मी टॅक्सी केली. ' मला येथल्या कामगार वस्तीत घेऊन चल ' असे मी टॅक्सी-वाल्याला सांगितले. माझ्याजवळ जो तुटपुंजा पत्ता होता तो मी टॅक्सीवाल्याला दाखविला. एक चिंचोळ्या गल्लीतील कामगारांच्या चाळीपुढे आमची टॅक्सी थांबली. लेनिन आता लवकरच भेटणार या कल्पनेने मी आनंदून गेले. त्या आनंदातच मी त्या जुनाट इमारतीचे तीन मजले झपाझप चढून चौथ्या मजल्यावर येऊन पोचले. दरवाजा ठोठावताच एक स्त्री बाहेर आली. ' हेर मोद्रँचेक इथंच राहतात ना ?' मी उतावीळ होऊन विचारत होते. एवढ्यात तिचा नवरा बाहेर आला आणि म्हणाला, ' होय, मीच मोद्रँचेक. ' मी गोंधळले. ' नाही. तुम्ही नाही. माझे यजमान! ' मी स्वत:शीच पुटपुटले.

मग कोठे त्या मोद्रँचेकच्या डोक्यात प्रकाश पडला. तो म्हणाला—' मला वाटते तुम्हांला हेर रिटमेयेर हवे आहेत. ते सध्या म्युनिकमध्ये आहेत. उफाला तुम्हीच होता ना ? त्यांनी तुम्हांला जी पत्रे धाडली त्यांवर माझे नाव व पत्ता होता. '

क्रपस्काया म्युनिकला जाण्यासाठी निघाली. प्रागप्रमाणेच म्युनिकच्या स्टेशनवरही तिला उतरवून घेण्यास कोणीही आलेले नव्हते. तिने टॅक्सी केली आणि मोद्रँचेकने दिलेला पत्ता टॅक्सीवाल्याला दाखवला. एका बीअर हॉलसमोर तिची टॅक्सी थांबली. ती त्या दुकानात शिरली व काऊंटरवर उभ्या असलेल्या जर्मन गृहस्थाला तिने विचारले, ' मला हेर रिटमेयेर हवे आहेत. '

' मीच तो. काय काम आहे ?' हे उत्तर ऐकताच क्रपस्काया पुन्हा गोंधळली. रडवेल्या चेहऱ्याने ती म्हणाली, ' नाही. तुम्ही नाही. मला माझ्या यजमानांना भेटायचे आहे. '

बाहेर एक स्त्री रडवेल्या आवाजात बोलते आहे हे ऐकताच रिटमेयेरची बायको आतून बाहेर आली व तिने विचारले, 'बाई, तुमचे नाव काय ? तुम्ही कुठून आलात ?'

'मी उफाहून आले आहे' असे ऋपस्कायाने सांगताच रिटमेयेरची बायको म्हणाली, 'हं. आता समजले. तू हेर मेयेरची बायको आहेस तर ! कारण, सैबेरियाहून आपली पत्नी लवकरच इथं येणार आहे, असे तो आम्हांला सांगत होता. मी तुला त्याच्याकडे घेऊन जाते. चल.'

ऋपस्काया त्या स्त्रीच्या पाठोपाठ चालू लागली. हा मेयेर तरी कोण निघतो ही शंका मनात घोळवीतच ती एका प्रशस्त इमारतीच्या आवारात पोचली. समोर लेनिन दिसताच आतापर्यंत प्रयत्नपूर्वक दडवून ठेवलेले अश्रू तिच्या गालांवरून ओघळू लागले. लेनिन, ॲना आणि मार्तोव्ह कसल्या तरी गहन चर्चेत गढलेले होते.

'तू तुझा नेमका पत्ता का कळविला नाहीस ? माणसानं शोधायचं तरी किती ?' ऋपस्काया चिडून बोलत होती.

'मी तुला हा पत्ता कळविला नव्हता ? काहीतरीच तुझं बोलणं ! मी आज तीन वेळा स्टेशनवर जाऊन आलो. कोणत्या गाडीनं तू आलीस ?' लेनिनने विचारले.

ऋपस्कायाला एवढा त्रास का झाला याचे कारण मागाहून कळले. ऋपस्कायाला आपला म्युनिकचा पत्ता कळविण्याची कामगिरी लेनिनने आपल्या एका मित्रावर सोपविली होती. परंतु ते पत्र टाकायला मित्र विसरला होता.

लेनिन आणि ऋपस्काया यांनी एका कामगाराच्या बिऱ्हाडातच आपला संसार थाटला. तो कामगार, त्याची पत्नी आणि सहा मुले दोन खोल्यांत राहायची व तिसरी खोली त्याने लेनिनला दिली होती. लेनिनचे लेखन-वाचन आणि ऋपस्कायाचा स्वयंपाक त्या एकाच खोलीत एकाच वेळी सुरू असायचा. लेनिनच्या लेखन-वाचनात व्यत्यय येऊ नये म्हणून ती स्टोव्हचा किंवा भांड्यांचा आवाज होणार नाही, अशी दक्षता घेत असे. लिहिण्यापूर्वी विचारांची जुळणी करण्यासाठी लेनिन खोलीत फेऱ्या मारत असे. शिवाय अशा वेळी स्वतःशीच बोलण्याचीही त्याला सवय होती. संध्याकाळी ते दोघे फिरायला बाहेर पडत तेव्हा सकाळी जे काही लिहिले असेल ते लेनिन तिला समजावून सांगे. सकाळी जे काही लिहिले आहे ते ऋपस्कायाला सांगितल्याशिवाय त्याला चैनच पडत नसे.

महिन्याभरातच लेनिनला तीन खोल्यांची दुसरी जागा मिळाली. त्यातल्या पहिल्या खोलीत त्याने 'इस्क्रा'ची कचेरी थाटली. दुसऱ्या खोलीचे अभ्यासिकेत रूपांतर करण्यात आले. संपादक-मंडळाच्या खाजगी चर्चा या खोलीत होत असत. एरवी लेनिनशिवाय दुसऱ्या कोणीही त्या खोलीत जाता कामा नये, असा नियम होता. हा नियम सर्वांनी कटाक्षाने पाळावा, असा लेनिनचा आग्रह असे.

'इस्क्रा'च्या संपादक-मंडळाची दुपारी एक वाजता जी बैठक सुरू व्हावयाची ती

संध्याकाळी सात-आठ वाजेपर्यंत चालायची. रशियाच्या निरनिराळ्या भागांतून अनेक कामगार-संघटना आपले वृत्तान्त सांकेतिक भाषेत धाडत असत. ते वाचून त्यांची मुद्रण प्रत तयार करणे हे संपादक-मंडळाचे महत्त्वाचे काम असे. या कामात ऋपस्कायाही मदत करी. ठिकठिकाणच्या पक्ष-कार्यकर्त्यांना धाडावयाच्या सूचना अदृश्य शाईने लिहून काढण्याचे कामही तिने स्वतःकडे घेतले होते. ही पत्रेही सांकेतिक भाषेतच असत. कधीकधी कामगारांना 'इस्क्रा 'च्या संपादक-मंडळाची सांकेतिक भाषा समजत नसे. अशा वेळी ते चिडून पत्रे लिहीत. असे एखादे पत्र लेनिनच्या हाती पडले, की तो आपल्या सहकाऱ्यांवर गर्जत असे.

यासंबंधीची एक आठवण लिडिया डॅनने—मार्तोव्हच्या बहिणीने— लिहून ठेवली आहे. 'एकदा माझ्या हातून अशी चूक झाली. माझे पत्र समजत नाही अशी रशियातून तक्रार आल्यानंतर तोंड कोठे लपवावे असे मला होऊन गेले. काल लेनिन सारखा कडाडत होता, 'तू एक दिवस आम्हा साऱ्यांना फाशीवर धाडशील. तुझ्यासारखे निष्काळजी कार्यकर्ते मिळाले तर क्रांतीची वाट पाहणे मूर्खपणाचे ठरेल.' हे शब्द लेनिन किती तरी वेळा उच्चारत होता. मला शरमल्यासारखे होऊन गेले. त्याचा राग शांत झाल्यानंतर मी विचारले, 'आपल्याला क्रांतीसाठी किती दिवस वाट पाहावी लागेल?' लेनिनचा आवाज एकदम बदलला. तो अगदी गंभीरपणे सांगत होता, 'बराच काळ वाट पाहावी लागेल. जवळजवळ वीस वर्षे.' लेनिनचे हे भाकित १९०१ मधले होते.

लेनिन रविवारी आपल्या मित्रांसमावेत दूर फिरायला जाई. दुपारच्या वेळी भोजनालयात शिरल्यावर तो निवडक चवदार पदार्थ मागवत असे. ऋपस्काया सुगरण म्हणून प्रसिद्ध नव्हती. तिचा स्वयंपाक बेताबाताचा असे. त्यामुळे निदान रविवारी तरी चवदार जेवण करण्यासाठी लेनिन नामवंत भोजनालयाच्या शोधात असे. तो बीअरही मोठ्या चवीने पीत असे. भरपूर जेवण झाल्यानंतर पुन्हा भटकंती सुरू होई. परंतु त्या वेळी राजकारणाची चर्चा करावयाची नाही अशी लेनिनची सक्त ताकीद असे. मित्रांबरोबर हिंडत असतानाही लेनिन गप्पांत फारसा भाग घेत नसे. आजूबाजूचे निसर्गसौंदर्य पाहण्याचा बहाणा करून तो आपल्या विचारात मग्न होई. गावाची वेस ओलांडून ही मित्रमंडळी थोडी पुढे आली की मग प्रत्येकास गाण्याची लहर येई. लेनिनही त्या सामुदायिक गायनांत भाग घेऊन इतरांचे मनोरंजन करी.

'इस्क्रा' प्रारंभी लायप्झिग येथील मुद्रणालयात छापले जात असे. परंतु थोड्या महिन्यांनी संपादकीय लोकांसाठी ते म्युनिकला आणण्यात आले. परंतु तेथे दोन-चार अंक प्रसिद्ध झाल्यानंतर आपण हे पत्र छापू शकत नाही, असे म्युनिकमधल्या छापखानेवाल्याने कळविल्यामुळे आता ते कोठे हलवावयाचे हा एक प्रश्नच होता. 'इस्क्रा' आता स्वित्झर्लंडमध्ये छापावे, असे प्लेखानोव्ह व ॲक्सेलरॉड यांनी सुचविले, परंतु बहुमताने लंडनची निवड करण्यात आली.

१९०२ च्या एप्रिलमध्ये लेनिन व क्रुपस्काया लंडनला राहावयास आले. पहिले पंधरा दिवस त्यांना एकाच खोलीत काढावे लागले. नंतर किंग्ज क्रॉस रोडवर त्यांना दोन खोल्यांची जागा मिळाली. परंतु या घराची मालकीण अतिशय चौकस स्वभावाची होती. एक दिवस तिने हुकूम फर्मावला, खिडक्यांना पडदे लावा! क्रुपस्कायाने लगोलग तिच्या हुकमाची अंमलबजावणी केली. पुन्हा एकदा मालकिणीचा चौकस स्वभाव जागा झाला व तिने विचारले, 'क्रुपस्काया, विवाहित स्त्रीच्या बोटात दिसणारी अंगठी तुझ्या बोटात दिसली नाही!' 'आम्ही पति-पत्नी आहोत,' असे क्रुपस्कायाने खूप सांगून पाहिले, परंतु त्या चौकस स्त्रीचे काही समाधान होईना. क्रुपस्कायावर ती पाळत ठेवू लागली. त्याचा क्रुपस्कायासला इतका त्रास होऊ लागला की, शेवटी तू असा त्रास देणार असशील तर मला तुझ्याविरुद्ध बदनामीची फिर्याद दाखल करावी लागेल, असे जेव्हा क्रुपस्कायाने तिला बजावले तेव्हा कोठे ती मालकीण स्वस्थ बसली.

या दोन खोल्यांच्या जागेत 'इस्क्रा'ची संपादकीय कचेरी थाटण्यात आली. लेनिनने पूर्वी सिडने व बिॲट्रिस वेब यांच्या इंग्रजी ग्रंथांचा रशियन अनुवाद केला होता. तरीही इंग्रजी भाषेचे आपले ज्ञान फारच तोकडे आहे असे त्याला लंडनला आल्यापासून जाणवू लागले. विशेषत:, इंग्रज लोकांचे बोलणे त्याला समजेना. म्हणून तो मुद्दाम हाईड पार्कमध्ये जाऊन तासन् तास बसू लागला. इतकेच नव्हे तर एका इंग्रज गृहस्थाची शिकवणीही त्याने सुरू केली. त्या इंग्रजाला लेनिन रशियन भाषा शिकवीत असे व त्या बदल्यात त्याच्याकडून इंग्रजीचे धडे घेई. हळूहळू लेनिन न अडखळता इंग्रजी बोलू लागला. त्याने लंडनचा नकाशा आणून कोणता रस्ता कोठे जातो हे जवळजवळ पाठ केले. बरेच रशियन क्रांतिकारक लेनिनच्या अगोदर लंडनमध्ये राहावयास आले होते. परंतु आपल्यापेक्षाही नव्याने येथे राहावयास आलेल्या लेनिनला लंडनची अधिक माहिती आहे हे पाहून ते आश्चर्यचकित होत. ब्रिटिश म्युझियम ग्रंथालय ही लंडनमधील लेनिनच्या आवडीची खास वास्तू. जगातील दुर्मिळ ग्रंथांचा येथील संग्रह पाहून लेनिनला आपल्या हाती खजिनाच लागल्याचा आनंद झाला. लंडनमधल्या वास्तव्यातला निम्मा वेळ त्याने या ग्रंथालयात व्यतीत केला. कार्ल मार्क्सही याच ग्रंथालयात बसून अभ्यास करीत होता, ही जाणीव लेनिनला विशेष स्फूर्तिप्रद वाटे.

लंडनचे जीवन समजावून घेण्यासाठी तो बसच्या वरच्या मजल्यावर बसून हिंडत असे. त्याचप्रमाणे कामगार वस्तीतही फेरफटका मारी. बसमधून दिसणारे लंडन आणि कामगारवस्तीतील डोळ्यांना खुपणारे दरिद्री लंडन—समृद्धी आणि दारिद्र्य, सुखासीनता आणि उपासमार यांचे हे विचित्र साहचर्य पाहिले की तो चिडून म्हणे— 'लंडन हे काही एकसंध शहर नव्हे. ही दोन निराळी राष्ट्रे आहेत.' लेनिनच्या दृष्टीने लंडन म्हणजे भांडवलशाहीचा बालेकिल्ला होता. लेनिन लंडनवर कडाडून

टीका करी, ही गोष्ट खरी असली तरीही या शहराने त्याच्या मनावर मोहिनी घातली होती, असे क्रुपस्कायाने म्हटले आहे. लंडनप्रमाणेच भोवतालचा ग्रामीण परिसरही त्यास आवडे. बसने प्रिमरोज हिलपर्यंत जाऊन येण्याचा त्याला नादच लागला होता. एकतर या प्रवासाला सहा पेन्स पुरेसे होत. शिवाय या टेकडीच्या माथ्यावरून धुक्याने आणि धुराने वेढलेले लंडन न्याहाळण्यात लेनिनला मजा वाटे.

४ फेब्रुवारी १९०३ रोजी लंडनहून आपल्या आईस धाडलेल्या पत्रात तो लिहितो, 'सध्या येथील हवा चांगली आहे. रशियाच्या मानाने येथला हिवाळा सौम्य वाटतो. अधून मधून पाऊस व धुक्याचा दाट थर. अशा वेळी लंडनच्या रस्त्यावरून हिंडण्यात गंमत आहे. आमचे येथील जीवन शांत आणि संथ आहे. कालच आम्ही एक इंग्रजी संगीतिका पाहावयास गेलो होतो. मला ती खूपच आवडली. मॉस्को आर्ट थिएटरमध्ये गॉर्कीचे 'दि लोअर डेप्थ्स्' पाहायला आपण किती उत्सुकतेने जात असू याची या वेळी आठवण झाली.' २९ मार्चच्या पत्रात तो लिहितो– 'हवा आता उबदार होऊ लागली आहे. परवाच आम्ही ई.व्ही.ला (क्रुपस्कायाची आई) घेऊन बरेच दूरवर फिरावयास गेलो होतो. बरोबर नुसते सँडविचेस घेतले होते. वातावरण इतके प्रसन्न होते, की आमच्या अंगात लहान मुलाचा उत्साह संचारला. रात्री घरी परतलो तेव्हा इतके दमलो होतो की झोप केव्हा लागली हे समजलेदेखील नाही.'

लेनिन लंडनला राहत असतानाच त्याची आणि ट्रॉटस्कीची पहिली भेट झाली सैबेरियातून पळालेला 'हा छोटासा गरुड' एका रविवारी सकाळी निष्कांचन अवस्थेत लेनिनच्या घरी पोचला होता. त्या वेळी लेनिन झोपलेला होता आणि टॅक्सीचे बिल चुकते करण्याइतकेही ट्रॉटस्कीजवळ पैसे नव्हते. क्रुपस्कायानेच खाली जाऊन टॅक्सीवाल्याला पैसे दिले. ती वर येऊन पाहते तो लेनिन आणि ट्रॉटस्की यांच्या गप्पा रंगात आलेल्या होत्या. तिऱ्हाइताला वाटावे की या दोघांची मैत्री बरीच जुनी आहे. ट्रॉटस्की लंडनला येऊन काही दिवस होत आहेत तोच त्याने रशियाला परतावे असे कोणीतरी सुचविले. परंतु लेनिनने त्या सूचनेला विरोध केला. ट्रॉटस्की माझ्याजवळच राहणार आहे असे त्याने निक्षून सांगितले. 'इस्क्रा'साठी आपल्याला एक नवा होतकरू सहकारी लाभला आहे, याच भावनेने लेनिन त्याच्याकडे पाहत होता. त्याला संपादकीय मंडळात घेण्यास प्लेखानोव्हचा विरोध होता. परंतु लेनिनचा आग्रह इतका जोराचा होता की प्लेखानोव्हला न बोलताच माघार घ्यावी लागली. १९०३ च्या मार्चपासून ट्रॉटस्कीचा 'इस्क्रा'च्या संपादकीय मंडळात प्रवेश झाला.

'क्रांती हाच ज्यांचा एकमेव 'व्यवसाय' राहील, अशा कार्यकर्त्यांचा गट निर्माण केला पाहिजे,' असे लेनिन 'इस्क्रा'च्या पानांमधून मोठ्या आवेशाने प्रतिपादन करू लागला. त्याच्या मताने केवळ संध्याकाळच्या फावल्या वेळात क्रांतीची चर्चा करणारे बोलघेवडे निर्माण होऊन काहीच उपयोग होणार नव्हता.

संपूर्ण जीवन केवळ क्रांतीसाठी खर्ची घालणारे मूठभरच पण निर्धारी सहकारी त्याला हवे होते. 'इस्क्रा'चा हा प्रचार इतका धारदार होता की अवघ्या दोन वर्षांच्या आत रशियातील सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या प्रत्येक शाखेत हे पत्र वाचले जाऊ लागले. या कामात पश्चिम युरोपमधून रशियन कामगारांना उद्देशून अनेक साप्ताहिके चालविली जात होती. परंतु लेनिनच्या प्रभावी लेखणीमुळे 'इस्क्रा'ने त्या इतर पत्रांवर अल्पकाळातच मात केली. क्रांतीसाठी लोकमत तयार करण्याची महत्त्वाची कामगिरी लेनिनने 'इस्क्रा'मार्फत पार पाडली. 'इस्क्रा'च्या प्रभावामुळेच १९०३ पासून रशियात कामगार–शेतकरी व विद्यार्थी यांच्या निदर्शनांना उठाव आला.

लेनिनचे हे प्रतिपादन सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या जुन्या नेत्यांना मान्य होत नव्हते. त्याचा रक्तमय क्रांतीवरचा विश्वास या लोकांना अनाठायी वाटत होता. या मतभेदामुळे पक्ष-कार्यकर्त्यांत संभ्रम निर्माण होईल हे ओळखून आपली भूमिका स्पष्ट शब्दांत विशद करण्यासाठी १९०२ मध्ये लेनिनने 'व्हॉट इज टुबी डन ?' हे पुस्तक लिहिले. 'क्रांतिकारकांचे बायबल' अशी या पुस्तकाला प्रतिष्ठा लाभली ती त्यातील क्रांतीच्या आत्यंतिक आग्रहामुळे! 'व्यावसायिक क्रांतिकारक' हा आपला आवडता सिद्धांत लेनिनने या पुस्तकात समजावून सांगितला आहे.

तो लिहितो–'प्रत्येक देशाचा इतिहास आपल्याला हेच सांगतो की संघटित होण्याची क्षमता फक्त कामगारवर्गातच आहे. आपल्या अधिकारासाठी केवळ कामगारवर्गच मालकांशी व सरकारशी भांडू शकतो. त्याबरोबरच स्वतंत्र विचार करण्याची ताकद या कामगारवर्गामध्ये नसते. त्यामुळे एक तर हे कामगार भांडवलदारांचे धार्जिणे बनतात किंवा समाजवादाकडे आकृष्ट होतात. कामगार संघटना उभारली की आपले कर्तव्य संपले असे भांडवलशाही समाजरचनेत मानले जाते. या दुबळ्या कामगार संघटनांमुळे कामगारवर्गात केवळ मानसिक गुलामगिरी निर्माण होते. ही गुलामगिरी भांडवलदारांच्या पथ्यावर पडते. अशा परिस्थितीत या कामगारवर्गाला समाजवादाकडे खेचावयाचे असेल तर काय केले पाहिजे, याचा आपण नीट विचार करावयास हवा. ही गोष्ट खरी की बुद्धिवंतांच्या तत्त्वज्ञानात्मक ऐतिहासिक आणि आर्थिक चिंतनामधूनच समाजवादाचे तत्त्वज्ञान जन्म पावले आहे. आधुनिक शास्त्रीय समाजवादाचे जनक म्हणून ओळखले जाणारे मार्क्स व एंगल्स बुद्धिजीवी वर्गातीलच होते. हा बुद्धिजीवी वर्ग नवे तत्त्वज्ञान निर्माण करू शकला तरी कामगार वर्गाला आपल्याकडे खेचावयाचे सामर्थ्य या वर्गाच्या अंगी नसते. या दोघांचा समन्वय घालण्याची अवघड जबाबदारी केवळ 'व्यावसायिक क्रांतिकारक'च पार पाडू शकतो. असे क्रांतिकारक निर्माण करणे हे आपल्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे उद्दिष्ट असले पाहिजे.'

लेनिन संपूर्णतया नवीन असे काहीच सांगत नव्हता. पीटर त्काचेव्हच्या सिद्धांताचीच ती पुनरुक्ती होती. १८७४ मध्ये त्काचेव्हने लिहिले होते–'क्रांती घडवून



लेनिनचे प्रारंभीचे सहकारी त्याच्या डाव्या बाजूस मार्तोव्ह दिसत आहे.

आणण्याचे सामर्थ्य सर्वसामान्य जनतेत कधीच निर्माण होत नाही. अल्पसंख्याक निर्धारी क्रांतिकारकच ते कार्य पार पाडू शकतात. एक दिवस आम जनता उठेल आणि क्रांती घडवून आणील, अशी भाबडी आशा मनात बाळगून स्वतःची फसवणूक करण्यात काहीच फायदा नाही. लोकमत क्रांतीला अनुकूल असले पाहिजे एवढेच क्रांतिकारकांनी पाहावयाचे असते. लोकमताची तेवढी तयारी झाली असली की प्रत्यक्ष क्रांती घडवून आणण्याचे बिकट कार्य मूठभर क्रांतिकारकांनाच करावयाचे असते. त्यांनी परिस्थितीवर स्वार व्हावयाचे असते. लोक निमूटपणाने त्यांच्या मागे येतात.'

त्काचेव्हच्या आणि लेनिनच्या प्रतिपादनात फरक नव्हता. फरक होता तो फक्त भाषेत. त्काचेव्ह 'जनता' असा शब्द उच्चारतो तर लेनिनच्या डोळ्यांपुढे जनता म्हणजे फक्त कामगार वर्गच येतो.

या कालखंडात लेनिनने जे जे लिखाण केले त्या त्या प्रत्येक ठिकाणी त्याने 'व्यावसायिक क्रांतिकारक' निर्माण करण्याचा आग्रह व्यक्त केला आहे. लेनिनला मूलतः क्रांतीचा ध्यास लागला होता व कामगारवर्ग या क्रांतीचे स्वागत करावयास तयार होईल या दृष्टीने तो सतत कामगारवर्गाला आवाहन करीत होता. येथेच लेनिनं इतर मार्क्सवाद्यांपासून दूर गेल्याचे आढळून येते. इतर सर्व मार्क्सवाद्यांना कामगारवर्गाचे हित अभिप्रेत होते व हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्यांना क्रांतीची आवश्यकता वाटत होती. या उलट प्रस्थापित राज्यसत्ता उलथून टाकण्यासाठी लेनिनला क्रांती हवी होती. फार तर कामगारवर्गाच्या हितासाठी प्रस्थापित राज्यसत्ता त्याला

उलथून टाकावयाची होती, अशी पुस्ती जोडता येईल. परंतु या दोन्ही विचारसरणीं मूलतः भिन्नता आहे ही गोष्ट विसरून चालणार नाही.

**प्लेखानोव्हसारख्यांना कामगारवर्गासाठी क्रांती हवी होती तर लेनिनला क्रांतीसाठी कामगारवर्ग हवा होता.**

१९०३ पासून लेनिन आणि त्याचे प्रारंभीचे मार्क्सवादी सहकारी वेगळे पडत गेले, याचे कारण या वैचारिक मतभिन्नतेत आहे. शिवाय लेनिनचा स्वभावही या फाटाफुटीला कारणीभूत ठरला. आपल्या सहकाऱ्यांपैकी कोणीही आपल्यास विरोध करता कामा नये, असा त्याचा हट्ट असे. परस्पर विचारविनिमयावर त्याचा मुळी विश्वासच नव्हता. आपण सांगावे आणि इतरांनी ते निमूटपणाने ऐकावे हीच एक पद्धत त्याच्या असहिष्णू मनःप्रवृत्तीशी सुसंवादी होती आपल्या विरोधी मत व्यक्त करणाऱ्याला तो तत्काळ आपला शत्रू समजू लागे व अशा 'शत्रू'चा काटा काढण्यासाठी कोणत्याही सूक्तासुक्त उपायांचा वापर करण्याचा त्याला किंचितदेखील विधिनिषेध नसे. आपल्याविरोधी मत नष्ट करण्याच्याच लायकीचे आहे, असा त्याचा आग्रह असे. व्हेरा झासूलिचने लिहिले आहे—'प्रारंभी आम्ही सारेजण एका कुटुंबातील घटकांप्रमाणे वागत होतो. परंतु थोड्याच कालावधीत लेनिनची स्वभावजन्य हुकूमशाही प्रवृत्ती इतक्या प्रकर्षाने आम्हांला जाणवू लागली, की बैठकीत तोंड उघडण्याचीही आम्हांला पंचाईत व्हावी.'

लेनिनच्या लेखणीला सुसंस्कृत शैलीची किनार नाही, अशी प्लेखानोव्हने टीका करताच लेनिन भडकून उठला. विचारवंतांनाही आपले लिखाण वाचावेसे वाटले पाहिजे यावर प्लेखानोव्हसारख्यांचा भर होता. याउलट सर्वसामान्य कामगाराला उद्देशून लिहावयाच्या लिखाणात उगाच भाषेचा दिमाख कशाला, असा लेनिनचा प्रश्न असे. जी गोष्ट लिखाणाची तीच वक्तृत्वाचीही! पक्ष-कार्यकर्त्यांच्या बैठकीमध्ये प्लेखानोव्हच्या डौलदार वक्तृत्वापुढे लेनिनचे रासवट बोलणे निष्प्रभ ठरे. परंतु अशिक्षित कामगारवर्गाला लेनिनची ही असली भाषा समजत असे त्यामुळे संघटना-कौशल्याच्या बळावर प्लेखानोव्हसारख्या विचारवंतांना लेनिन चुटकीसरसा बाजूला करू शकला.

*थोडक्यात सांगावयाचे तर लेनिन हा जन्मजात राजकीय पुढारी होता. विचारांपेक्षा कृतींवर आणि सिद्धांतांपेक्षा व्यावहारिक उपयुक्ततेवर त्याचा भर असे. दया, माया, मैत्री, जिव्हाळा, प्रामाणिक मतभेद हे शब्द आणि या भावना लेनिनच्या कोशातच नव्हत्या. त्यामुळेच त्याच्या मतांशी विरोधी असा कोणी सूर काढला की लागलीच तो चवताळून 'विश्वासघातकी', 'जनताद्रोही', 'भांडवलदारांचा हस्तक' अशा शेलक्या शिव्या वापरून मोकळा होई. इतकेच नव्हे तर कालपर्यंतच्या सहकार्याला पक्षातून आणि*

*लोकांतून उठविण्यासही तो मागेपुढे पाहत नसे. वैचारिक मतभेद नावाची चीज असू शकते यावर त्याचा विश्वासच नव्हता.*

या स्वभावभिन्नतेचे प्रतिबिंब 'इस्क्रा'च्या संपादकीय मंडळाच्या बैठकीतही वारंवार दिसू लागले. वर्षा–दोन वर्षांतच प्लेखानोव्ह, ॲक्सेलरॉड व व्हेरा झासुलिच हा एक गट आणि लेनिन, मार्तोव्ह व पोट्रेसॉव्ह हा दुसरा गट, अशी परिस्थिती निर्माण झाली. प्लेखानोव्हने काहीही सुचविले की लेनिन त्याला विरोध करी. याच सुमारास सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या आगामी कार्यक्रमाचा मसुदा तयार करण्याचे कार्य प्लेखानोव्हकडे सोपविण्यात आले. प्लेखानोव्हने तयार केलेल्या मसुद्यावर 'इस्क्रा'च्या संपादकीय मंडळात चर्चा सुरू झाली तेव्हा लेनिनने प्लेखानोव्हवर कडक हल्ले चढविण्यास प्रारंभ केला. एके ठिकाणी 'कामगारवर्गाची शक्ती' असा प्लेखानोव्हने उल्लेख केला होता, त्याऐवजी 'कामगारवर्गाची हुकूमशाही' ही शब्दसंहिता पक्षाच्या ध्येयधोरणात अंतर्भूत करण्याचा लेनिनने आग्रह धरला; इतकेच नव्हे तर सर्वांकडून तो मान्यही करून घेतला.

प्लेखानोव्ह आदी सहकाऱ्यांना निष्प्रभ करावयाचे असेल तर आता लेनिनला लंडनमध्ये राहून चालण्यासारखे नव्हते. म्हणून १९०३ च्या एप्रिलमध्ये तो स्वित्झर्लंडला आला व जिनिव्हालगतच्या सेशेरॉन या उपनगरात राहू लागला. आता मतभेदांना अधिकच धार चढू लागली. प्रारंभी मार्तोव्ह व पोट्रेसॉव्ह हे लेनिनच्या बाजूने उभे राहत. परंतु लेनिनची हुकूमशाहीवृत्ती त्याच्या या निकटच्या सहकाऱ्यांनाही लवकरच जाचक व असह्य वाटू लागली.

या कालखंडाबद्दलच्या आपल्या आठवणीत पोट्रेसॉव्हने असे लिहिले आहे की, 'लेनिनचे सहकारी म्हणून काम करणे आम्हांस अशक्य होऊन जाई; कारण तो कोणाचेच ऐकेनासा झाला. थोडीशी मतभिन्नता दाखविली की तो चिडत असे इतकेच नव्हे तर अशा व्यक्तीला तो आपला शत्रू मानू लागे. लेनिन केवळ एककल्ली विचाराचाच गृहस्थ होता असे नव्हे,तर तो तितकाच लबाडही होता. रशियातून येणाऱ्या पत्रांपैकी त्याला सोयीस्कर असणारी पत्रेच तेवढी तो आम्हांला दाखवीत असे. कसेही करून आपले मत इतरांवर लादण्याचा तो खटाटोप करी. स्वतःच्या महत्त्वाकांक्षेसाठी मैत्रीवरही तिलांजली देण्याची त्याला खंत वाटत नसे. आपला शब्द सहीसही झेलणारे ते अनुयायी आणि आपल्याशी मतभिन्नता व्यक्त करणारे ते शत्रू, अशी तो सरळ विभागणी करून टाकत असे. या दोन टोकांच्यामध्ये कोणी उभा असू शकतो हे त्याला मंजूर नव्हते.'

लेनिनचे पोट्रेसॉव्हसारख्या प्रारंभीच्या सहकाऱ्याला घडलेले दर्शन हे असे होते. मार्तोव्हलाही ते लवकरच अनुभवावे लागणार होते.

(क्रमशः)

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ पब्लिक प्रेम

त्याने व तिने एकमेकांकडे डोळे भरून पाहिले, कोणीच काही बोलले नाही, पण त्या बोलक्या नजरेनेच त्यांनी एकमेकांना सांगायचे ते सांगितले, वगैरे वगैरे इ. इ. याला म्हणतात प्रेम. असे आम्ही कॉलेजात शिकत असताना फडक्यांच्या कादंबऱ्यांतून शिकलो. फडकेच कशाला, सर्वसाधारणपणे प्रत्येक भारतीय माणसाची अशी ठाम बुरसटलेली समजूत आहे की प्रेम हे एक प्रायव्हेट प्रकरण आहे. पण पब्लिक प्रेमाचा एक 'तंत्र–उद्‌घाटक' किस्सा अमेरिकेत घडल्याचे नुकतेच वाचनात आले. सॉल्ट लेक सिटी नावाच्या शहरात मार्थ हायनर याचे नादीन वाइसमन हिच्यावर प्रेम होते व त्याला ते प्रकट करायचे होते. मग काय त्यान तिला एकांतात भेटून ते सांगितले ? छे ! मग टेलिफोन केला ? छे, छे ! त्याने तिच्या ऑफिसच्या वाटेवर भर गर्दीच्या चौकात एक जंगी फलक लावला–" नादीन, माझे तुझ्यावर प्रेम आहे. माझ्याशी लग्न करशील ?–मार्थ." बरोबर दोन आठवडे नादीनसकट हजारो लोकांनी ती प्रेमाची जाहिरात वाचली. अखेर कंटाळून नादीनने होकार दिला–त्या फलकावरच ! आता बोला, कुठे गेली तुमची ती बोलकी नजर अन् ते फक्त एकमेकांकडे डोळे भरून पाहणे ? नादीनने (अन् इतर हजारो लोकांनी) त्या प्रेमपोस्टरकडे डोळे भरून पाहिले तेव्हा ती प्रीति–पाटी रंगविणाऱ्या रंगाऱ्यानेच तिला (स्पष्ट शब्दांत) सांगायचे ते सांगितले. पण बायकांची जातच हट्टी, त्यामुळे तब्बल दोन आठवडे नादीनने ती पाटी वाचण्यात घालविले. शेवटी मला वाटते "खास लोकाग्रहास्तव" तिने मार्थला होकार दिला असावा.

असो. पब्लिक प्रेमाची ही अशी सांगता झाली. मला वाटते कोका–कोला प्यायला सांगण्यापासून प्रेम करायला सांगण्यापर्यंत जर जाहिरात–फलकाचा उपयोग होऊ शकतो तर तो इतरही बऱ्याच गोष्टींसाठी होऊ शकेल. समजा, उद्या बुधवार चौकात एक जंगी पाटी दिसली–" अहो, सांगितलेलं विसरू नका !" तर काय होईल ? अनेक बायकांना संध्याकाळी न मागितलेली वेणी मिळेल, अनेकजणींना ठरलेले नसतानाही सिनेमा पाहायला मिळेल, तर अनेक सौभाग्यशाली सौभाग्यवतींना आशा नसलेली साडीही मिळेल. कारण पाटी पाहिल्याबरोबर ती आपल्या हिनेच लावली आहे अशी प्रत्येक नवऱ्याची खात्री होईल व आपण नक्की असे काही तरी विसरलो आहोत, अशा धास्तीने चुकीच्या दुरुस्तीचे सार्वजनिक प्रयत्न होतील.

## □ मरण्याची अपूर्व संधी

कल्याणकारी राज्य कशासाठी असते ? लोकांचे जीवन सुखात जावे म्हणून, असे याचे उत्तर देण्यात येते. पण हे अर्धसत्य आहे, उरलेले अर्धसत्य काय ? कल्याणकारी राज्यात माणसाचे मरणही सुखांत व्हायला पाहिजे. क्यूबामध्ये तरी लोकांच्या या इहलोकोत्तर कल्याणाकडे अधिक लक्ष पुरविण्यात आलेले दिसते. कारण यापुढे क्यूबामध्ये कुणाच्याही उत्तरक्रियेला पैसे पडणार नाहीत असा कॅस्ट्रो सरकारचा हुकूमनामा निघाला आहे. अहाहा, मरण्याची केवढी ही अपूर्व संधी ! फिरुनि जन्मा यावे परी या महागाईच्या काळात क्यूबात मरावे ! पण क्यूबाच्या जनतेला ही सुवर्णसंधी न दवडण्याइतकी अक्कल आहे का ? की हे लोक आपले वेड्यासारखे जगतच राहतील ? त्यांनी निदान एकदा तरी कन्सेशन रेटने" मरून पाहावे, अशी माझी त्यांना आग्रहाची सूचना आहे. आम्ही भारतीयांनी अशी सवलत कधीच वाया जाऊ दिली नसती. सवलतीच्या दरातल्या सिनेमापासून साबणापर्यंत सर्व काही आम्हांला स्वीकारार्ह आहे, मग सवलतींतला स्वर्ग आम्ही कसा सोडू ?

## □ अधिक मंत्री पिकवा

लाल त्रिकोण ही संततिनियमनाची सरकारी खूण दिल्लीत बरीच बोकाळली आहे. ती रस्तोरस्ती तर दिसतेच, पण एका अजब ठिकाणीही नुकतीच दिसली— एका केंद्रीय मंत्र्याच्या घरासमोर ! आश्चर्य आहे. गेली वीस वर्षे आपले केंद्रीय सरकार अधिक मंत्री पिकविण्याची मोहीम निष्ठापूर्वक चालवीत आले आहे व ती इतकी यशस्वी ठरली आहे की नवीन सत्तेवर आलेल्या विरोधी पक्षांच्या प्रांतिक सरकारांनीही ती उत्साहाने उचलून धरली आहे. असे असताना एका केंद्रीय मंत्र्याला तांबड्या दिव्याप्रमाणे तांबडा त्रिकोण दाखविण्याचे कारण काय ? छेः, छेः, या त्रिकोणाने मंत्रीजमातीचे वाटोळे व्हायचे. आणि मंत्री हा एक दुर्मिळ प्राणी झाला तर उपदेश स्वस्त कसा राहणार ! कारण मंत्री नाही, म्हणजे लोकांनी कसे वागावे हे सांगणारी भाषणेही नाहीत व लोकांनी कसे वागू नये, हे दाखविणारी उदाहरणेही नाहीत. तेव्हा हिंदुस्थानसाठी अधिक धान्य पिकविण्याची मोहीम अमेरिकेत आहे ती तेथेच ठेवून हिंदुस्थानात अधिक मंत्र्यांची पैदास करण्यावरच सगळे लक्ष केंद्रित करणे लोकहितासाठी आवश्यक आहे.

●



अभ्यासमंडळातील एक चर्चा

# जिज्ञासू 'रसिक वृंद'

ललित कलांविषयी आस्था आणि जिज्ञासा बाळगणारे एखादे अभ्यासमंडळ पुण्यात असेल याची मला परवापर्यंत कल्पना नव्हती. अभ्यासमंडळ म्हटले की ते बहुधा कोणत्यातरी राजकीय पक्षाच्या दावणीला बांधलेले 'गुरू' असेल अशी माझी आपली प्रामाणिक कल्पना. पण माझ्या या कल्पनेचे 'दावे' परवा भालबा केळकरांनी स्वतः जातीने तोडले. त्याचं असं झालं, मी नेहमीप्रमाणे आकाशवाणीच्या ऑफिसात माझ्या कामात गढून गेलो होतो. काही कलावंतांना कार्यक्रमाची तारीख बदलून हवी होती, तर काहींना वेळ बदलून हवी होती, एका कलावंताला 'अहीर भैरवा' ऐवजी 'देसी' गायचा होता, तर दुसऱ्याला सकाळच्या कार्यक्रमात 'साहोनीची' ठुमरी गायची होती. या साऱ्या कलावंतांच्या पत्रांना उत्तरं देण्यात मी इतका गढून गेलो होतो की भालबा माझ्यासमोर खुर्चीवर केव्हा येऊन बसले ते मला कळलंसुद्धा नाही. माझं काम झाल्यावर ते म्हणाले

आमचं एक छोटंसं अभ्यास मंडळ आहे—' नाव आहे 'रसिकवृंद'.

"तर या रसिकवृंदापुढे तुमचा एक टेबलटॉक ठेवावा अशी आमची इच्छा आहे," भालबांनी मुद्याला हात घातला.

"टेबलटॉक ? म्हणजे काय ?"

"म्हणजे सरळ सरळ व्याख्यान नाही. मी तुम्हांला काही विचारीन. तुम्ही त्याची उत्तरं द्यायची. तुमच्या या उत्तराबद्दल कोणा श्रोत्याला शंका असली तर त्यांनी तिथल्या तिथे ती शंका विचारायची आणि तुम्ही तिचं तिथल्या तिथे निरसन करायचं. मग पुन्हा प्रश्न पुन्हा उत्तर. असंच पुढं जायचं."

भालबांनी 'टेबलटॉक' म्हणजे काय ते सांगितलं. मला ही कल्पना आवडली.

"छान आहे कल्पना भालबा. पण मी कशावर बोलणार ?" मी विचारले.

"अर्थात संगीतावर. हे पाहा, मी काही मुद्दे पण आणले आहेत." खिशातून कागद काढीत भालबा म्हणाले.

"हा पाहा. संगीताची वाटचाल. हा पहिला. संगीतातून भावनाविष्कार हा दुसरा. या व्यतिरिक्त तुम्हांला आणखी काही विषय सुचवायचे असले तर सुचवा—"

त्यानंतर आम्ही बराच वेळ संगीताच्या निरनिराळ्या वादग्रस्त प्रश्नांवर चर्चा करीत होतो. दोघांनी इराण्याकडे चहा घेतला. मी सिगरेट पेटविली. "सात तारखेला संध्याकाळी सहा वाजता फर्ग्युसन कॉलेजमध्ये न विसरता या," असे म्हणून भालबांनी रेनकोट सावरीत सायकलवर टांग मारली.

सात तारखेला ठरलेल्या वेळी मी फर्ग्युसन कॉलेजात पोचलो. एका छोट्याशा हॉलमध्ये पंधरा-वीस जिज्ञासू चेहरे बसले होते. काही मुली, काही मुलं. एखाद-दुसरा प्राध्यापक. त्यांतल्याच दोघांनी माझं स्वागत केलं: आम्ही चिटणीस आहोत, अशी स्वत:ची ओळख करून दिली. मला अगत्यानं खुर्ची दिली. इतक्यात भालबा पण आले आणि आमच्या 'टेबलटॉकला' सुरुवात झाली.

सहा वाजता सुरू झालेली ही चर्चा तब्बल साडेआठ वाजले तरी संपली नव्हती. वक्त्याच्या विधानाला माना डोलवणारा आणि टाळ्या पिटणारा हा 'रसिकवृंद' नव्हता. इथे प्रत्येकाच्या डोक्यात जिज्ञासा होती. स्वतंत्र विचार होते. 'का' आणि 'कसे' यांनी प्रत्येकजण त्रस्त होता. माझ्या आणि भालबांच्या प्रत्येक विधानावर प्रत्येक कोपऱ्यातून प्रश्नांच्या फैरी झाडल्या जात होत्या. प्रत्येक विधानाचा धागान् धागा उलगडून त्यांतला तंतून् तंतू मोकळा केल्याशिवाय या 'वृंदा' तल्या 'रसिकां'चं समाधान होतच नव्हतं. कोणतीही कला 'सिम्प्लिसिटी' ( Simplicity ) कडून 'कॉम्प्लेक्सिटी' ( Complexity ) कडे जात असते असं मी म्हणायचाच अवकाश, 'संगीतात याचं उदाहरण सांगा' असा सवाल आला. याची उदाहरणं देऊन, 'शंकात्रस्त' रसिकाला 'शांत' करून मी पुढे म्हणालो, "संगीत ही सर्व ललित कलांत श्रेष्ठ आहे; कारण तुमच्या भावनेला सरळ आवाहन करण्याचं, थेट तुमच्या अंत:करणाला हात घालण्याचं सामर्थ्य फक्त संगीतातच आहे. इतर कोणत्याही कलांमध्ये हे सामर्थ्य नाही. कारण, चित्रकला काय किंवा साहित्य काय, त्यांचा आस्वाद घेण्याची एक किमान पात्रता अंगी यावी लागते. पण संगीताचं तसं नाही. म्हणूनच प्रत्येकाला संगीत आवडतं ते प्रत्येकाला आकर्षून घेऊ शकतं." मी एवढं म्हणायचाच अवकाश लगेच प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली. भावनेला आवाहन म्हणजे काय? भावना म्हणजे काय? विशिष्ट स्वर विशिष्टच भावना निर्माण करतात काय? याला प्रमाण काय? अनेक तोंडांतून निघालेले अनेक प्रश्न! त्यांना तोंड देता देता माझ्या आणि भालबांच्या नाकी नऊ आले. पण उत्तरं देताना आनंद वाटत होता. बुद्धीला कसली तरी धार चढत होती. नुसत्या माना डोलवणाऱ्या शेकडो प्रेक्षकांपुढे व्याख्यान देऊन आणि कॉफी पिऊन घरी जाण्यापेक्षा या शेलक्याच पण 'अथातो ज्ञान जिज्ञासा' म्हणणाऱ्या या 'रसिकवृंदा'च्या त्या प्रश्नांच्या भडिमाराला उत्तरं देण्यातला आनंद वेगळाच होता.

नऊ वाजत आले तेव्हा मंडळी उठली. घरी निघालो तेव्हा मन तृप्तीनं भरलं होतं. वाटत होतं, संगीत शास्त्राला निश्चितच उज्ज्वल भवितव्य आहे. पंडित भातखंडेंनी पेरलेल्या बीजातून अंकुरित झालेल्या अंकुरांची लवलव प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली होती मी या जिज्ञासू रसिकवृंदात.

अरविंद गजेंद्रगडकर

२९ जुलै १९६७

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी**

**सायनाचार्य, नासिक**

## ऑगस्ट १९६७चे राशिभविष्य

**मेष** : अनिष्ट मंगळाबद्दल आता धास्ती बाळगण्याचे यत्किंचितही कारण नाही. त्या मंगळाची जखम बुजली आहे. वण फक्त शिल्लक आहे.

ऑगस्ट महिन्यातील सूर्य-शनी त्रिकोण आणि सूर्य-गुरू युती हे दोन अनन्यसाधारण योग तुम्हांला हवं ते द्यायला कटिबद्ध आहेत.

दुसऱ्या पंधरवडचात सूर्य पंचमस्थानी येताच सर्वत्र प्रसन्न व आशादायक वातावरण दिसू लागेल.

शैक्षणिक क्षेत्रात, राजकीय आखाडचात आपणांस प्रतिस्पर्धीच उरणार नाही. या वेळच्या ग्रहस्थितीची बठक अशी आहे की, आपण काहीही करायचे ठरविलेत तरी ते पूर्णत्वाने यशस्वी ठरावे.

दि. ५ ते ९ आणि १५ ते २२ या कालावरच सारे लक्ष केंद्रित करा.

**वृषभ** : ऑगस्ट महिना पराक्रमातील अनेक समर्थ ग्रहांमुळे अचाट कर्तृत्वाचा ठरेल. न होणारी कामे झटपट यशस्वी ठरायला लागतील, या माझ्या म्हणण्याचा आपणांस प्रत्ययच घ्यायचा असेल तर रवि-शनी त्रिकोण (दि. ५ )व रवि-गुरू युती (दि. ८) या काळावर लक्ष केंद्रित करा.

हरवलेले राजकीय प्रतिष्ठेचे स्थान गवसेल. समाज तुमच्याकडे आशेने पाहू

लागेल. व्यवसाय क्षेत्रातील फार मोठे प्रतिष्ठेचे स्थान सहजासहजी मिळू शकेल.

नोकरीधंद्यालाही प्रचंड उत्थान देणारा हा महिना आहे. दुसऱ्या पंधरवड्यात थोडीशी गती मंदावल्यासारखी जाणवेल. पण क्षणभरच.

दि. ४ ते ९, १७ ते २२, २९ ते ३१ या काळाची प्रामुख्याने नोंद ठेवा.

**मिथुन :** तुमच्या व्यक्तिमत्त्वाभोवती निर्धार निष्ठेचे कवच असल्यामुळे चौथ्या मंगळाचा अनिष्ट काल आला अन् गेला. त्याची तुम्हांला दखल घ्यायची गरजही भासली नाही.

हा महिना–विशेषतः दुसरा पंधरवडा– राजकीय क्षेत्रात, यांत्रिक व्यवहारातच तुमचे महत्त्व निरपवादपणे सिद्ध करू शकेल.

पराक्रमस्थानी सिंह–सूर्य येताच (दि. १७) तुमच्या उज्ज्वल भविष्यकालाची तुम्हांला चाहूल लागू लागेल. स्थगित कामांचे डोंगर भराभर उपसले जातील. नवे कार्यक्रम हिरीरीने यशस्वी करून दाखविले जातील.

तुमचे कोणतेही कार्यक्षेत्र असो त्यात आपण या वेळी हेवा करण्यासारखे यश संपादू शकाल.

दि. ३ ते ७, १९ ते २७ या कालाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल.

**कर्क :** चौथ्या मंगळाच्या धिंगाण्याला आता कुठे ऊत आला आहे. त्याच्या धांगडधिंग्यामुळे, तुमच्या नाजूक हृदयाला हादरे बसू लागतील, मन बावरून जाईल आणि आनंदाची गोष्ट अशी की, ऑगस्टच्या दुसऱ्या पंधरवड्यापासून तुमच्या जीवन-इतिहासात एक नवे पान लिहिले जाईल.

अनारोग्याची चिंता वाटेनाशी होईल, राहत्या जागेची विवंचना मिटेल, अशी आशा वाटू लागेल. हरवलेले स्वास्थ्य लवकरच गवसेल अशी लक्षणे स्पष्टपणे दिसायला लागतील.

या महिन्यातील सूर्य-गुरू योगापासूनच ( दि. ८ ) आपल्या व्यवसायाला आकर्षक स्वरूप येऊ लागेल. नोकरीतील गेलेली संधी पुन्हा लाभण्याची आशा वाटू लागेल. वैद्यकीय-रासायनिक क्षेत्रातील व्यक्तींना हा महिना सर्वांगीण विकासाचा ठरेल.

दि. ५ ते ११, १६ ते १९, २३ ते २७ हे दिवस विशेष प्रगतीचे जाणवतील.

**सिंह :** ध्येयवादाने झपाटलेले लोक फक्त सिंह राशीतच पाहावयास मिळतात. सातत्य आणि नैष्ठिक आचारधर्म हा त्यांचा स्थायीभाव आणि या अनन्यसाधारण गुणधर्मामुळेच ते लोक सदैव आघाडीवर राहतात. त्यांना माघार आणि कनिष्ठ अवस्था माहीतही नाही.

या महिन्यात सूर्य-शुक्र तुमच्या राशीतून संचारणार आहेत. गुरूही तिथे येण्यासाठी निघाला आहे. या सर्व ग्रहस्थितीचा कानोसा घेऊन मी तरी ठासून म्हणू शकेन की, आगामी ४–६ महिन्यांचा काल हाच तुमचा परमोत्कर्षाचा काल.

यांत्रिक–कला–साहित्य जे जे तुमचे कार्यक्षेत्र असेल त्यात आपणांस या महिन्यापासूनच हेवा करण्यासारखे यश मिळायला लागेल.

दि. २ ते ९, १५ ते २१, ३०–३१ हाच तुमचा अपेक्षासाफल्याचा काल.

**कन्या :** कन्या राशीची माणसे या वेळी आणि यापुढेही काही दिवस सतत आघाडीवर राहावीत अशीच ग्रहस्थितीची इच्छा दिसते. ती त्यांची इच्छा शिरसावंद्य मानून आपण निर्धाराने कार्यास लागलात तर तुमचा उज्ज्वल भविष्यकाल आताच तुमच्या हाती आल्यासारखा वाटू लागेल.

व्यवसायधंद्यात अनेक मोठाले लाभ सहजासहजी उठवू लागतील. याच वेळी अंगीकृत व्यवहारात काही भव्य–दिव्य–नव्य करावे असे वाटू लागेल आणि त्या दृष्टीने आपली पावले पडू लागतील. या वेळी जे काही विशेष आणि चिरस्मरणीय असे घडायचे असेल ते दि. ५ ते १५ याच काली.

दि. ५ ते १५ , २१ ते २६ हा कालखंड प्रगतीला पोषक ठरेल.

**तूळ :** ऑगस्ट महिन्यातील काही क्षण असे आढळतील की, आपल्या जीवनात ते नवा पर्वकाल निर्माण करतील. आपणांस लवकरच अकरावा गुरू येणार आहे आणि त्याची प्रसादचिन्हे या महिन्यातील दुसऱ्या पंधरवड्यापासून दिसायला लागतील.

प्रामुख्याने कलावंतांना–सौंदर्य प्रसाधनांच्या व्यावसायिकांना– हा महिना साऱ्या अपेक्षा सफल करणारा जाणवेल. अनपेक्षितपणे धनलाभ होतील, राजकीय क्षेत्रात प्रतिष्ठा वाढीला लागेल. साहित्याच्या क्षेत्रात सत्कारसमारंभ घडून यायला लागतील.

हा महिना प्रवास–बदली–बढतीही घडवून आणू शकेल.

दि. ३ ते ९, १३ ते १९, २२ ते २६ संस्मरणीय घटना घडून याव्यात.

**वृश्चिक :** भाग्यस्थानी गुरू आणि त्याच्या सान्निध्यात सूर्य-बुध हा मणिकांचन योगच. अशा वेळी तरी आपणांस बाराव्या मंगळाची व्यथा जाणवणार नाही.

पहिलाच पंधरवडा चांगला गाजून जाईल. सामाजिक बहुमान लाभेल, राजकीय प्रतिष्ठा उंचावेल, नोकरीधंद्यातही चिरस्मरणीय घटना घडून यायला लागतील.

मंगळाची नाराजी असल्यामुळे आपले हितशत्रू मधून मधून वळवळ करू लागतील, पण त्यांना ठोकरून काढणे आता फारसे अवघड वाटू शकणार नाही. या महिन्यातील मुख्य महत्त्वाची घटना म्हणजे दूरचा प्रवास–स्थानांतर–बदल.

दि. ६ ते १०, १४–१२ या कालात आपले बरेच हेतू सफल व्हावेत.

**धनू :** ऑगस्ट महिन्याचा सारा पहिला पंधरवडा यथातथाच. त्याच विवंचना-त्याच अडचणी.

दुसऱ्या पंधरवड्यात सूर्य भाग्यस्थानी प्रवेश करताच ( दि. १७ ) सारे कालचक्र अनुकूल फिरू लागल्याचा प्रत्यय यायला लागेल. जे घडणे शक्य नव्हते ते

घडून यायला लागेल. ज्या एका गोष्टीबद्दल यत्किंचितही अपेक्षा केली नव्हती ती महत्त्वपूर्ण प्रगतिकारक गोष्ट ध्यानीमनी नसता एकाएकी घडून यावी.

दुसऱ्या पंधरवड्यात बदली–बढतीचा योग दिसू लागेल. सामाजिक कार्यक्रमाच्या जबाबदाऱ्या अंगावर पडतील आणि त्या पार पाडाव्याच लागतील. या कामात दगदग खूप झाली तरी हेवा करण्यासारखी प्रतिष्ठा निश्चितच लाभेल.

दि. ५ ते ११ आणि १८ ते २५ या काळात अनंत चांगल्या गोष्टी घडतील.

**मकर :** आपली प्रगतीची घोडदौड याही महिन्यात अबाधितपणे सुरू राहील. व्यावसायिक यश अपेक्षेबाहेर लाभेल, सामाजिक प्रतिष्ठाही बरीच उंचावेल.

पण दुसरा पंधरवडा मात्र थोडाफार कटकटीचा व कंटाळवाणा जाणवेल. सूर्य अष्टमस्थानी जाणार असल्यामुळे प्रकृतीच्या तक्रारी मधून मधून जाणवायला लागतील. पण त्यामुळे तुमच्या प्रगतीवर कसलाही अनिष्ट परिणाम होऊ शकणार नाही. मंगळ दशमात आहे तोपर्यंत तरी तुम्हांला कोणाबद्दलही डर नाही. प्रवासाचे मात्र शक्यतो दूर ढकला.

दि. ८ ते १३, २० ते २४, २९ ते ३१ या कालात अनेक अपेक्षा सफल व्हाव्यात.

**कुंभ :** मानवी जीवनमूल्ये आधिक्याने पाहावयास मिळतात कुंभराशीमध्येच. म्हणूनच या राशीला मानवतावादी राशी, असे संबोधले जाते.

हा आठवडा आपल्या बऱ्याचशा विवंचना दूर करणारा जाणवेल. मंगळ भाग्यस्थानातून तुमची पाठराखण करू लागलेला असल्यामुळे कोणत्याही गोष्टीबद्दल तुम्हांला डरण्याचे कारण नाही.

या महिन्यात प्रवास वरचेवर घडेल, वैचारिक संघर्ष मिटेल, तात्त्विक मतभेद दूर व्हायला लागतील, आणि नोकरधंद्याची घसरलेली गाडी मार्गावर येईल. दुसरा पंधरवडा सर्वोत्तम यशाचा म्हणून लक्षात राहील.

दि. २ ते ९, १५ ते २१ आणि २९ ते ३१ या कालात अपेक्षेप्रमाणे सारे काही घडावे.

**मीन :** पंचमस्थानी अनेक समर्थ ग्रह जमा होत असल्यामुळे, आपल्या आजवरच्या बऱ्याचशा असफल आशा–आकांक्षा या महिन्यात निश्चित सफल व्हाव्यात.

साडेसाती आणि आठवा मंगळ ही अनिष्टता असूनही या महिन्यात आपले अनेक महत्त्वाचे प्रश्न भराभर सुटावेत.

स्थावराची विवंचना मिटेल, नोकरी धंद्यासाठी केलेले परिश्रम कारणी लागतील आणि अनारोग्याची काळजीही दूर होईल.

प्रामुख्याने ५ ते १० या कालावर विशेष लक्ष केंद्रित करा. तो कालखंड आपल्या चारित्र्याला उत्थान दिल्याशिवाय राहणार नाही. थोरांचे सहकार्य मिळेल. चार पैसेही हाती घोळू लागतील.

दि. ५ ते ८, १४ ते १९, २३ ते २७ या कालांत भंगलेल्या आशा सांधल्या जातील.

 (पृष्ठ ५५ वरून)

# न्यूकोंब-विंबल्डन्चा ऑस्ट्रेलियन विजेता

विंबल्डन टेनिस स्पर्धेचा सहा वर्षे अनुभव असलेल्या ऑस्ट्रेलियाच्या जॉन न्यूकोंबनी अंतिम फेरीत पश्चिम जर्मनीच्या विल्हेम् बंगर्ट यांना ६–३, ६–१ व ६–१ अशा सेट्सनी सहज लोळविले. तेव्हा समीक्षकांना पाच वर्षांपूर्वी रॉड लेव्हर आणि मार्टीन मुलीगन यांच्यामध्ये झालेल्या एकतर्फी लढतीची आठवण झाली. लेव्हर यांनी मुलीगन यांचा अगदी जवळजवळ असाच (६–२,६–२ व ६–१) पराभव केला होता.

तिसऱ्या क्रमांकाच्या न्यूकोंबना विंबल्डनची वाटचाल काही सुखदायी नव्हती. एफ्. जॉफ्रेट (फ्रान्स), बी. ई. फेअर्ली (न्यूझीलंड), एस्. आर. स्मिथ (अमेरिका), क्लार्क ग्रेब्नर (अमेरिका), केन फ्लेचर (ऑस्ट्रेलिया) आणि निकोला पिलिक (युगोस्लाव्हिया) अशा एकाहीपेक्षा एक वरचढ टेनिसपटूंना न्यूकोंबनी नामोहरम केले. ज्या समर्थपणे त्यांनी फ्लेचर यांचा ८० मिनिटांत पराभव केला तितक्याच सहजतेने त्यांनी ७२ मिनिटांत विल्हेम बंगर्टना पराजित केले. मजबूत हाडापेराच्या न्यूकोंबना तर क्लार्क ग्रेब्नर यांच्यावर मात करण्यासाठी सतत तीन तास झुंजावे लागले! त्यांची सर्व्हिस जेवढी जोमदार होती तेवढीच व्हॉली जबरदस्त असे. विंबल्डन मानते पराक्रम; तिथे केवळ पूर्वपुण्याई चालत नाही. नाहीतर पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाच्या संताना इमर्सनपुढे कुणाचीच डाळ शिजली नसती.

न्यूकोंब गेल्या बारा वर्षांतील नववे ऑस्ट्रेलियन विंबल्डन विजेते आहेत. १९६५ व ६६ मध्ये तर दुहेरी स्पर्धांतील विजयी वीरांमधील ते एक भागीदार होते आणि त्यांचे सहकारी होते. रॉश आणि फ्लेचर. म्हणजे ज्या केन फ्लेचरबरोबर त्यांनी १९६६ चे विजेतेपद मिळविले त्यांनीच न्यूकोंबना गेल्या वर्षी विंबल्डनला तिसऱ्या फेरीत हरविले आणि त्याचाच वचपा न्यूकोंबनी या वर्षी काढून घेतला!

सहाव्या वर्षापासूनच सिडनेच्या हमरस्त्यावर रॅकेट फिरवीत बसण्याचा छंद त्यांना लागला. पुढे तेरा वर्षांत १९६३ साली ऑस्ट्रेलियाकडून 'डेव्हिस कप' स्पर्धांत ते उतरले. १९६६ मध्ये जगातील चौथे खेळाडू म्हणून ते मान्यता पावले. शाळेत तर क्रिकेट व फुटबॉल संघांचे ते कर्णधार होते. परंतु टेनिसच्या प्रेमापायी त्यांनी या दोन्ही खेळांवर पाणी सोडले. न्यूकोंब एकदा भरात आले की ते जगाला भारी ठरतील. तूर्त विंबल्डन स्पर्धेत तरी ते सर्वश्रेष्ठ ठरले आहेत. पुढचे पुढे.

●

## साप्ताहिक 'माणूस'

वार्षिक वर्गणी रुपये वीस

• •

१०० रुपये पाठवून
पाच वर्षांसाठी वर्गणीदार होणाऱ्यास

## नाझी भस्मासुराचा उदयास्त

• •

२०० रुपये पाठवून
दहा वर्षांसाठी वर्गणीदार होणाऱ्यास

## राजा शिवछत्रपति

सप्रेम भेट.

• •


सप्रेम भेट योजना : १५ ऑगस्ट १९६७ पर्यंत

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H–649


# स्वस्तिक

# गमबूट




इंडस्ट्रियल व ट्रेड क्वालिटी
मोठ्या माणसासाठी साईज ५ ते ११
लहान मुलासाठी साईज १० ते १
मध्यें मिळतात.

**स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि, पुणे ३.**


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग **माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. **माजगावकर**